# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

**सोमवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ / भाद्रपद २०, १९४५ (शके)**

### लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**१२२.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ३८८ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी २८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती. एकूण प्रलंबित ३६० निवेदनांपैकी १६२ निवेदने मा. सदस्यांना पत्रक भाग-२ व्दारे सोमवार, दिनांक १५ मे, २०२३ रोजी वितरीत करण्यात आली. एकूण १९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १८ निवेदने सोमवार, दिनांक २९ मे, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६४ व्दारे मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. १८० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३५ निवेदने सोमवार, दिनांक १२ जून, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. त्यापैकी १४५ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३३ निवेदने सोमवार, दिनांक ३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ७४ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. एकूण ११२ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १४ निवेदने सोमवार, दिनांक १३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ७९ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. आता एकूण ९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ४१ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : **११ सप्टेंबर, २०२३**

**जितेंद्र भोळे**
सचिव-१ (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन शाखा

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे (अर्थसंकल्पिय) अधिवेशन
## मा. आ. श्री. सुनिल प्रभू, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ७४५ पुढीलप्रमाणे आहे.

"राज्यात करोना काळात मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर टोल वसूलीचे कंत्राट मिळालेल्या मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. या कंपनीला महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एम.एस.आर.डी.सी.) अधिकाऱ्यांनी करोना काळातील भरपाई म्हणून सुमारे ७१ कोटी रुपये शासकीय निधी मंजूर करुन दिल्याचा धक्कादायक प्रकार दि.८.२.२०२३ रोजी निदर्शनास येणे, आपत्ती उद्भवल्यास त्याला अराजकीय परिस्थिती मानली जावी अशी परिस्थिती उद्भवल्यास अपरिहार्य कारणाने होणारे नुकसान त्या त्या पक्षकाराने स्वत: सोसावे त्याबाबत कोणत्याही पक्षकारांना परस्परांना भरपाई देण्याची आवश्यकता नसेल असे एमएसआरडीसी व आयआरबी मध्ये झालेल्या कंत्राटात स्पष्ट नमुद असतानाही राज्य शासनाने २६ मार्च ते १९ एप्रिल २०२० या कालावधीत झालेल्या ७१ कोटी ४ लाख रुपयांच्या नुकसानीबद्दल भरपाई मिळण्यासाठी आयआरबीने सादर केलेल्या अर्जात मान्यता देण्याचा घडलेला बेकायदा व नियमबाह्य प्रकार, शिवाय एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी आयआरबी कंपनी व्यवस्थापनाने आर्थिक संगनमत करुन सदरहू ७१ कोटी रुपये निधी शासनाकडून मंजूर करुन घेऊन आर्थिक घोटाळा करण्यात येणे, यामुळे शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणात झालेला अपव्यय, सदरहू मुंबई-पुणे महामार्गावर आयआरबी कंपनीने २०१९ पर्यंत जवळपास १५ वर्षे टोल वसुली करण्यात येणे, त्यानंतरही त्याच कंपनीला नव्याने करार करुन टोल वसुलीसाठी दिलेली मुदतवाढ ही बेकायदा असल्याची धक्कादायक माहिती उघड होणे, राज्य सरकारने राज्यातील ५३ टोलनाक्यावरील टोल वसुली बंद करण्याचा निर्णय घेण्यात येणे, त्याच धरतीवर मुंबई-पुणे महामार्गावरील टोल वसुली बंद करण्याचा शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन एमएसआरडीसीचे संबंधित अधिकारी आणि आयआरबी कंपनी व्यवस्थापन विरुद्ध कारवाई करुन सदरहू मंजूर केलेली रक्कम पुन्हा वसूल करण्याच्यादृष्टीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

.............................................................................................................................

## मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम/सार्वजनिक उपक्रम) महोदयांचे निवेदन

कोविड - १९ जागतिक महामारीमुळे देशव्यापी लॉकडाऊन जाहिर करण्यात आला होता. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने दि.२३.०३.२०२० रोजीच्या अधिसुचनेद्वारे संपूर्ण राज्यात दि.३१.०३.२०२० पर्यंत लॉकडाऊन जाहिर केला होता व वेळोवेळी तो वाढविला होता. केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने (MoRTH) दि.२५.०३.२०२० रोजीच्या पत्रान्वये सर्व टोल विषयक कार्यवाही बंद करण्याचे व कन्सेशन/कंत्राट करारासाठी प्रचलित परिस्थिती ही सक्तीची घटना (Force Majeure) म्हणून ग्राह्य धरण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार पुढील आदेश होईपर्यंत टोल जमा करण्याच्या कामास तातडीने बंदी घालण्याच्या सुचना मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. कंपनीस देण्यात आल्या. तद्नंतर राज्य शासनाच्या दि.१९.०४.२०२० रोजीच्या अधिसूचनेन्वये टोल जमा करण्यास दि.२०.०४.२०२० पासून सुरुवात करण्याच्या सुचना निर्गमित करण्यात आल्या. यामुळे टोल जमा करण्याचे काम दि.२६.०३.२०२० ते दि.१९.०४.२०२० या २५ दिवसांच्या कालावधीकरीता बंद होते.

मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. ने दि.१८.०३.२०२० व दि.२४.०३.२०२० रोजी political force majeure चा दावा केला. तथापि, सब-कन्सेशन ॲग्रीमेंट (करार) मधील कलम २७.५ नुसार पुरेसा तपशील उपलब्ध न करुन दिल्यामुळे आणि महामारी ही कलम २७.४ नुसार political force majeure

च्या व्याख्येत बसत नसल्यामुळे, मुंबई-पुणे एक्सप्रेसवे लि. ने दि.०९.०४.२०२० रोजी सदरचा दावा फेटाळून लावला. मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. ने दि.१४.०४.२०२० रोजी सब-कन्सेशन ॲग्रीमेंट (करार) मधील कलम २७.४ (बी) नुसार सदरचा दावा योग्य असल्याबाबतचा तपशील सादर केला. मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. ने सादर केलेला सदरच्या तपशीलाचा सविस्तर अभ्यास करुन विधी सल्लागार व SBI Caps Ltd. या व्यवहार सल्लागार यांचा दि.१७.०४.२०२० रोजी सल्ला प्राप्त करुन घेण्यात आला. या सर्वांच्या आधारे मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. ला द्यावयाच्या नुकसान भरपाईच्या परिगणनेस मुंबई-पुणे एक्सप्रेसवे लि. च्या संचालक मंडळाने दि.२०.०४.२०२० रोजी मान्यता दिली. त्यानुसार, द्यावयाच्या सवलतीचे प्रमाण परिगणीत करण्यासाठी प्रस्तावित पर्याय मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. ला दि.२०.०४.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले. तसेच, the relief granted will be in lieu of any increase in concession period and no further claims, damages of representations will be considered in this regards असेही सदर पत्रात नमूद करण्यात आले.

मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. ने दि.२१.०४.२०२० रोजी आपला होकार कळविला. त्यास अनुसरुन रु.७१,०६,९८,९४२/- इतक्या रकमेचा मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. चा दावा मान्य करण्यात आला आणि सदरची रक्कम मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. कडून मुंबई-पुणे एक्सप्रेसवे लि. ला देय असलेल्या रु.६५०० कोटी मधून समायोजित करण्यात आली.

महालेखापाल, नागपूर यांनी "Irregular revenue waiver of Rs.71.07 Cr. in toll collection contract for Mumbai Pune Expressway" असा आक्षेप नोंदवून NHAI च्या मार्गदर्शक सुचना या TOT Projects ला लागू नसल्याचे नमूद केले. तसेच मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. ने नुकसान भरपाई मुंबई-पुणे एक्सप्रेसवे लि. कडून घेण्याऐवजी विमा कंपनीकडून ती घेणे आवश्यक असल्याचे कळविले. त्यानुसार, मुंबई-पुणे एक्सप्रेसवे लि. ने मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. ला रु.७१,०६,९८,९४२/- रकमेची प्रतीपूर्ती करण्याबाबत दि.३१.१०.२०२२ रोजी कळविले. मे. आयआरबी एमपी एक्सप्रेसवे प्रा. लि. ने सदर मागणी अमान्य केली असून सदरचा वाद mediation करिता Independent Engineer of the project यांच्याकडे सुपूर्द केला आहे. सदरचा वाद mediation नंतर न मिटल्यास सब-कन्सेशन ॲग्रीमेंट (करार) मधील कलम ३७ नुसार संचालकांच्या (Director-in-charge) पुढे निर्णयासाठी ठेवण्यात येणार आहे. संचालकांचा (Director-in-charge) निर्णय अंतिम असणार असून तो दोन्ही पक्षांना बंधनकारक असेल.

उपरोक्त वस्तुस्थिती वरुन मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. या कंपनीला मुंबई-पुणे-एक्सप्रेसवे लि. मार्फत दिलेल्या रु.७१,०६,९८,९४२/- च्या दिलासा (relief) संदर्भातील वाद हा सब-कन्सेशन ॲग्रीमेंट (करार) मधील कलमांचा अर्थ लावणे (interpretation) च्या अनुषंगाने असून तो दिवाणी स्वरुपाचा आहे. महालेखापाल, नागपूर यांच्या आक्षेपास अनुसरुन मुंबई-पुणे एक्सप्रेसवे लि. ने मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. नोटीस निर्गमित करुन रु.७१ कोटीची प्रतिपूर्ती करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर बाब व मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. सोबतचा करार दि.३०.०४.२०३० पर्यंत आहे, ही वस्तुस्थिती पाहता सदरची रक्कम मे. आयआरबी एमपी एक्सप्रेस वे प्रा. लि. कडून वसूल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणात रु.७१,०६,९८,९४२/- च्या निधीचा आर्थिक घोटाळा झाला असे म्हणता येणार नाही. तसेच शासनामार्फत सखोल चौकशी करण्याची आवश्यकता आहे असे देखील म्हणता येणार नाही.

महामंडळाकडील एकूण १० प्रकल्पावरील ५० पथकर नाके शासन अधिसूचनेप्रमाणे चालू आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडील १ पथकर स्थानक दि. ३१ मे, २०१५ रोजी मध्यरात्री १२:०० वाजता बंद करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडील १२ प्रकल्पावरील २६ पथकर स्थानकांवर कार, जीप व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना दि. ३१ मे, २०१५ रोजी मध्यरात्री १२:०० नंतर पथकरातून सूट देण्यात आली आहे.

मा. अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील मुंबई प्रवेश पथकर नाके व यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावरील पथकर नाके यांकरीता हलक्या वाहनांना पथकरातून सूट देण्यासंबंधी आर्थिक व

20.

**लक्षवेधी सूचना क्रमांक.२५३४**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्री.संजय जगताप, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २५३४ पुढीलप्रमाणे आहे :-

"पुरंदर (जि.पुणे) तालुक्यात जलयुक्त शिवार योजनेत कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असल्याचे येथील नागरिकांच्या तक्रारी असणे व वस्तूस्थितीही तशीच असणे, तेथे या योजनेत नाला खोलीकरणाच्या कामांत अधिकाऱ्यांनी सविस्तर अंदाजपत्रकात चूकीचे दर वापरुन अवास्तव रकमेची अंदाजपत्रके तयार करणे, सिमेंट नालाबांधाची कामे तांत्रिकदृष्टया अयोग्य केलेली असणे, सलग समतल चराची कामे डोंगराळ भागात दर्शविण्यात आली असून फक्त १५ ते १६ टक्के एवढीच कामे होणे, तथापि या संपूर्ण कामाची बिले काढलेली असणे, माती नालाबांधात पाया खोदला नसणे, नाला खोलीकरण व बांधातील गाळ काढणे ही कामे केल्याचे भासवून कामे न करता अपहार केलेला असणे, महात्मा फुले जलभूमी योजनेतंर्गत रु ५.५ कोटी निधी फक्त एका दिवसात ई-निविदा न करताच खर्च करणे, येथील एका मशिनधारकास एका आर्थिक वर्षात आर्थिक संगनमत करुन रु.१.६० कोटी रकमेची नियमबाहय कामे देणे , यासंदर्भात प्रशासनाने येथे गैरप्रकार केले असणे, याबाबत येथे तक्रारी झाल्यावर तत्कालीन अधिक्षक कृषी अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक, पुणे यांचे तपासणी अहवालावर अद्याप कार्यवाही न होणे, त्यामुळे शासन या अधिकाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचे येथील जनतेत भावना निर्माण होणे, त्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही व्हावी, अशी मागणी असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे निवेदन

मौजे वाल्हे ता. पुरंदर जि.पुणे येथील सन २०१४-१५ मधील विशेष घटक योजना अनुदानातून जलयुक्त शिवार अभियानांतर्गत केलेल्या कामाबाबत श्री.शिवाजी उत्तरेश्वर तळेकर मु.केम, ता.करमाळा जि.सोलापूर यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने माती नालाबांध गट क्र.९८,९९,११९,१२०,१२१,१२२,१२३,१२४ एकुण ७ कामांना तपासणी अधिकारी तथा विभागीय अधीक्षक कृषि अधिकारी, पुणे यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी करून सविस्तर अहवाल सादर केला आहे. सदर प्रकरणी संबंधीत दोषी कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी हे जबाबदार आढळून आल्याने विभागीय कृषि सहसंचालक, पुणे यांनी शिस्तभंगविषयक कारवाई करण्यासाठी सविस्तर अहवाल आयुक्त (कृषि), पुणे यांना सादर केला आहे. तसेच, उपरोक्त अधिकारी / कर्मचारी यांना विभागीय कृषि सहसंचालक, पुणे यांचे स्तरावरून दि.१५/७/२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

श्री. सचिन विलास लंबाते, वाल्हे, ता. पुरंदर, जि. पुणे यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने उपलब्ध रेकॉर्ड तसेच शेतकरी आणि संबंधित अधिकारी यांचे जबाब आणि त्यांनी कामांची तपासणी करुन सादर केलेले निष्कर्ष याचा सारासर विचार करुन श्री.लंबाते यांच्या तक्रार अर्जात तथ्य नसल्याचे दिसून

आले. त्यानुसार कृषि आयुक्तालय, पुणे यांच्या स्तरावरून दि.१६.०४.२०१८ रोजी सदर तक्रारीचे प्रकरण दप्तरी दाखल करण्यात आले आहे.

तसेच पुणे जिल्हयातील पुरंदर तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ ते २०१७-१८ या कालावधीत झालेल्या मृद संधारणाच्या कामाच्या अनुषंगाने श्री. पै. बाळासाहेब काळूराम चौधरी, रा. पिंपळगाव, पो. आळंदी, ता. खेड जि. पुणे, यांनी दिनांक ९.२.२०१८ अन्वये तक्रार अर्ज शासनास सादर केला आहे. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने, तक्रार अर्जातील १२ मुद्यांची चौकशी करण्यासाठी संचालक, मृदसंधारण, पुणे यांच्या दि.५/४/२०१८ च्या आदेशान्वये श्री.डी.बी.बोटे, तत्कालिन कृषि सहसंचालक (मृ.सं.) तथा सह मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली चार सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीने पुरंदर तालुक्यातील सन २०१५-१६ ते २०१७-१८ या कालावधीतील मृद व जलसंधारण योजनांतर्गत उपचार निहाय झालेल्या महत्वाच्या १३ उपचारांच्या एकूण १३५९ कामांपैकी रॅन्डम पध्दतीने एकूण १५३ कामांची तपासणी केली. तपासणी अंती आक्षेप / वसूली अहवालात दर्शविली आहे. त्यामध्ये एकूण ५९ गटांवर निरंक वसूली, ३८ गटावर आक्षेपार्ह ० ते ५ टक्के पर्यंत रक्कम रु. २१८४९९/-, ४३ गटांवर आक्षेपार्ह वसूलपात्र रक्कम ५ ते २० टक्क्यांपर्यंत रु.११९२०८१/- व २० टक्क्यापेक्षा जास्त वसूली असलेल्या १३ गटांवर आक्षेपार्ह रक्कम रु.१६३९३०४/- इतकी असून एकूण ९४ गटांवर रू.३०,४९,८८४/- इतकी रक्कम वसूलपात्र दर्शविली आहे. २० टक्क्यापेक्षा जास्त वसूली असलेल्या १३ गटांच्या बाबत पुरंदर तालुक्यात संबंधित मुख्यालयी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांविरुध्द म.ना.से. (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम ८ / १२ नुसार विभागीय चौकशी करावी व मुख्यालयी कार्यरत नसलेल्या अधिकारी कर्मचारी यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करावी अशा सूचना विभागीय कृषि सहसंचालक, पुणे यांना दिलेल्या होत्या. त्यानुषंगाने ११ अधिकारी / कर्मचा-यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ नियम ८ / १२ व २७ नुसार दोषारोप कृषि आयुक्तालय, पुणे यांच्याकडून शासनास पाठविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

वसूलपात्र रकमेबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना विभागीय कृषि सहसंचालक, पुणे यांना देण्यात आल्या असून त्याबाबतची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

० ते ५ टक्के पर्यंत वसुलपात्र रक्कमेच्या ३८ गटांशी संबंधित जबाबदार एकूण ६ अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून वसुलपात्र रक्कम रुपये २१८४९९/- पैकी रु.१३०५६/- शासनखाती भरणा करण्यात येवून त्यांना समज देण्यात आली आहे. ५ ते २० टक्के पर्यंत रू.११,९२,०८०/- वसुलपात्र रक्कमेच्या ४३ गटांशी संबधित जबाबदार एकुण १० अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय कृषि सहसंचालक यांचेस्तरावरुन महाराष्ट्र नागरी सेवा नियम- १९७९ मधील नियम १० नूसार कार्यवाही करण्यात येवून सदर अधिकारी/कर्मचाऱ्यांवर ठपका ठेवण्याची व वसुलपात्र रक्कम रु.२९२४२/- वसुल करण्याची शिक्षा बजाविण्यात आली आहे. सदर रक्कम रू.२९,२४२/- वसूल झाली आहे.

२० टक्क्यापेक्षा जास्त वसूली असलेल्या १३ गटांच्या बाबत ११ अधिकारी/ कर्मचाऱ्यांविरुध्द म.ना.से. (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम ८ / १२ व २७ नुसार दोषारोप कृषि आयुक्तालय, पुणे यांच्याकडून शासनास पाठविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

----------------

विधी बाबींची सुसाध्यता तपासण्याकरीता तज्ञ समिती स्थापन करण्यात आलेली आहे. समितीने दि. १८ एप्रिल, २०१६ रोजी अहवाल शासनास सादर केलेला आहे.

समितीने मुंबईतील पाच प्रवेश पथकर नाके व यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावरील पथकर नाके यांवर हलक्या वाहनांची संख्या राज्यातील इतर टोल नाक्यांच्या तुलनेत जास्त असल्याकारणाने या पथकर नाक्यांवर हलक्या वाहनांना सूट दिल्यास नुकसान भरपाईची मोठी रक्कम अदा करावी लागणार असल्याने तसेच संपूर्ण पथकर माफीसाठीही उद्योजकास द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम खूप जास्त असल्याकारणाने याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्याबाबत शिफारस केली आहे.

यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावर हलक्या वाहनांना व एस.टी बसेसला सूट द्यावयाची असल्यास खालीलप्रमाणे नुकसान भरपाई द्यावी लागेल.

| नुकसान भरपाई | यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग (कोटी) |
|---|---|
| एक रक्कमी | ५२१०.२१ |
| टप्प्यामध्ये (५ टप्पे) | ७१९५.४ |

या प्रकल्पावरील पथकर नाके संपूर्णपणे बंद करावयाचे असल्यास खालीलप्रमाणे नुकसान भरपाई द्यावी लागेल.

| नुकसान भरपाई | यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग (कोटी) |
|---|---|
| एक रक्कमी | १०८९५.४९ |
| टप्प्यामध्ये (५ टप्पे) | १५०४३.४१ |

***********

**लक्षवेधी सूचना क्र.६१७**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले अर्थसंकल्पीय अधिवेशन

श्री.अजित पवार, श्री.जयंत पाटील, श्री.छगन भुजबळ, श्री.दिलीप वळसे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, कुमारी आदिती तटकरे,श्री.संजय बनसोडे,श्री.दत्तात्रय भरणे,श्री.चेतन तुपे, श्री.विनोद निकोले,श्री.दौलत दरोडा,वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.६१७ खालीलप्रमाणे :-

"राज्य शासनाने अर्थसंकल्पीय भाषणात जाहीर केलेले नवी मुंबईतील,'महाराष्ट्र भवन' बांधण्यासंदर्भात संपूर्ण वर्ष संपले तरी कोणतीही कारवाई केली नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, एकीकडे राज्य शासन उत्तर प्रदेशातील 'अयोध्या' येथे महाराष्ट्र भवन बांधण्यासाठी पुढाकार घेत असताना, जाहीर केलेले नवी मुंबई मधील महाराष्ट्र भवन बांधण्यासाठी करावयाच्या भूखंडाच्या खरेदीच्या कराराकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, भारतातील बहुतांश राज्यांनी मागील काही काळात सिडकोकडून नवी मुंबईतील वाशीमध्ये भूखंड घेऊन आपापल्या 'राज्याचे भवन' उभारलेले असणे, इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्र सरकारलाही भवनासाठी सिडकोने भूखंड दिलेला असणे, तथापि भूखंड खरेदी करण्याचा साधा करारही सरकारला अद्याप करता आलेला नसणे, परिणामी खेड्यापाड्यातून मुंबई किंवा आसपासच्या ठिकाणी शिक्षण, नोकरीसाठी येणाऱ्या युवकांना निवासाची योग्य ती व्यवस्था होत नसल्यामुळे राज्यातील जनतेत राज्य शासनासंदर्भात निर्माण झालेली असंतोषाची भावना, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना."

---

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र.१२३१४,दि.०३.३.२०२० नुसार वाशी से.३०अ येथील भूखंड क्र.११,१२,१३ व १४ क्षेत्र ८३२२.९१ चौ.मी.हा भूखंड महाराष्ट्र राज्य अतिथी गृह बांधणी व व्यवस्थापन यासाठी सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग यांना भाडेपट्टा कराराने देण्यास मान्यता देऊन सार्वजनिक बांधकाम विभाग यांना इरादा पत्र देण्यात आले आहे.एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली -२०२० नुसार मुळ चटई क्षेत्र निर्देशांक १.० वरुन १.१ झाल्याने सुधारीत इरादा पत्र दि.१४.०१.२०२२ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग यांना देऊन सदर भूखंडाच्या बदल्यात भाडेपट्टा रक्कम एका महिन्यात भरण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार कार्यकारी अभियंता,ठाणे यांचेकडुन दि.१२.०४.२०२२ रोजी रु.३१,५०,५६,०००/- भरणा केल्यानुसार दि.१६.०२.२०२२ रोजी वाटप पत्र देण्यात आले आहे.वाटप पत्रानुसार एकूण भाडेपट्टा रु.२८,७६,७४,७४४.४०/- जमा करुन उर्वरीत रक्कम रु.२,७३,८१,२५५.६०/- भाडेपट्टा वरील सी.जी.एस.टी आणि एस.जी.एस.टी मध्ये समायोजित करण्यात आली आहे.सद्यस्थितीत,दि.१७.०३.२०२३ रोजीच्या वाटप पत्रानुसार प्रलंबित थकबाकी पोटी देय असलेल्या एकूण रु.३,७०,८८,२६६.८१/- बाबत कळविण्यात आले आहे.प्रलंबित थकबाकीचा भरणा झाल्यानंतर भूखंडाचा भाडेपट्टा करारनामा करण्याची कार्यवाही सिडकोमार्फत प्रस्तावित आहे.

***

शेटा - ऽच ५५४ (७५० - ७ - २०२३)

लक्षवेधी सूचना

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**श्री. चेतन तुपे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"नोव्हेंबर डिसेंबर २०२२ आणि जानेवारी फेब्रुवारी २०२३ दरम्यान पुणे शहरातील मनपा रूग्णालयांमध्ये जाणवलेली रेबीजच्या लसींचा तुटवडा, याच दरम्यान भटक्या कुत्र्यांचा दंश झालेल्या नागरिकांच्या संख्येत झालेली वाढ, त्यामध्ये महिला आणि शाळकरी मुलांचा मोठया प्रमाणात समावेश असल्याने ह्या घटकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे आणि चिंतेचे वातावरण, मनपा रूग्णालयांमध्ये लस उपलब्ध नसल्याने नागरींकांना खाजगी हॉस्पिटल मधून महागडे उपचार घ्यावे लागत असल्याने, त्यांचे होत असलेले आर्थिक नुकसान, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली नाराजीची आणि असंतोषाची भावना, पुणे शहरातील सर्व मनपा रूग्णालयांमध्ये रेबीजच्या लसींचा पुरेसा पुरवठा तातडीने करण्याची आवश्यकता व त्याबाबत करावयाची उपाययोजना."

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

पुणे महानगरपालिकेच्या एकुण ५० बाह्यरूग्ण विभाग १८ प्रसुतिगृह, १ सर्व साधारण रुग्णालय, १ सांसर्गिक आजाराचे रूग्णालय कार्यरत असून पुणे मनपाच्या बाह्यरुग्ण विभागाकडे रोज सुमारे ८ ते १० हजार रूग्णसेवेचा लाभ घेत असतात. या सुविधांमध्ये सर्व प्रकारचे लसीकरण, गरोदर मातांची नोंदणी, सर्व प्रकारची औषधे, राष्ट्रीय कार्यक्रम संबंधीत इतर सेवा सुविधा मोफत पुरविल्या जातात. पुणे मनपाच्या आरोग्य विभागामार्फत दर वर्षी निविदाप्रक्रिया राबवून दवाखान्याच्या आवश्यकतेनुसार अँटीरेबीज व्हॅक्सिन खरेदी केली जाते व या लसीचा साठा वर्षभर मुबलक प्रमाणात उपलब्ध असतो.

नोव्हेंबर, डिसेंबर २०२२ व जानेवारी, फेब्रुवारी २०२३ मध्ये एकुण श्वान दंश झालेल्या रूणांची संख्या पुढील प्रमाणे:-

| अ.क्र. | महिना | श्वान दंश |
|---|---|---|
| १ | नोव्हेंबर,२०२२ | १४०० |
| २ | डिसेंबर,२०२२ | १५४३ |
| ३ | जानेवारी,२०२३ | २१८७ |
| ४ | फेब्रुवारी,२०२३ | १९७२ |

पुणे महानगरपालिकेच्या कोणत्याही दवाखान्यामध्ये अँटीरेबीज व्हेक्सिन तुटवडा असल्याची बाब घडली नाही. सर्व दवाखान्यांमध्ये दर महिन्याला त्यांच्या मागणीप्रमाणे अँटीरेबीज व्हेक्सिन व इम्युनोग्लोबीनचा पुरवठा विनाखंडीत करण्यात येतो. पुणे मनपाच्या कोणत्याही दवाखान्यामध्ये व रूग्णालयामध्ये रूग्णांची तक्रार प्राप्त झालेली नाही. सध्या पुणे महानगरपालिकेच्या दवाखाने व रूग्णालयामध्ये अँटीरेबीज व्हेक्सिन व इम्युनोग्लोबीन चा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे व सदरचे व्हॅक्सिन व इम्युनोग्लोबीन पुणे महानगरपालिकेची दवाखाने व रूग्णालयामध्ये येणाऱ्या रूग्णांना मोफत पुरविण्यात येतात.

रोटा H/813 (750-7-23)

*****

लक्षवेधी सुचना क्र.२०३०

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे पहिले अधिवेशन**

मा.श्री. अबू आजमी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२०३० पुढीलप्रमाणे :-

"वाशी नवी मुंबई येथे सेक्टर - ३,४,५ व ६ याठिकाणी सुमारे ४० वर्षांपासून सिडकोने रहिवाशी वापराकरिता ३ व ४ मजली सदनिका बांधणे, सदर रहिवाशी सदनिकांमधील तळ मजल्यावर असणाऱ्या सदनिका अवैधरीत्या हेअर सलून, टेलर दुकान, मिठाई दुकान, बँक एटीएम इतर दुकानाकरिता भरमसाठ भाड्याआने देणे, काही इमारतीसमोर संरक्षण भिंत बांधण्यास तळ मजलावर दुकानदारांनी विरोध करणे, परिणामी फेरीवाले विक्रेते, खरेदी करण्यासाठी येणाऱ्या अनाहूत ग्राहकांमुळे स्थानिक रहिवाशांना विनाकारण त्रास सहन करावा लागणे, सदर ईनाटी ४० वर्षांहून अधिक जुन्या असल्यामुळे इमारती अत्यंत कमकुवत झाल्याने इमारतीचे स्लाब प्लास्टर केव्हाही कोसळण्याची भीती निर्माण होणे, तळमजल्यावर ज्या सदनिकाधारकांनी वाणिज्यिक वापरासाठी सदनिका भाड्याने दिलेल्या असणे. त्यांच्या प्रामुख्याने इमारतींच्या पुनर्विकासासाठी तीव्र विरोध असणे, परिणामी इमारतींच्या पुनर्विकास प्रक्रियेला खिळ बसने, या प्रकरणी २० फेब्रुवारी, २०२३ रोजी सिडको नवी मुंबई महानगरपालिका यांना निवेदन देणे तथापि कोणतीही कार्यवाही न होणे. याबाबत गंभीर नोंद घेऊन शासनाने प्राधान्याने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

---

**मुख्यमंत्र्यांचे निवेदन**

वाशी, नवी मुंबई येथील सेक्टर ३,४,५ व ६ या ठिकाणी सिडको महामंडळामार्फत सन, १९८० च्या दरम्यान आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक,अल्प उत्पन्न गट,मध्यम गट, उच्च उत्पन्न गटाकरीता निवासी सदनिकांचे तसेच निवासी + वाणिज्य इमारतीचे (तळमजला+४) बांधकाम करण्यात आले आहे.

वाशी, नवी मुंबई येथील सेक्टर ३, ४, ५ व ६ येथील निवासी वापरा करीता वाटपित झालेल्या सदनिकेचे वाणिज्यिक वापराकरीता करावयाच्या बदलाबाबत सिडको महामंडळाचे धोरण नाही. त्यामुळे सिडको महामंडळाने उपरोक्त सेक्टर मधील रहिवाशी गृहनिर्माण संस्थेमधील वापर बदलाबाबत ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले नाही. सदर इमारतींपैकी काही इमारतींमध्ये तळमजला व काही ठिकाणी पहिल्या मजल्यावरील रहिवास वापराऐवजी किराणा दुकाने, औषधालये, रेस्टॉरंट, केश कर्तनालय, बँक ए.टी.एम. मिटाईची दुकाने,दुध डेअरी भाजीपाला विक्री, वाहनांचे टायर विक्री, इलेक्ट्रॉनिक्स वस्तु विक्री व दुरुस्ती इत्यादींसाठी बेकायदेशीर बापर करीत असल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यावर नियोजन प्राधिकरण म्हणून नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत कारवाई करण्यात येते.

सिडको महामंडळ निर्मित वसाहतीतील इमारती या कालांतराने जीर्ण, मोडकळीस व धोकादायक होत आहेत. शासनाच्या दि.४.२.२०१५ च्या अधिसुचनेद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम,१९६६ च्या कलम ३७(२) अन्वये विकास नियंत्रण नियमावली ४६(३) मध्ये योग्य ते फेरबदल करून निश्चित केलेल्या धोरणास अनुसरून एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०२० मधील नियम

रोटा-प्रेच ५५५ (७५०-७-२०२३) [ कृ.मा.प.

१०.१०.२ मध्ये या तरतूदी समाविष्ट केलेल्या आहेत. दि.४.२.२०१५ च्या अधिसुचनेनुसार पुनर्विकासाकरिता सिडको महामंडळाने २०१७-१८ मध्ये एकूण १५ अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन यांना पुनर्विकास ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमीत केले आहे. सदरच्या ना-हरकत प्रमाणपत्रामध्ये पुनर्विकासाकरिता प्रत्येक सदनिका धारकाने संमती देणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत, वाशी नवी मुंबई येथील सेक्टर-३, ४, ५ व ६ मधील गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाबाबत विरोध असल्याबाबत कुठलीही तक्रार सिडको महामंडळास प्राप्त झालेली नाही, तसेच पुनर्विकास होऊ नये याकरीता कोणत्याही संस्थेचे तसेच सदनिका धारकांची कुठलीही तक्रार सिडको महामंडळास प्राप्त झालेली नाही. एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली,२०२० मधील नियम क्र.१०.१०.२ नुसार आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली असून, धोकादायक इमारती म्हणून निश्चिती करणेकरीता महानगर पालिका स्तरावर स्थापन केलेल्या समितीकडे संबंधित गृहनिर्माण संस्थेने संरचनात्मक लेखा परिक्षण अहवाल सादर करणे आवश्यक आहे. संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेने नवी मुंबई महानगरपालिकेच्या समितीकडे प्रस्ताव सादर केल्यावर समिती सदस्यांद्वारे सदर इमारतींची स्थळ पाहणी करून संस्थेने सादर केलेल्या संरचना अहवाल विचारात घेवून सदर इमारती ह्या धोकादायक म्हणून निश्चित केल्यानंतर सदर धोकादायक इमारतींचा पुनर्विकासाकरीता संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेद्वारे पुनर्बांधकामाकरीता प्रस्ताव नवी मुंबई महानगरपालिकेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. यास्तव सदर धोकादायक इमारतीचे पुनर्विकासाबावत प्रस्ताव नवी मुंबई महानगरपालिका यांच्या मार्फत सिडको महामंडळास प्राप्त झाल्यानंतर एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येते.

*******

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक २३२८**

**श्री. छगन भुजबळ,** वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबईत मोठ्याप्रमाणात जाहिरातीसाठी होर्डिंग्ज उभारण्यात आले असणे, त्यासाठी जमिन मालिकांनी वेगवेगळ्या कंपनीशी करार केला असणे, उक्त करार केल्यानंतर त्याची प्रत बृहन्मुंबई महानगरपालिकेस देणे आवश्यक असणे, परंतु मुंबईतील सर्वात जूनी अशी सेल्व्हल पब्लिसिटी ॲन्ड कन्सलटंट प्रा.लि. या जाहिरात कंपनीने एफ.एस.आय सह महानगरपालिकेची फसवणूक केली असणे, उक्त कंपनीने मुंबईतील जुहु येथे भारतीय विमानतळ प्राधिकरणाशी सन १९७० पासून त्यांच्या कार्यक्षेत्रातील होर्डिंग्ज भाडेतत्वावर घेतल्या असून दर पाच वर्षांनी त्याबाबतचा करार नुतनीकरण करण्यात येत असणे, परंतु उक्त कंपनीने अद्यापही केलेल्या कराराची प्रत महानगरपालिकेला दिलेली नसणे, तसेच महानगरपालिकेचे इस्टेट शुल्क, मुल्यांकन शुल्क बुडविण्यासाठी सदरहू कंपनीने अश्या प्रकारे मुंबईतील इतर ठिकाणी देखीलही होर्डिंग्ज उभारताना केलेल्या कराराची मुळ प्रत दिलेली नसणे किंवा कमी किमतीच्या कराराची प्रत सादर केली असणे, बृहन्मंबई महानगरपालिकेच्या मुल्यांकन विभागाकडून दर ५ वर्षांनी नुतनीकरण करुन घेणे आवश्यक असताना देखील त्याकडे दुर्लक्ष केले असणे, होर्डिंग्ज उभारण्यासाठी इस्टेट विभागाची परवानगी घेणे आवश्यक असताना त्याकडेही दुर्लक्ष केले असून इस्टेट शुल्काची भरणा देखील केलेली नसणे, जमीन मालकांना तसेच भारतीय विमान प्राधिकरणास सर्व देयके धनादेशाद्वारे दिलेले असणे, तसेच उक्त कंपनीने दोन करार करुन महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने केलेली महानगरपालिकेची फसवणूक, याकडे महानगरपालिकेचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांच्या मनात निर्माण झालेली असंतोषाची भावना, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदरहू कंपनीवर व उक्त बाबीकडे दुर्लक्ष करणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात उभारण्यात येणाऱ्या जाहिरात फलकांच्या परवानगीबाबत जाहिरात मार्गदर्शक तत्वे २००८ नुसार सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांमध्ये जाहिरात फलक उभारण्याकरिता जमीनमालकांचे ना-हरकत प्रमाणपत्र एकदाच घेतले जाते. जमीन मालक व त्यासंबंधित जाहिरातदारांमधील खाजगी करारनाम्याची प्रत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनुज्ञापन विभागामार्फत घेतली जात नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मे. सेलवेल या कंपनीस एकूण ७१ जाहिरात फलकांस परवानगी देण्यात आलेली आहे. त्यांचे जाहिरात शुल्क बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वसूल करण्यात येत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मक्त्याने दिलेल्या भूभागावर जाहिरात फलक उभारण्याकरिता ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत दिनांक १९.०४.२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. माहे मार्च २०२१ मध्ये मे. सेल्व्हेल पब्लिसिटी अँन्ड कन्सल्टंट प्रा. लि यांच्या विरुद्ध मक्त्याने दिलेल्या भूभागावर जाहिरात फलक उभारताना बृहन्मुंबई महानगरपारलिकेच्या मालमत्ता विभागाची थकबाकी रक्कम असल्याबाबत तक्रार प्राप्त झाली असल्याने दिनांक २७.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मे. सेल्व्हेल पब्लिसिटी अँन्ड कन्सल्टंट प्रा. लि यांच्या होर्डिंग्ज नुतनीकरणाच्या कुठल्याही प्रस्तावाला थकबाकी वसुली होईपर्यंत व ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केल्याशिवाय देण्यात येऊ नये असे महानगरपालिकेच्या अनुज्ञापन विभागास कळविण्यात आले आहे.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त तक्रारींनुसार, मक्त्याने दिलेल्या महापालिकेच्या एकूण १२ भूभागावरील मालमत्ता विभागाच्या ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय संबंधित जाहिरातधारक यांनी जाहिरात फलक उभारलेले आढळून आले. त्यापैकी एका जाहिरातीच्या होर्डिंगकरिता अतिरिक्त भुईभाड्याच्या अधिमूल्याची वसुली करून महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागामार्फत परवानगी देण्यात आली आहे. उर्वरित ११ मालमत्तांवरील होर्डिंग्जकरिता उभारलेल्या जाहिरात फलकाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १९.०४.२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार जाहिरात शुल्क/अधिमूल्याचे व दंडात्मक रकमेचे परिगणन करून त्यानुसार वसुलीबाबतचे मागणीपत्र मे. सेल्व्हेल पब्लिसिटी अँन्ड कन्सल्टंट प्रा. लि यांना व संबंधित मक्तेदारास भरणा करण्याकरिता कळविण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या करनिर्धारण विभागाच्या अभिलेखानुसार, जुहू येथील मालमत्ता डायरेक्टर जनरल सिव्हील एव्हीएशन प्राधिकरणाच्या नावे करनिर्धारीत आहेत. सदर जमिनीवरील एकूण ५ जाहिरात फलकांचे करनिर्धारण भाडेकरू म्हणून सेल्व्हेल सिंडीकेट अशा नोंदीने करनिर्धारीत असून ही जाहिरात फलके निष्कासित झाल्याचे स्थळनिरिक्षणांती आढळून येते आणि सदर फलके माहे डिसेंबर २०२० पूर्वी वेगवेगळया दिनांकाला निष्कासित झाली आहेत.

दिनांक ३१.०३.२०१० पर्यंत मालमत्ता कराची आकारणी करपात्रमुल्याधारित होती. मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १५४ नुसार वाजवी रितीने भाडयाने देता येईल अशा भाडयावर १०% वजावट देऊन करपात्रमूल्य निश्चित करण्याची तरतूद वापरात होती. तसेच जर उपलब्ध भाडे करार वा करदात्याने घोषित केलेले वार्षिक भाडे वाजवी भाडयापेक्षा जास्त असेल तर असे जास्तीचे भाडे विचारात घेऊन करपात्र मूल्य निश्चित केले जात होते.

मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १५४ नुसार वार्षिक वाजवी भाडे वा उपलब्ध करार वा घोषित केलेले भाडे यापैकी जे अधिकचे भाडे आहे ते विचारात घेऊन मे. सेलवेल पब्लिसिटी ॲण्ड कन्सल्टंट प्रा. लि. यांचे करपात्रमूल्य निश्चित केलेले असावे. परंतु सदर जाहिरातदार संस्थेने एकापेक्षा अनेक करार केले असावेत किंवा कसे? याबाबत खातरजमा करण्याची यंत्रणा करनिर्धारण खात्याकडे उपलब्ध नाही. परंतु मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १५४ ची पुर्तता होत असेल तर त्यानुसार करनिर्धारण निकष पाळले जात असल्याने पुरेसे होते.

दिनांक ०१.०४.२०१० पासून मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १५४ (१ अ) मधील तरतुदीनुसार भांडवली मुल्याधारीत करप्रणाली स्विकारली आहे. यामध्ये जाहिरात फलकांचे मुख्यतः क्षेत्रफळ विचारात घेऊन कलम १५४ (१ क) अंतर्गत मंजूर नियमावलीनुसार इतर गुणांक घेऊन जाहिरात फलकांचे भांडवलीमुल्य निश्चित केले जाते व त्यावर मालमत्ता कर आकारणी होते. यामध्ये भाडे आकारणीचा विचार केला जात नाही. त्यामुळे सदर भाडे आकाराची बाब करनिर्धारणावर कोणताही प्रभाव पाडत नसल्याने हा विषय करनिर्धारणाशी निगडीत राहत नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागामार्फत फक्त होर्डिंग्ज संरचनेची आवश्यक मोकळया जागेच्या अनुषंगाने छाननी करण्यात येते व त्यानुसार महानगरपालिकेच्या अनुज्ञापन विभागास अभिप्राय देण्यात येतो.

**********

H-1211-1A

# महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना**

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री.सुरेश भोळे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"नाशिक जिल्ह्यातील मालेगाव महानगरपालिकेत केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमा अंतर्गत मौजे माळधे व सायने येथील घरकुल बांधणे कामासाठी ठेकेदार मे.ए.व्ही.पंधे सोलापूर व मे.ए.व्ही.पंधे इन्फ्राकॉन्स सोलापूर यांना सन २००९ साली ४३३.५६ कोटी रुपयांच्या कामात कोट्यावधी रुपयांचा आर्थिक घोटाळा केल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, सदरहू ठेकेदार कंपनीने महापालिका आयुक्त, उपायुक्त आणि संबंधित अधिकारी यांचेबरोबर आर्थिक संगनमत करुन सदरहू भ्रष्टाचार करण्यात येणे, मालेगाव शहरात सदरहू योजनेचे ५० टक्केही काम पूर्ण झालेले नसताना कागदोपत्री पूर्ण झाल्याचे दाखवून ठेकेदारास २२.४७ कोटींचे बिल ॲडव्हान्सपोटी अदा केल्याचा घडलेला प्रकार, गतवर्षी महानगरपालिकेकडे वेगवेगळ्या कामाचे शिर्षक तयार करुन ठेकेदाराने नियमबाह्यपणे पत्र देऊन केलेली ४६.२७ कोटी रुपयांची मागणी मा.आयुक्तांनी मंजुर करुन सदर रक्कम अदा करण्यात येणे, तसेच सदरहू योजने अंतर्गत महानगरपालिकेचे मोबेलायझेशन ॲडव्हान्स, स्टील ॲडव्हान्स, मटेरियल ॲडव्हान्स च्या बदल्यात घेण्यात आलेली बँक गॅरंटी नुतनीकरण न केल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान होणे, सदरहू योजनेच्या भ्रष्टाचाराची चौकशीसाठी मनपाने नेमलेले उपायुक्त सतीश दिघे यांनी आपला अहवाल मा.आयुक्त, मनपा यांना दि.२९.१२.२०२२ रोजी सादर करण्यात येऊनही चौकशी अहवालात अनेक गंभीर मुद्दे नमूद असतानाही सदरहू प्रकरणी अद्याप आयुक्तांनी पोलीसांत तक्रार दाखल करुन कोणतीच कार्यवाही न करता प्रकरण दडपून टाकण्यात येणे, यामुळे मालेगाव महापालिकेचे झालेले प्रचंड आर्थिक नुकसान, यासंदर्भात मा.मुख्यमंत्री यांना दि.१३/२/२०२३ रोजी लेखी निवेदन देण्यात येऊनही अद्याप महापालिकेचे आयुक्त, शहर अभियंता, उपअभियंता व संबंधितांवर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास प्रकल्पांतर्गत मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातील म्हाळदे येथील प्रकल्प क्र.१ ते ७ व क्र.१६ मध्ये एकूण ११५२० व सायने येथील प्रकल्प क्र.१७, १८, १९ मध्ये एकूण ४३२० असे एकत्रितपणे १५८४० घरकुलांस केंद्रीय मान्यता समितीने दिनांक १५/०१/२००९ रोजी मान्यता दिलेली आहे. उक्त घरकुल बांधण्याच्या कामासाठी मालेगाव महानगरपालिकेने म्हाडाकडील सर्व पुर्व अर्हता असलेल्या मक्तेदारांकडून EOI मार्कविण्यात येऊन मक्तेदार मे.ए.व्ही.पंधे, सोलापुर व मे.ए.व्ही.पंधे इन्फ्राकॉन्स, सोलापुर यांना मौजे म्हाळदे येथील घरकुल बांधण्याच्या कामासाठी दिनांक ०१/०८/२००९ अन्वये व मौजे सायने येथील कामांसाठी दिनांक ०१/०६/२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला होता. प्रत्यक्षात सदर योजना राबवित असताना गावातील नागरीकांचा विरोध, मुख्य योजना शहरापासून ३ कि.मी. लांब असल्याने, तसेच राजकिय दबाव व स्थलांतरास नागरीकांचा विरोध

याप्रकारच्या अडचणींमुळे योजना पुर्णत्वास विलंब झालेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, उक्त १५८४० घरकुलांपैकी अद्यापपर्यंत ७९८० घरकुलांचेच काम मक्तेदाराने पुर्ण केलेले आहे. त्यापैकी १९०७ पात्र लाभार्थींना घरकुलाचे वाटप करण्यात आलेले असून, उक्त लाभार्थी तेथे रहिवास करीत आहेत.

उक्त घरकुलांचे कामासाठी मक्तेदार यांच्या मागणीनुसार व करारनाम्यातील अट क्र.३२(१) नुसार मक्तेदारास मंजुर कामापोटी निविदा अटीशर्ती नुसार देण्यात आलेला मोबेलायझेशन ॲडव्हान्स, स्टील ॲडव्हान्स, मटेरियल ॲडव्हान्स हा बँक गॅरंटीच्या मोबदल्यात देण्यात आलेला आहे. सदर मोबेलायझेशन ॲडव्हान्स हा कामाच्या प्रगतीनुसार मक्तेदाराकडून वसूल करावयाचा आहे. मक्तेदार यांनी वेळोवेळी दिलेल्या बँक गॅरंटी नुतनीकरण करुन देण्याबाबत महानगरपालिकेमार्फत मक्तेदार यांना वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. तथापि, याबाबत मक्तेदाराविरुध्द NCLT न्यायालयात दावा दाखल असल्यामुळे बँक गॅरंटी नुतनीकरण करुन देणे शक्य नसल्याबाबत मक्तेदाराने कळविलेले आहे. तसेच, कोरोना कालावधीत काम बंद असल्याने निविदा अटीशर्ती नुसार उर्वरित रक्कम रु.२२.४७ कोटी रक्कम ही मक्तेदाराकडून वसुल करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

जानेवारी २०२२ मध्ये मक्तेदार मे.ए.व्ही.पंधे यांनी NCLT या न्यायालयात दाखल याचिकेनुसार त्यांचे करीता नियुक्त Resolution Professional यांचेमार्फत महानगरपालिकेस दरवाढ, विलंब आकार, व्याज व योजनेवरील अपेक्षित नफा गृहित धरुन रु.४६.२७ कोटीची मागणी केलेली आहे. सदर मागणीबाबत वकिलामार्फत सविस्तर उत्तर तयार करुन मक्तेदाराची मागणी ही निविदा अटीशर्तीला धरुन नसल्याने ती फेटाळून त्यानुसार Resolution Professional यांना महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आलेले आहे. याप्रकारची कोणतीही रक्कम मक्तेदारास महानगरपालिकेमार्फत अदा करण्यात आलेली नाही व मान्यही करण्यात आलेली नाही.

मक्तेदारास दिलेल्या विविध ॲडव्हान्स पोटी संपुर्ण रक्कम समायोजनाची कार्यवाही न झाल्याच्या कारणास्तव महानगरपालिका आयुक्त यांनी दिनांक ३०/१२/२०२२ च्या आदेशान्वये सविस्तर चौकशीसाठी चौकशी समिती नियुक्त केलेली आहे. याबाबत मालेगाव महानगरपालिका अंतर्गत राबविलेल्या केंद्र पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत नमुद मक्तेदार यांच्याकडे रु.२२.४७ कोटी एवढा अग्रीम रक्कम व्याजासह वसुल करणेबाबत कायदेशीर प्रक्रिया सुरु करण्याकरीता उचित प्राधिकरणाकडे दावा दाखल करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु असून मक्तेदार यांचे विरूद्ध दिवाणी न्यायालय,मालेगाव येथे रजिस्टर क्र.१२२७/२०२३,दिनाक.०८.०६.२०२३ अन्वये दावा दाखल करण्यात आलेला आहे.

गृहनिर्माण विभागाच्या दिनांक २५/०९/२०१८ व दिनांक २६/११/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये IHSDP व BSUP अंतर्गत बांधण्यात आलेली व वितरीत न केलेली घरकुले प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. याबाबत अवितरीत घरे प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्र लाभार्थ्यांना वितरीत करण्यास परवानगी मिळण्याबाबत महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच केंद्र शासनाच्या एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत प्राप्त शासन निर्णय व मार्गदर्शक सुचनांनुसारच महानगरपालिकेमार्फत उक्त योजनेचे काम करण्यात आलेले आहे.

\.............................................

लक्षवेधी सूचना

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. सुभाष धोटे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

" राज्यातील चंद्रपूर जिल्हास्थित चंद्राकोल आणि त्याचेशी संबंधित कोहली ट्रान्सपोर्ट आणि स्वामी फ्युल कंपनी कोल इंडियाच्या खाणीतून कोळसा घेऊन महाजेनकोच्या पॉवर स्टेशनपर्यंत पोहचवणे तसेच कोल ट्रेडिंगचे काम करीत असणे; संबंधित कंपनी गोडेगांव, सिंगौरी, गोकुळ खदान, एमकेडी-१, एमकेडी-३, उमरेडच्या खाणीतुन कोळसा वाहतुकीचे काम करीत असणे; सदरहू कंपनी कोळसा पुरवठा बिलासपूर, वणी (यवतमाळ), मुजटवन सह मराठवाड्याच्या अनेक भागांत करीत असंणे; महाजेनको मध्ये कोळसा वाहतुकीचे काम इतर कोणत्याही कंपनीने घेऊ नये यासाठी चंद्राकोल व त्याचेशी संबंधित अन्य कंपन्यांनी कमी खर्चात वाहतुक ठेक्याचे काम घेण्यात येणे, सन २०१८ पासून सातत्याने या कामासाठी कंपनीने हातमिळवणी करून एकाधिकार प्राप्त केला असणे; चंद्राकोल आणि त्याचेशी संबंधित कोहली ट्रान्सपोर्ट आणि स्वामी फ्युलने महाजेनकोला हजारो करोड रुपयांचा चुना लावला असणे; खासकरून लॅब टेक्नीशीयन, ज्यांना कोळशाची गुणवत्ता चेक करण्याचे काम दिले गेले असणे; सूत्रानुसार १०० ते २०० रुपये टन खराब कोळसा पास करण्याचा रेट फिक्स केला गेला असणे; या घोटाळ्याचा परिणाम असा झाला की अनेक वर्षांपासून महाजेनको मध्ये जी वीज कमी कोळशापासून बनत होती, खराब कोळशामुळे कोळशाची मांगणी जवळपास २५% वाढली असणे; महाजेनको मधून २ ते ३ लाख टन कोळशाची शॉर्टफॉल स्थिती निर्माण झाली व या घोटाळयामुळे वीजेचा खर्च वाढल्याचा भुर्दंड सर्वसामान्य जनतेला सहन करावा लागला असणे; चंद्राकोल कोल इंडियाच्या खाणीतून उच्च प्रतीचा कोळसा उचलते परंतु महाजेनकोच्या पॉवर प्लांट पर्यंत पोहचेपर्यंत तो खराब क्वालिटी मध्ये बदलला जातो, अर्ध्या रस्त्यात चांगला कोळसा काढून त्यात तारकोलची भेसळ करून महाजेनको पर्यंत पोहचवला जात असणे; येथून मिळालेला चांगल्या क्वालिटीचा कोळसा इतर खाजगी कंपन्यांना मोठ्या रकमेच्या मोबदल्यात अवैधरित्या विक्री केला जात असणे; या संपूर्ण अवैध, निकृष्ट दर्जाची कोळसा वाहतुक, बिल, डमी नोंदीची तसेच करोडो रुपयांच्या कोळसा घोटाळ्याची उच्चस्तरीय निष्पक्ष चौकशी स्थापित करून भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाईची मांगणी स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध संघटनांचे पदाधिकारी यांनी जिल्हा खनिज अधिकारी, चंद्रपूर, कोयला नियंत्रक, नागपूर यांच्याकडे करूनही यावर कोणतीही उच्च स्तरीय चौकशी करून कारवाई करणेबाबतीत होत असलेले दुर्लक्ष, टाळाटाळ यामुळे स्थानिक जनतेत शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.."

शेरा - ऊर्जा ०९२ (६५०-७-२०२३)

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री ( ऊर्जा ) यांचे निवेदन

कोळसा व्यवस्थापनाचे कार्य विद्युत व कोळसा मंत्रालय, भारत सरकार (नवी दिल्ली) यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार केले जाते. महानिर्मितीमार्फत रेल्वेमार्ग (Rail Mode), रेल कम रोड (RcR) आणि रस्ता वाहतुक (Road Mode) द्वारे औष्णिक विद्युत केंद्रांना कोळसा पुरवठा केला जातो. महानिर्मितीच्या औष्णिक विद्युत केंद्रांसाठी वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड (WCL), साउथ इस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड (SECL), महानदी कोलफिल्ड लिमिटेड (MCL) आणि सिंघारेनी कॉलीएरीज कंपनी लिमिटेड (SCCL) यांच्या खाणीतून कोळसा पुरवठा केला जातो. वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड (WCL) च्या खाणीपासून जवळ असलेल्या विद्युत केंद्रांना वाहतुकीच्या वेगवेगळ्या माध्यमांद्वारे कोळसा पुरवठा केला जातो.

महानिर्मितीने २०१८-१९ ते २०२२-२३ पर्यंत कोळसाच्या रस्ते वाहतुकीसाठी ३० खुल्या निविदा प्रसारित केल्या होत्या. कच्च्या कोळशाची औष्णिक विद्युत केंद्रापर्यंत वाहतुकीसाठी महानिर्मिती प्रचलित धोरणानुसार खुली निविदा जाहीर करून पात्र L१ धारकास कार्यादेश देते. ह्या निविदा पेनगंगा, मंगोली, भटाडी या कोळशाखाणीतून चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रासाठी तसेच गोंडेगाव, भानेगाव इंदर, शिंगोरी, उमरेर, मकरढोकराया कोळसा खाणीतून कोराडी आणि खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रासाठी काढण्यात आल्या होत्या. यामध्ये २६ वाहतूक कंपन्याने वरील निविदा सादर केल्या होत्या. तसेच या कामासाठी ५१ कार्यादेश दिले गेले आहेत. सदर कालावधीत खाणीतून कोळसा पुरवण्याचे कंत्राट १५ वाहतूक कंपन्यांना कार्यादेश देण्यात आले आहे. यापैकी मे.चंद्रा कोल प्रायव्हेट लिमिटेड यांना ५, मेसर्स कोहली रोडलाईन्स यांना ३ व चंद्रा ट्रान्स लॉजिस्टिक्स यांना ९ कार्यादेश देण्यात आले.

कोविड (करोना) संपल्यानंतर मागील दोन वर्षापासून विजेच्या मागणीत प्रचंड वाढ झाली आहे, त्यामुळे कोळशाच्या मागणीत वाढ झाली आहे. विद्युत व कोळसा मंत्रालय, भारत सरकार (नवी दिल्ली) यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना नुसार महानिर्मितीकडून कोळसा व्यवस्थापनाचे कार्य केले जाते. कोळसा मंत्रालय यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रत्येक औष्णिक विद्युत केंद्राला किमान २० ते २६ दिवस पुरण्याइतका कोळसा साठा ठेवणे अनिवार्य आहे. महानिर्मितीला औष्णिक विद्युत केंद्रामध्ये कोळसा साठा पुरेसा नसल्यामुळे कोळसा व विद्युत मंत्रालय, भारत सरकार यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनानुसार रेल्वेच्या मर्यादेमुळे महानिर्मितीला रस्ते वाहतुकीने कच्चा कोळसा घेणे क्रमप्राप्त आहे. महानिर्मितीने कोळशाचे गुणवत्तेचे निकषाचे सिंफर मार्फत तपासणी अहवाल दिला आहे. त्यामुळे खराब कोळशामुळे मागणीत २५% वाढ झाली किंवा दोन ते तीन लक्ष टन कोळशाचा शॉर्टफॉल झाल्याची आढळून आले नाही.

महानिर्मितीला वर्ष २०१८-२३ (फेब्रुवरी पर्यन्त) पुरवठादारांनी पुरवलेला कोळसा खालील तक्त्यात दर्शवला आहे.

| वित्त वर्ष | महानिर्मितीला प्राप्त एकूण कोळसा (सर्व मार्गानि) (हजार मे टन) | रस्ते वहातुकीने (Road Mode) एकूण कोळसा (हजार मे टन) | चंद्रा कोल प्रा लि + चंद्रा ट्रान्स लॉजिक +कोहली ट्रान्स लॉजिस्टिक यांची पुरवलेला कोळसा (हजार मे टन) | चंद्रा कोल प्रा लि + चंद्रा ट्रान्स लॉजिक +कोहली ट्रान्स लॉजिस्टिक यांची महानिर्मितीच्या एकूण कोळशामध्ये टक्केवारी | चंद्रा कोल प्रा लि + चंद्रा ट्रान्स लॉजिक +कोहली ट्रान्स लॉजिस्टिक यांची एकूण रस्ते वहातुकीने प्राप्त कोळशामध्ये टक्केवारी % | इतर वाहतूकदार |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१८-१९ | ३५८९२ | ३३३० | १२०२ | ३.३५ | ३६.१० | मे.बी.के.खंडेलवाल,<br>मे. आयटीसी & डीटीसी जेव्ही,<br>मे. एम एफ जैन,<br>मे. पुनया कोल रोड लाइन्स,<br>मे. अवनिश लॉजिस्टिक्स प्रा.लि,<br>मे.पंजाब ट्रान्सपोर्ट कंपनी,<br>मे. खंडूजा कोल ट्रान्सपोर्ट कंपनी ,<br>मे . सिद्धिविनायक ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन,<br>मे. राधागोविंद कॅरियर,<br>मे. साकार इन्फ्रा निर्माण प्रायव्हेट लिमिटेड,<br>मे. खंडेलवाल अर्थमूव्हर्स,<br>मे. कॅलिबर मर्कंटाइल्स प्रायव्हेट लिमिटेड,<br>मे. लोकेश इंडस्ट्रियल सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड |
| २०१९-२० | ३७०७० | ४०१३ | १०६८ | २.८८ | २६.६२ | |
| २०२०-२१ | ३२९६८ | १९४८ | ३७२ | १.१३ | १९.०९ | |
| २०२१-२२ | ३८२६५ | २५८१ | ४२० | १.१० | १६.२७ | |
| २०२२-(फेब्रु.२३ पर्यन्त) | ४११८२ | १२९९ | २६९ | ०.६५ | २१ | |
| २०१८ पासून फेब्रु.२३ पर्यन्त | १८९३५० | १३७९० | ३३८७ | १.७९ | २४.५६ | |

उपरोक्त माहितीनुसार महानिर्मितीने खुल्या निविदेद्वारे इतर वेगवेगळ्या कंपन्यांना कंत्राट दिलेले आहे. चंद्रा कोल प्रा. लि., चंद्रा ट्रान्स लॉजिस्टिक आणि कोहली ट्रान्स लॉजिस्टिक यांच्याकडून रस्त्याने प्राप्त झालेल्या कोळश्याची मात्रा ३३८७ हजार मे.टन ही एकूण प्राप्त झालेल्या कोळशाच्या १८९३५० हजार मे. टन तुलनेत १.७९% असुन एकूण रस्ते वहातुकीने प्राप्त कोळशामध्ये फक्त २४.५६% म्हणजे ३३८७ हजार मे. टन कोळसा पुरविण्याचे कंत्राट दिले आहे.

महानिर्मितीतर्फे लोडिंग (Loading) आणि अनलोडिंग (Unloading) या दोन्ही ठिकाणी मे. सींफर या केंद्रीय संस्थेमार्फत कोळशाची गुणवत्ता तपासणी केली जाते. शिवाय कोळसा चोरी होऊ नये

म्हणुन GPS व RFID यंत्रणेचा वापर केला जातो. महानिर्मितीला कोळसा पुरविण्यासाठी खाणीतून प्रकल्पापर्यंत जाणाऱ्या कच्चा कोळशावर (Raw Coal) नियंत्रण व दर्जा तपासणीचे काम हे केंद्रशासनाच्या मे. सींफर-केंद्रीय खनन एवं इंधन अनुसंधान संस्थान (CIMFR- Central Institute of Mining & Fuel Research)- या केंद्रीय संस्थेला कराराद्वारे देण्यात आलेले आहे. ही संस्था खाणीच्या ठिकाणी तसेच विद्युत केंद्रामध्ये कोळशाचे नमुने घेणे व त्यांच्या स्वतःच्या लॅब मध्ये तपासणी करण्याचे काम करत आहे. यामध्ये महानिर्मितीच्या कोणत्याही कर्मचाऱ्याचा काहीही हस्तक्षेप येत नाही. महानिर्मिती मध्ये औष्णिक विद्युत केंद्रांना कोळशाची कमतरता आढळून आलेली नाही चांगला कोळसा काढून खराब कोळश्याची भेसळ होऊ नये म्हणुन नियंत्रण कक्षाची स्थापना केलेली असुन त्याद्वारे ट्रकच्या हालचालीवर २४ तास निरीक्षण ठेवले जाते. शिवाय ठरवून दिलेल्या प्रमाणित संचालन प्रक्रिया (SOP)ची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते. महानिर्मिती मध्ये प्राप्त होणाऱ्या कोळशाची गुणवत्ता ही सिम्फर द्वारा तपासणी केल्यानंतर चांगल्या गुणवत्तेची आढळून आली आहे यामध्ये कोणत्याही प्रकारची भेसळ आढळून आलेली नाही. कोळशाचा दर्जा, प्रमाण व गुणवत्ता राखण्यासाठी खापरखेडा, चंद्रपूर आणि कोराडी औष्णिक विद्युत केंद्रापर्यंत रस्ते मार्गाने कोळसा वाहतुकीसाठी काळजी घेण्यात येते.

स्थानिक प्रतिनिधी, चंद्रपूर यांचेकडुन अवैध, दुय्यम दर्जाचा रिजेक्ट कोळसा वाहतुक, विना परवाना वाहतुक, भ्रष्टाचार व चोरी याबाबत निष्पक्ष चौकशी करण्याबाबत निवेदन, जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर यांना प्राप्त झाले असुन सदर निवेदनातील बाबी केंद्र शासनाच्या अखत्यारितील असल्याने सदर निवेदन कोयला नियंत्रक, कोयला नियंत्रक संगठना, कोयला मंत्रालय, भारत सरकार, प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांना पाठविण्यात आले आहे.

******************

लक्षवेधी सूचना क्र. ८९

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. अमित साटम, ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, कॅप्टन आर. सेल्वन विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

""मुंबईतील मंत्रालयातून चालणाऱ्या बनावट भरतीचे धक्कादायक रॅकेट उघडे झाले असणे, माजी सामाजिक न्यायमंत्री यांच्या नावाचा वापर करुन नियुक्ती आदेशाचे बनावट पत्र देत मंत्रालयातील कर्मचारी लिपिक भरतीचे रॅकेट चालवत असल्याचे उघड झाले असणे, बोगस लिपिक भरती रॅकेटप्रकरणी गोवंडी पोलिसांनी एका मंत्रालयीन कर्मचाऱ्यासह तिघांविरुध्द गुन्हा नोंदवत एकाला अटक ही केली असणे, मंत्रालयात सामाजिक न्याय विभागात लिपिकपदाची नोकरी लावण्याचे आमिष दाखवून लाखो रुपये उकळणाऱ्या टोळीने उमेदवारांचा विश्वास संपादन करण्यासाठी बनावट आदेशपत्रांसह सामाजिक न्याय विभागाच्या बनावट ई- मेल आयडीचा वापर केल्याचे उघड झाले असणे, याबाबत गोवंडी पोलिस अधिक तपास करत असणे, यापूर्वी ही गेल्या डिसेंबर अखेरीस गुन्हे शाखेच्या कक्ष-६ ने मंत्रालयातील बोगस लिपिक भरती प्रकरणात मंत्रालयात शिपाई पदावर असलेल्या सचिन डोळस याच्यासह महादेव शेदू शिरवाळे, नितीन कुंडलिक साठे, प्रकाश सकपाळेलाही अटक केली असणे, धक्कादायक बाब म्हणजे, सामान्य प्रशासन उपसचिवांच्या केबिनमध्येच उमेदवारांच्या मुलाखती घेतल्याचे समोर आले असणे, याप्रकरणामुळे सर्वसामान्य नागरीकांमध्ये शासनाच्या विरोधात निराशेची भावना मोठया प्रमाणात निर्माण झाली असणे, मंत्रालयातून चालणाऱ्या बोगस लिपिक भरतींच्या घोटाळयातील दोषी कर्मचाऱ्यांवर शासनाने करावयाची कडक कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.""

---

## मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

माहे ऑक्टोबर, २०२० च्या दरम्यान आरोपींनी फिर्यादीच्या मुलाला मंत्रालयात सामाजिक न्याय विभागामध्ये क्लार्क पदावरील नियुक्तीचे बनावट नोकरी आदेश देऊन त्याबदल्यात फिर्यादीकडुन रुपये ७,३०,०००/- स्वीकारले होते. याबाबत फिर्यादीस आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलीसात तक्रार करतो. असे आरोपीला सांगितले असता स्विकारलेल्या एकूण रक्कमेपैकी रू.२,००,०००/- आरोपीने फिर्यादीस परत केले. तथापि उर्वरीत रक्कम न दिल्याने फिर्यादीने दिलेल्या फसवणूकीच्या तक्रारीवरून आरोपींविरोधात गोवंडी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.६९/२३ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यातील सर्व पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींमध्ये दोन आरोपी हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त असलेल्या बार्टी, पुणे या संस्थेमार्फत बाह्यस्त्रोताव्दारे नियुक्त कर्मचारी होते व त्यांच्या सेवा लिपिक-टंकलेखक व शिपाई म्हणून

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य या मंत्रालयीन विभागास उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. या दोघांच्या सेवा यापूर्वीच परत करण्यात आलेल्या असून अटक आरोपींमध्ये या दोघांचा समावेश आहे.

सदर अटक आरोपीकडून गुन्ह्यातील बनावट नियुक्ती आदेश व ईमेल आयडी बनविण्यासाठी वापरण्यात आलेला लॅपटॉप तसेच पैशाच्या व्यवहाराचे बॅक स्टेटमेंट ताब्यात घेण्यात आले असून गुन्ह्यात जप्त केलेल्या लॅपटॉप मधील हार्ड डिस्क ही तांत्रिक विश्लेषणासाठी संचालक रासायनिक विश्लेषण प्रयोगशाळा कलीना, सांताक्रुज येथे पाठविण्यात आली आहे. सदर गुन्ह्यात मा. न्यायालयामध्ये दोषारोपपत्र सादर केले असून, प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

अशाच प्रकारे जानेवारी, २०२० ते जुलै, २०२१ दरम्यान मंत्रालयातील एक शिपाई व एक चोपदार असे दोघेजण व बाहेरील इतर सहाजण अशा एकूण आठ आरोपींनी संगनमत करून सरकारी पदाची नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून फिर्यादी व इतर युवकांची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. याकरीता आरोपींनी फिर्यादी व इतर युवकांच्या मुलाखतीचा बनाव रचून मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील केबिनमध्ये मुलाखती घेवून, नियुक्तीची बनावट कागदपत्रे तयार करुन दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याबाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हे प्रकटीकरण शाखा, मुंबई येथे दिनांक १९/१२/२०२२ रोजी गु.र.क्र.३१६/२०२२, भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, १७०, १२० ब अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील सर्व आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात एकूण ३४ बेरोजगार तरुणांची रुपये एक कोटी सत्याऐंशी लाख पन्नास हजार इतकी फसवणूक झाली असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर प्रकरणी आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रतिष्ठ आहे.

अशा घटनांना आळा घालण्यासाठी मंत्रालयीन कार्यालयाच्या जागेचा दूरूपयोग होवू नये यासाठी शासकीय वेळेनंतर तसेच सुट्टीच्या दिवशी मंत्रालयातील कार्यालये बंद करण्याबाबतच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांना सूचना देण्याविषयी सामान्य प्रशासन विभागास कळविण्यात आले आहे. कार्यालयीन वेळेनंतर अभ्यागत विनाकाम मंत्रालयात थांबणार नाहीत याबाबत आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सुचना मंत्रालय सुरक्षा कक्षाला देण्यात आल्या आहेत.

--------------------

लक्षवेधी सूचना क्र. ५६८

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

**श्री. संजय केळकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"ठाणे भिवंडी शहरालगतच्या कारोवली ग्रामपंचायत हद्दीतील सुभाष नगर नालायार येथील मनीन शेख चाळीत ईदगार रोड कारीवली इमारतीत अनाधिकृतपणे एक टेलिफोने एक्सचेंज चालविले जात असल्याची बाब दि. १७ फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्या दरम्यान उघडकीस येणे. तबरेज मोमीन नावाचा व्यवसायाने एजंट असलेल्या या इसमाने कोणतीही परवानगी न घेता अनाधिकृतपणे आंतरराष्ट्रीय कॉल करण्यासाठी त्याचा बिनधास्त वापर करत असल्याचे उघड होणे. तथापि आंतरराष्ट्रीय कॉल हे टेलिफोन नेटवर्कमधून पाठविण्यासाठी दूरसंचार तसेच माहिती तंत्रज्ञान मंत्रालय विभागाची परवानगी घेणे आवश्यक असणे. मात्र तशी कोणतीही परवानगी नसताना सदरचा इसाम त्याच्या जवळील यंत्रणेव्दारे आंतरराष्ट्रीय कॉल भारतातील इच्छित मोबाईलवरून अनाधिकृत रित्या फिरवीत असल्याचे उघड होणे. या प्रकारामुळे भारत सरकारचे आर्थिक नुकसान झाले असून अशा प्रकारचे आंतरराष्ट्रीय कॉलचे माध्यमातून दहशतवादी कारवाया पसरविण्यासाठी व त्यांना मदत करण्यासाठी वापरली जाण्याची भीती व्यक्त होणे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून ठाणे दहशतवाडी पथकाने करून या घत्नेकडे बिविध बाजूने तपास होण्याची मागणी होणे व यात अन्य एखादी टोळी कार्यरत असावी असाही संशय नागरिकांमधून व्यक्त होणे. याही बाजूने ठाणे दहशतवाडी पथकाने या प्रकरणी लक्ष घालून सखोल चौकशीची मागणी होणे. याबाबत शासनाने केलेली कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतीक्रिया."

---

**मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

दिनांक १५/०२/२०२३ रोजी दहशतवादी विरोधी पथक, युनिट ठाणे, मुंबई यांना गुप्त बातमीदाराकडुन मतीन चाळ, सुभाषनगर, नालापार कारवली रोड, भिवंडी येथे एका घरामध्ये अनधिकृत सिमबॉक्सचा सहाय्याने परदेशातुन येणारे आंतरराष्ट्रीय कॉल्स हे बेकायदेशिरपणे राऊट करण्यासाठी अनधिकृत टेलीकॉम एक्स्चेंज चालविले जात असल्याची बातमी प्राप्त झाली. त्यानुसार दहशतवादी पथकाने त्या ठिकाणी छापा टाकला असता, आरोपी तबरेज सोहराब मोमीन हा खोलीमध्ये लाकडी फळीवर, विद्युत जोडणी केलेले राऊटर, अँन्टेना, पॉवर केबल व सिमकार्डसह आढळुन आला.



(कृ.मा.प.)

आरोपी तबरेज सोहराब मोमीन याने परदेशातुन येणारे आंतरराष्ट्रीय कॉल त्याच्याकडील उपकरणाद्वारे भारतातील इच्छीत मोबाईल नंबरवर अनधिकृतरित्या राऊट करून फिरवून स्थानिक मोबाईल सेवा देणाऱ्या कंपन्याचे तसेच भारत सरकारचे आर्थिक नुकसान होते आणि अशा प्रकारच्या कॉल्सचे अनधिकृत नियंत्रण करून देशाच्या सुरक्षिततेला मोठा धोका निर्माण केल्याने त्याच्याविरुध्द दि. १६/०२/२०२३ रोजी भोईवाडा पोलीस ठाणे, भिवंडी येथे गु.र.क्र. ५१/२०२३, भा.दं.वि. कलम ४२० सह भारतीय बिनतारी यंत्र अधिनियम १९३३ च्या कलम ३ व ६ तसेच भारतीय तार अधिनियम १८८५ च्या कलम ४, २० व २५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये तबरेज सोहराब मोमीन सह अन्य ०४ आरोपींचा समावेश असल्याचे निष्पन्न झाले असल्याने, सर्व ०५ आरोपींना अटक करण्यात आली होती. सदर प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून ०५ आरोपींपैकी ०४ जणांविरुध्द मा. न्यायालयामध्ये दोषारोप पत्र दाखल केले असून, ०१ आरोपीविरुद्ध दोषारोप पत्र दाखल करण्याची कार्यवाही चालू आहे.

--------------------

गृह विभाग | लक्षवेधी सूचना क्रमांक : ५७६

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.संजय केळकर, श्री.किसन कथोरे, ॲड.आशिष शेलार, विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ५७६ पुढीलप्रमाणे आहे :-

"ठाणे महापालिका प्रशासनातील श्री. महेश अहेर मूळ लिपिक म्हणून कार्यरत असताना सेवा सेवा ज्येष्ठतेचे व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय ०५.१०.२०१५ मधील तरतुदीचे उल्लघन करून सहाय्यक आयुक्त पदी नेमणूक होणे. तथापी श्री.अहेर हे आपल्या पदाचा वापर करून कुख्यात गॅगस्टारशी त्याचे संबंध असणे. त्यातूनच कळवा, मुंब्रा विधास्बेचे लोकप्रतिनिधीचे कुटूंबियांना जीवानिशी मारण्याची बाहेर राज्यातील गुंडाना सुपारी दिल्याची त्याच्या आवाजातील ऑडीओ क्लीप दि. १३.०२.२०२३ व त्या दरम्यान वर्तमानपत्रात उघडकीस येणे. परिणामी ठाणे शहरात खळबळ माजणे. तथापि आस्थापनेवरील लिपिक पदी असूनही शासन निर्णय ०५.०९.२०१८ मधील तरतुदीचे उल्लघन करून इतरांची सेवा ज्येष्ठता डावलून प्रत्येक वर्षी नियम बाह्य रित्या सहाय्यक आयुक्त पदी नेमणूक केली जाणे. तसेच शहर विकास अधिकारी म्हणून एकाच ठिकाणी अनेक वर्ष कार्यरत असणे. बदली होऊनही पुन्हा पुन्हा त्याच जागेवर नियुक्ती करणे. तथापि श्री.अहेर हे वादग्रस्त अधिकारी असून आपल्या पदाचा गैरवापर करून येथील नागरिकाचा आर्थिक व मानसिक चळ करीत असल्याचा आरोप होणे. सदर प्रकरणी लोकप्रतिनीधी २०.०७.२०२१ पासून २०२३ प्रर्यत अनेक लेखी तक्रार करूनही कारवाई न होणे, तसेच अधिकृत बांधकामे व झोपडपट्टी धारकाच्या मूळ मालकांना बेदखल करणे व त्याच्या नावावरील घरे तोतया लाभार्थी उभे करून त्याच्या नावे घरे देणे. सदर प्रकरणामध्ये प्रंचड आर्थिक गैर व्यवहार होत असल्याचे उघड होणे. परंतु श्री.अहेर यांचे गॅगस्टारंशी संबंध असल्याने त्यांच्या कारवाई करण्यास वरिष्ठ अधिका-याबर मर्यादा येणे. परिणामी अहेर सारखे अधिकारी नियमबाह्य व बेकायदेशीर काम करीत असल्याचे नागरिकाकडून आरोप होणे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधितावर कारवाई ची मागणी होणे. याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा.उप मुख्यमंत्री (गृह) महोदय यांचे निवेदन

दिनांक १५.०२.२०२३ रोजी प्रसारमाध्यमावरुन प्रसारित झालेल्या ध्वनीफितीमध्ये दोन इसम हे ठाणे शहरातील आमदार श्री.जितेंद्र आव्हाड यांची परदेशात राहणारी मुलगी नामे नताशा ॲलन पटेल व जावई ॲलन पटेल यांचा घातपात करण्यासंबंधी चर्चा करण्यात येत असल्याचे दिसुन आलेले होते. सदर प्रकरणी मा.आमदार श्री.जितेंद्र आव्हाड व त्यांच्या पत्नी यांनी वर्तकनगर पोलीस ठाण्यात तक्रारी अर्ज दाखल केलेले आहेत. नमुद घटनेसंदर्भात वर्तकनगर पोलीस ठाणे येथे अदखलपात्र तक्रार रजि. नंबर- ३२३/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ५०६ प्रमाणे तक्रार नोंद करण्यात आलेली असून नमुद प्रकरणी सी.आर.पी.सी. कलम १५५(२) अन्वये सखोल तपास करण्याची परवानगी मिळणेकरीता मा.न्यायालयास लेखी अहवाल सादर करून तपास करणेबाबतची परवानगी घेण्यात आलेली आहे.

प्रसारमाध्यमांमध्ये प्रसारित झालेल्या ध्वनीफितीचे अवलोकन केले असता सदरची ध्वनीफित ही महेश आहेर, सहायक आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांचे नावाने प्रसारित झालेली असल्याचे दिसुन आलेले आहे. त्यामुळे नमुद ध्वनीफितीच्या संभाषणामधिल आवाज महेश आहेर यांचा आहे अगर कसे? याबाबतची तुलनात्मक तपासणी होणेकरीता महेश आहेर यांचे आवाजांचे नमुने घेण्यात आले असुन ते तपासणीकरीता मा.संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक.प्रयोगशाळा, विद्यानगरी, सांताक्रुझ, कलीना, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आले आहेत. सदर प्रकरणाचा तपास चालू आहे.

अनधिकृत बांधकामे व झोपडपट्टीधारकांच्या मुळ मालकांना बेदखल करणे, तसेच सदर प्रकरणामध्ये आर्थिक गैरव्यवहाराच्या अनुषंगाने श्री.आहेर यांचेविरोधात माजी नगरसेवकांनी पोलीस आयुक्त, ठाणे यांना तसेच इतर वरिष्ठ अधिकारी यांचेकडे तक्रारी अर्ज केले होते. सदर प्रकरणी ठाणे खंडणी विरोधी पथकामार्फत चौकशी करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी कारवाई न झाल्याने दिनांक २८.०२.२०२३ रोजी वर्तकनगर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज केलेला असुन श्री.महेश आहेर हे ठाणे महानगर पालीकेत कार्यरत असतांना त्यांनी केलेले नियमबाह्य कार्यासंबंधी त्यांचेवर आवश्यक ती कारवाई होणेकरीता सदर प्रकरणांची चौकशी चालु आहे.

---

लक्षवेधी सुचना क्र.२२७७

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. विकास ठाकरे, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख, श्री. सुनिल केदार वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२२७७ पुढील प्रमाणे आहे-**

"नागपूर येथील अजनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि.२५.०२.२०२३ रोजी एका मतिमंद मुलीवर एका ऑटोचालकाने जबरदस्ती शारिरिक अतयाचार केल्याची संतापजनक घटना घडली असणे, सदर तरुणी घरावजळील दुकान चॉकलेट आणण्यासाठी गेली असता तिचे अपहरण होणे, ती घरी परतल्यावर चौकशी केली असतांना तिच्यावर शारिरिक अत्याचार झाल्याची बाब समोर येणे, या घटनेमुळे शहरात खळबळ उडाळी असून नागरिक संताप व्यक्त करीत असणे, या घटनेतील आरोपीला पोलीसांना अटक केली असली तरी काही मुद्दे शासनाने विचारात घ्यावेत, ज्याप्रमाणे अल्पवयीन मुले-मुली यांच्या संदर्भातील अत्याचार प्रतिबंध कायदा आहे तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा आहे त्याच धर्तीवर दिव्यांग, मतिमंद, मुलीवरील अत्याचाराला प्रतिबंधक करण्यासाठी व आरोपींवर कठोर कारवाई करण्यासाठी नवीन कायदा शासनाने आणावा अशी जनतेतुन मागणी होत नसुनही त्याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करीत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड याबाबत शासनाने करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन अजनी पोलीस ठाणे, नागपूर येथे दि.२८.०२.२०२३ रोजी गु.र.क्र.१२२/२०२३, कलम ३६३, ३७६, ३७६(२) (L), ३७६ (२) (n) भा.द.वि. सं. R/W 3(1) (W) (i) 3(1) (W) (ii) 3 (2) (5a) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आलेली आहे.

पिडित मुलगी मतिमंद असून दि.२५.०२.२०२३ रोजी रात्री ०९.०० वा. फिर्यादिला चॉकलेट आणायला जाते असे सांगून घरातून निघून गेली. चॉकलेट आणायला नासरेच्या दुकानाजवळ, रामेश्वर रोड येथे आली असता तिचे पाठिमागून गुन्ह्यातील आरोपी येऊन तिला ऑटोमध्ये बसवुन चहाचे दुकानाजवळ नेले. तेथे पिडीत मंतिमंद मुलगी हिचेवर लैगिक अत्याचार केले असल्याचे फिर्यादीने फिर्यादीमध्ये नमूद केले आहे.

घटनेतील आरोपी मु.पो.बनाथर, ता. जि गोंदीया, रावणवाडी पोलीस ठाणे येथे राहाणारा असून त्याचेवर अजनी पोलीस ठाणे, नागपूर येथे गु.र.क्र.१२२/२०२३, कलम ३६३, ३७६, ३७६(२) (L), ३७६ (२) (n) भा.द.वि. सं. R/W 3(1) (W) (i), 3(1) (W) (ii), 3 (2) (5a) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम

अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

महिलांवरील अत्याचाराला प्रतिबंध करण्यासाठी पोलीस काका / पोलीस दीदी सारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत. तसेच निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे. राज्यात प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहे. पिडित महिलेला मनौधेर्य योजनेंतर्गत आर्थिक मदत दिली जाते.

---

गृह विभाग

लक्षवेधी सूचना क्र. २४५१

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे (अर्थसंकल्पीय अधिवेशन)**

**मा. श्री. नितेश राणे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्रात सकल हिंदू समाजाकडून हिंदु जन आक्रोश मोर्चाच्या माध्यमातून लव जिहाद, धर्मांतरण विरोधी कायदा लागू करण्याची मागणी होत असणे, सदर मोर्चामध्ये मोठ्या संख्येने जनसामान्य नागरिक रस्त्यावर उतरणे, तसेच महाराष्ट्रातील विविध शहरातील मुली आणि महिलांना आर्थिक प्रलोभन दाखवून; फसवून त्यांचे इस्लाम मध्ये धर्मांतरण करण्याचे षडयंत्र गेली अनेक दशके महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे निदर्शनास येणे, तसेच लव्ह जिहादमधून घडलेल्या श्रद्धा वालकर, आफताब, मुंबई येथील रुपाली चंदनशिवे च्या केस मध्ये भयावह गोष्टी संपूर्ण देशासमोर येणे, अशा घटनांचा तक्रार निवेदनावर राज्यातील पोलीस प्रशासनाकडून जलदगतीने कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसणे, तसेच लव जिहाद मधील केसेस मध्ये पोलिसांची फिर्यादी कडून तक्रार घेण्यास टाळाटाळ करणे, आणि संबंधित अशा प्रकारच्या केसेस मध्ये पैशांची मागणी होत असल्याचे निदर्शनात येणे, तसेच लव जिहाद धर्मांतराच्या प्रकरणी तत्परतेने अटक होऊन संबंधितांवर कारवाई होण्याच्या घटना अत्यल्प असणे, तसेच अहमदनगर, नाशिक, कोल्हापूर, पुणे, सातारा येथे गेल्या सहा महिन्यात २७ अल्पवयीन मुलींना प्रलोभन दाखवून फुस लावून पळवून नेल्याप्रकरणी संबंधित आरोपींवर पोस्को अंतर्गत गुन्हे दाखल होणे, याबाबत पोलीस प्रशासनाचे निष्क्रियता, भ्रष्टाचार, पीडितांनी पुढे येणे, लढ्यासाठी लागणारे मनोधैर्य, पैसा आणि पुढाकार आदी अनेक गोष्टी आरोपींना शिक्षा होणे किंवा न होणे यासाठी कारणीभूत असल्या तरी कायदा झाल्यामुळे पीडितांना 'आपल्या पाठीशी कायदा आहे' असे नैतिक पाठबळ असणे हे पाठबळ त्यांना अन्यायाच्या विरोधात आवाज उठवण्यास आणि लव जिहाद धर्मांतर करणाऱ्यावर वचक बसवण्यास निश्चितपणे उपयोगी ठरण्याची आशा असणे, आणि अन्य धर्मीयांकडून केल्या गेलेल्या धर्मांतराची कुठेही सरकारी नोंद नसणे, राज्यात जी धर्मांतरण होतात ती सक्षम सरकारी अधिकाऱ्यांसमोर त्यांची नोंद न होणे, आणि नोंद नसल्यामुळे राज्यात अनेक धर्मांतराचे प्रकार हे लपविले जात असणे, तसेच हिंदू बांधवांच्या दृष्टीने लव जिहाद, धर्मांतराचा कायदा हा अनन्यसाधारण महत्त्वाचा असणे, आणि उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश या राज्यात धर्मांतर विरोधी कायदा अस्तित्वात असणे, आणि त्यामुळे याच धर्तीवर महाराष्ट्रात देखील वाढत्या धर्मांतर व लव्ह जिहादच्या घटनांना आळा घालण्यासाठी धर्मांतर विरोधी कायदा लागू करून त्याची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता असणे, अशी मागणी देखील राज्यात विविध

ठिकाणी निघालेल्या हिंदू जन आक्रोश मोर्चे, आंदोलनातून केली जात असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

***********************************************************************

## मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये धर्मातरणाच्या व धर्मातरण करण्यासाठी प्रेम संबंध स्थापन करण्याबाबत तुरळक घटना घडल्या असून या घटनांमध्ये संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

आंतरधर्मिय विवाहाशी संबधीत घटनांची योग्य प्रकारे दखल घेऊन तथाकथित आंतरधर्मिय विवाह करुन जबरदस्तीने धर्म परिवर्तन घडवून आणल्याच्या घटनांमुळे तसेच, अशा प्रकारच्या घटना होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून दि. २७/०९/२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व पोलीस घटकांना सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

श्रद्धा वालकर, रा. वसई या मुलीची आफताब पुनावाला याने मे २०२२ मध्ये दिल्ली येथे निघृण हत्या केली असून नोव्हेंबर, २०२२ मध्ये सदर प्रकार उघडकीस आल्यानंतर याबाबत दिल्ली पोलीसांकडून हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरण उघडकीस आल्यानंतर राज्यात, धर्मांतरण विरोधी कायदा लागू करण्याची मागणी करण्यासाठी जन आक्रोश मोर्चे तसेच आंदोलने करण्यात आली.

रुपाली रमेश चंदनशिवे हिने इक्बाल शेख याच्यासोबत गेल्या तीन वर्षापूर्वी विवाह केला होता. संबंधितांमध्ये सतत होणा-या घरगुती वादातून इक्बाल शेख याने केलेल्या हल्ल्यात रुपाली रमेश चंदनशिवे हिचा मृत्यू झाला असल्याने तिचा पती आरोपी **इक्बाल महमद शेख** याच्याविरोधात टिळकनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ७७७/२२ अंतर्गत कलम ३०२ भादंवि सह ३१ (अ), १३५ म.पो. का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

धर्म बदलण्याचा आग्रह करणे, अज्ञानाचा फायदा घेऊन व अंधश्रद्धा पसरवून धर्मांतरण करणे, सामाजिक तेढ निर्माण करणे यासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यावर आरोपींविरुद्ध प्रचलित कायद्यांच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्यात येते.

--- *** ---

लक्षवेधी सूचना क्र. ४०१.

महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

श्री. सुनिल प्रभू, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ४०१ पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबईतील म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील गोरेगांव (पूर्व), बिबिसार येथील संक्रमण शिबिरातील १७ इमारतीतील ९५० कुटुंबांना ५०० रुपयावरून ३००० इतकी भाडेवाढ करुन सन २०१० पासून ते अद्यापर्यंतचे प्रती सदनिकाधारक यांना ९ लाख रुपये इतकी मोठी रक्कम भरण्याची अचानक नोटीस पाठविल्याचा धक्कादायक प्रकार दि.१६.०१.२०२३ रोजी निदर्शनास येणे, मुंबई मंडळाने सदरहू सदनिकाधारकांकडून सन २०२२ पासून घरभाडे घेण्यास नकार देऊन ऑनलाईन पद्धतीने भाडे भरण्यास नोटीसद्वारे कळविण्यात येणे, सदर नोटीसमध्ये प्रत्येक घराचे कोडनंबर व ऑनलाईन पद्धतीने भाडे कसे भरावे याबाबतची माहिती देण्यात येणे, तद्नंतर दि.१६.०१.२०२३ रोजी मंडळाने एप्रिल २०१० ते जानेवारी २०२३ पर्यंत दरमहा ३००० रुपये या प्रमाणे घरभाडे व त्यावर आतापर्यंतचे व्याजव दंड मिळून एकूण ९ लाख रुपये जादा दराने घरभाडे भरण्याच्या नोटीसा पाठविण्यात येणे, मंडळाने फेब्रुवारी २०२२ अखेर पर्यंत ५०० रुपये प्रमाणे दरमहा घरभाडे स्वीकारून मार्च २०२२ पासून भाडे घेण्यास नकार देऊन ऑनलाईन पद्धतीने भाडे भरण्यास कळविण्यात येणे, सदरहू रहिवाशी कुटुंबांना कोणतीही पूर्व कल्पना अथवा परिपत्रक न देता अचानक भाडेवाढ लादल्याने रहिवाश्यांमध्ये खळबळ निर्माण होणे, तसेच सदरहू थकीत देय लाखो रुपयाचे घरभाडे भरणे गरीब व मध्यमवर्गीय रहिवाशी कुटुंबांना सद्यस्थितीत परवडणारे नसून त्यांच्या आर्थिकदृष्ट्या अवाक्याबाहेर असणे, सदरहू प्रकरणात म्हाडाच्या मुंबई इमारत दु. व पु. मंडळाच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्याने कोणतीही माहिती न घेता परस्पर भाडेवाढीची व थकबाकीची नोटीस पाठविण्याचा घडलेला प्रकार हा खोडसाळपणाचा व चुकीचा असणे, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी मा.उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री यांना दि.३.२.२०२३ रोजीच्या सुमारास लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, सदरहू चुकीची नोटीस तत्काळ रद्द करुन पूर्ववत भाडे आकरण्याकरिता शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी मुंबईतील संक्रमण शिबीरातील रहिवाशी कुटुंबांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतीमधील रहिवाशांना त्यांची इमारत धोकादायक / अतिधोकादायक म्हणून जाहिर केल्यास, दुरुस्तीकामे हाती घेतल्यास अशा इमारतीमधील रहिवाशांना म्हाड अधिनियम १९७६ प्रकरण ८ व ८ अ मधील तरतुदीनुसार तात्पुरत्या स्वरुपात संक्रमण शिबीरामधील संक्रमण गाळ्याचे वितरण करण्यात येते. संक्रमण शिबिरांमध्ये वास्तव्य करणा-या पात्र / अपात्र अनधिकृत / घुसखोर रहिवाशांकडून प्राधिकरणाने दि. ०४.०२.२०१० रोजीच्या ठरावानुसार पात्र रहिवाशांना रुपये ५००/- प्रमाणे व अपात्र

/अनधिकृत / घुसखोर रहिवाशांना रु. ३,०००/- प्रमाणे सेवा शुल्क दि.०१.०४.२०१० पासून प्रति गाळा दरमहा आकारण्यात येत आहे. सद्यस्थितीमध्ये संक्रमण शिबिरामध्ये कोणतीही सेवाशुल्क वाढ करण्यात आलेली नसून, थकबाकीदार रहिवाशांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच, मासिक सेवाशुल्क थकबाकी रकमेवर प्राधिकरणाने दि.२०.०२.२००३ रोजीच्या ठरावानुसार विलंब आकार १.५ टक्के दरमहा आकारणी करण्यात येते.

बिंबिसार नगर गोरेगाव (पूर्व) संक्रमण शिबिरामध्ये एकूण १७ इमारती असून त्यामधील निवासी व अनिवासी असे एकूण ९५४ संक्रमण गाळे आहेत. जास्त थकबाकी असलेल्या ४८८ रहिवाशांना थकबाकीची रक्कम भरणा करणेबाबत नोटीस देण्यात आल्या आहेत. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात दिनांक ०१ जानेवारी २०२३ रोजीपर्यंत बिंबिसार नगर, गोरेगाव (पूर्व) येथील संक्रमण शिबिरामधील रहिवाशांकडून सेवाशुल्क थकबाकी रक्कम रुपये १५.६७ कोटी व विलंब आकार रुपये १५.८३ कोटी अशी एकूण रुपये ३२.५० कोटी इतकी रक्कम थकीत आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत संक्रमण शिबिर गाळ्यांचे सेवाशुल्क वसुलीसाठी ऑनलाईन ई- बिलींग पध्दत राबविण्यात येत आहे. जेणेकरून रहिवाशांना सेवाशुल्क भरण्याबाबत म्हाडा कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची गरज लागणार नाही. सदर ई-बिलींग प्रक्रियेमध्ये प्राधिकरणाने दि. ०४.०२.२०१० रोजीच्या ठरावानुसार अपात्र /अनधिकृत /घुसखोर रहिवाशांकडून सन २०१० पासून आकारण्यात येणारे सेवाशुल्क प्रति गाळा, प्रतिमहा रु. ३०००/- प्रमाणे दर्शविण्यात आली आहे. रहिवाशांना ई-बिलींग प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने सेवाशुल्क भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी व त्यानुसार ई-बिलींग प्रणाली मध्ये रक्कम दर्शविण्यासाठी काही कालावधीसाठी मंडळाने सेवाशुल्क स्वीकारणे बंद केले होते. तथापि, याबाबत सर्व संबंधित रहिवाशांना पूर्वसूचना देण्यात आली आहे.

ॲड. श्री. आशिष शेलार, मा. वि.स.स. यांनी दि. २३.०१.२०२३ रोजी मुंबईतील गिरण गावातील वरळी, लोअर परेल येथील म्हाडाच्या इमारतीमध्ये राहणा-या रहिवाशांना थकीत सेवाशुल्क वसुलीसंबधीत देण्यात आलेल्या नोटीसेस स्थगिती देणे व दरमहा सेवाशुल्कामध्ये रुपये २५०/- वरुन रुपये ५००/- करण्यात आलेली भाडेवाढ रद्द करण्यासाठी दिलेल्या निवेदनावर विधानसभेत दिलेल्या आश्वासनानुसार पुनर्रचित इमारतीतील गाळ्याचे सेवा शुल्क दरवाढ रद्द करून पूर्वीप्रमाणे प्रतिमहा रु २५०/- अशी पुर्वरत दि.१६.०३.२०२३ च्या पत्रान्वये दि. ०८.०३.२०२३ पासून अंमलात आणलेली आहे.

संक्रमण शिबिर गाळ्यामध्ये वास्तव्यास असणाऱ्या थकबाकीदार रहिवाशी यांचेकडून प्राधिकरणाने थकबाकी वसुल करणे आवश्यक असल्याने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने दि.१६.०१.२०२३ ते दि.३१.०३.२०२३ दरम्यान राबविण्यात येणाऱ्या विशेष मोहिमेच्या अनुषंगाने वसुलीसाठी नोटीस बजावण्यात आल्या असून, त्यानुसार वसुली करण्यात येत आहे.

******************

H/459-19

# विधानसभा लक्षवेधी सूचना

**श्री.विजय वडेट्टीवार,श्री.सुनिल केदार, श्री.अस्लम शेख, श्री.झीशान सिद्दिकी, श्री.अमिन पटेल, प्रा.वर्षा गायकवाड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४१८ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई सांताक्रुझ, गोळीबार एसआरए प्रकल्पात २७ हजार झोपडयांचा समावेश असून या प्रकल्पांच्या विकासाची जबाबदारी शिवालिक व्हेंचर्स प्रा.लि. या कंपनीकडे असणे, सन २००६ पासून प्रकल्प सुरुवात होऊन २६ वर्षे उलटूनही प्रकल्प पुर्णतः रखडला असणे, शिवालिक व्हेंचर्सकडून त्याठिकाणच्या सुमारे ७८०० झोपडया तोडण्यात आल्या असणे, गेल्या १६ वर्षापासून अनेक झोपडपट्टीवासियांनी भाडे थकीत असुन, बहुतांशी झोपडीवासियांना भाडे दिले नसल्यामुळे हजारो कुटुंबियांना रस्त्यावर राहण्याची वेळ येणे,या प्रकल्पातून अद्यापपर्यंत २००० कुटुंबसुध्दा पक्की घरे दिलेली नसणे, ट्रान्सिस कॅम्पमध्ये ८०० कुटूंबांना स्थलांतर केले असले तरी ती घरेही मोडकळीस आली असून राहण्यासाठी योग्य नसणे, शिवालिक हेंचर्स या विकासकाने एस. आर. ए. म्हाडा व महानगरपालिकचे करोडो रुपये थकविले असल्याचे निदर्शनास येणे, महानगर पालिकने वेळोवेळी विकासकाला नोटीस पाठवूनही सदर बाकी भरली न जाणे, म्हाडा व महानगरपालिकेच्या भूखंडावर बनविलेला ट्रान्झिष्ट कॅम्पची अत्यंत दुरावस्था झालेली असणे, यामध्ये राहणे नागरिकांना असहय होत असणे, झोपडपट्टीवासियांचे योग्य पुनर्वसन न करता विकासकाने विक्रीसाठी केलेली ४०० घरे विकून पैसा कमवला असूनही झोपडपट्टीवासियांना घरे बांधून देण्यास असमर्थतता दर्शविणे, उक्त प्रकल्प इतके वर्षे रखडला असून स्थानिक नागरिकांना पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्यशासनाने सखोल चौकशी करुन एसआरएच्या ३ के स्कीमला त्वरीत रद्द करुन इतर विकासकामार्फत सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी करावायाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा.उपमुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

सदरहू प्रकरणी दि. ०७.०९.२००६ रोजी प्रगती मंडळ व इतर ०८ संस्थेकरीता प्रथम आशयपत्र पारीत करण्यात आलेले होते. तद्नंतर दि.१२.१०.२००७ रोजी प्रगती मंडळ व इतर २२ संस्थेकरीता सुधारीत आशयपत्र पारीत करण्यात आले. तसेच दि. १७.११.२००७ रोजी प्रगती मंडळ व इतर २४ संस्थेकरीता आशयपत्र पारीत करण्यात आले.

प्रगती मंडळ व इतर ४५ संस्थेकरीता दि. २०.०८.२००९ रोजी सुधारीत आशयपत्र निर्गमित करण्यात आले. तद्नंतर प्रगती मंडळ व इतर ५० संस्थेकरीता दि. ०१.१२.२०१२ रोजी सुधारीत आशयपत्र निर्गमित करण्यात आले. सदर झो.पु. योजनेत दि. ०१.१२.२०१२ रोजी दिलेल्या सुधारीत आशयपत्रानुसार एकुण ५५७२ पात्र झोपडीधारक आहेत. सद्यःस्थितीत २११२ झोपडीधारकांचे पुनर्वसन झालेले असून ७६७ सदनिकांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. आशयपत्रानुसार झोपु योजनेचे काम प्रगती पथावर असल्याने सन, २०१२ पर्यंत एकूण ८ इमारतीमध्ये १४२० संक्रमण सदनिका बांधण्यास दिलेल्या मंजुरीप्रमाणे विकासकाने ०८ इमारती बांधल्या आहेत. तथापि, सद्यःस्थितीत त्यापैकी म्हाडाच्या जमिनीवर असलेल्या ०२ इमारती तोडण्यात आलेल्या आहेत. उर्वरित शिबीरासाठी विकासकाने संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र (Structural Stability) सादर केलेले आहे.

सदर पुनर्वसन योजनेमध्ये आजमितीस विकासकाने विक्रा घटकामधील इमारत क्र.S६ इमारतीचे ३ माळे Basement + तळ मजला + वरील ११ मजल्यांपर्यंतचे बांधकाम पूर्ण झाले आहे. म्हाडाद्वारे कळविण्यात आलेल्या तात्पुरत्या संक्रमण शिबीराच्या थकीत रकमेचा भरणा विकासकाद्वारे करण्यात आला आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जागेवर तात्पुरत्या संक्रमण शिबीराच्या थकीत रकमेचा भरणा विकासकाद्वारे करण्यात आलेला नसल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेने विक्री घटक लिन करण्याबाबत दि. ०४.१०.२०१९ रोजीच्या पत्रान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कळविले आहे.

विषयांकित योजनेतील पात्र झोपडीधारकांना योजनेचे विकासक मे. शिवालिक व्हेंचर्स प्रा. लि. यांनी भाडे अदा केले नसल्याबाबत प्राधिकरणाकडे एकूण ५२३ अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर ५२३ अर्जांवरती प्राधिकरणाच्या परिपत्रक क्र. १५३ नुसार कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच विकासकाकडील प्राप्त माहितीनुसार योजनेतील सदर ५२३ झोपडीधारकांचे ०६ महिन्यांचे थकित भाडे विकासकामार्फत अदा करण्यात आले आहे. तथापि, सदर ५२३ झोपडीधारकांचे अंदाजे रुपये २५,९९,९६,६५०/- इतके भाडे अद्यापही थकित असल्याचे दिसून येते.

प्रस्तुत योजनेतील झोपडीधारकांना थकीत घरभाडे देण्यासंबंधी निर्णय घेण्यासाठी अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१८.०१.२०२३ रोजी विकासक, झोपडीधारकांचे प्रतिनिधी, म्हाडा व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत मे.शिवालिक व्हेंचर्स प्रा.लि. यांना योजनेतील झोपडीधारकांना थकीत घरभाडे व नियमित भाडे अदा करण्याबाबत तसेच विकासकाने उर्वरित पुनर्वसन सदनिकांचे बांधकाम पूर्ण करण्याबाबतचा कालबध्द कार्यक्रम सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सदर योजनेच्या बांधकामाचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी कार्यकारी अभियंता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांची नोडल अधिकारी म्हणून तसेच विकासकाने सादर केलेल्या कालबद्ध कार्यक्रमानुसार झोपडीधारकांना भाडे अदा करण्यात येत आहे किंवा कसे, याचा आढावा घेण्यासाठी सहायक निबंधक, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने विकासकाने दि.१६.०९.२०१९ ते दि.१५.०६.२०२३ या कालावधीमध्ये योजनेतील एकूण ९६७ झोपडीधारकांचे रु.१४,१४,८९,९३२ इतके भाडे अदा केले असल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कळविले आहे.

*******

## लक्षवेधी सूचना क्र.२५१४

## सन २०२३ पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. सुनील राणे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २५१४ पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई उपनगरातील बोरिवली स्थित जुनी एम.एच.बी. कॉलनी मधील अनेक वर्षांपासून इमारतीचे पुनर्विकास रखडलेल्या अवस्थेत असणे, येथील पुनर्विकासाचा प्रश्न प्रलंबित असल्यामुळे इमारतींमध्ये पडझड झाल्याने तात्पुरती डागडुजी करावी लागणे, कांदिवली प. येथील आरएसजी ३, सेक्टर ८, चारकोप येथील म्हाडाच्या भूखंडावर जेस्वाल कंपनीने अतिक्रमण करून भरणी टाकून अनधिकृत झोपड्या उभ्या करणे, म्हाडा प्रशासनाला वारंवार सदर अतिक्रमणाविरोधात स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी निदर्शनास आणून देणे, असे असतानाही म्हाडा प्रशासनाकडून कोणतीही कारवाई न करणे, सदरहू भूखंडावरील अतिक्रमण निष्कासित करून भूखंड म्हाडाच्या ताब्यात राहण्याची आवश्यकता, नागरिकांनी येथील लोकप्रतिनिधींना वारंवार पुनर्विकास प्रश्न मार्गी लावण्यासाठी विनंती करणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये तसेच सदनिकाधारकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाल्यामुळे राज्य शासनाने यावर चौकशी करून पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लावण्याकरीता करावयाची कार्यवाही व उपाययोजना, याकरीता मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे."

---

### मा. उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

जुनी एम.एच.बी. कॉलनीमधील २६ सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील रहिवाशांनी सन २००२ मध्ये सदरहू कॉलनीचा एकत्रित पुनर्विकास करण्यासाठी सर्वानुमते गोराई रोड को.ऑप हौसिंग सोसायटीज या फेडरेशनची स्थापन केली. फेडरेशनने या कॉलनीचा पुनर्विकास करण्याकरीता प्रकल्प सल्लागार यांच्या मदतीने फेडरेशनच्या विशेष सर्वसाधारण सभेतील मंजूरीनुसार विकासक मे. एस.बी.एम. रिएलटर्स प्रा.लि. यांचे समवेत दि.१७/२/२०१० रोजी पुनर्विकासाचा सामाईक करारनामा नोंदणीकृत केला आहे.

सदरहू इमारतींपैकी १६ इमारतींच्या पुनर्विकासाच्या सुधारित प्रस्तावास म्हाडाने गृहसाठा हिस्सेदारी तत्वावर दि.२१/११/२०१४ रोजी देकारपत्र व दि.५/६/२०१५ रोजी सुधारित देकारपत्र जारी करण्यात आले.

तद्नंतर इतर ३ गृहनिर्माण संस्था व २ वाणिज्य संस्थांना ३.०० च.क्षे.नि. नुसार गृहसाठा हिस्सेदारी तत्वावर अतिरिक्त क्षेत्रफळासाठी म्हाडाने दि.१५/१०/२०१६ रोजी सुधारित देकारपत्र जारी करण्यात आले. तसेच, २१ इमारतींसाठी दि.१६/१२/२०१७ रोजी सुधारित देकारपत्र जारी करण्यात आले. सुधारित देकारपत्रात नमुद केल्याप्रमाणे फेडरेशनने म्हाडाकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर २१ संस्थांसाठी IOD करीता ना हरकत प्रमाणपत्र दि.२४/५/२०१८ रोजी जारी करण्यात आले.

सदरहू फेडरेशनमधील सर्व इमारतींचे अभिहस्तांतरण झाले असून, या इमारतींना सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी ही त्या-त्या संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थांची आहे. त्यामुळे

सदरहू इमारतींची देखभाल, दुरूस्ती, डागडुजी, इ. करणे संबंधित संस्थांची जबाबदारी आहे. मुंबई मंडळामार्फत माहे जुलै-२०२२ मध्ये या सर्व इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून, स्ट्रक्चरल ऑडीटच्या शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना म्हाडामार्फत सदर गृहनिर्माण संस्थांना देण्यात आलेल्या आहेत.

सदरहू पुनर्विकास प्रकल्प रखडलेला असल्यामुळे, उक्त प्रकल्प मार्गी लावण्याकरीता दि.१५/९/२०२१, दि.१३/१०/२०२१ व दि.१४/१२/२०२१ रोजी फेडरेशन व विकासकाला त्यांची बाजू मांडण्याकरीता म्हाडामध्ये बैठका आयोजित करण्यात आल्या. सदरहू बैठकांना असोसिएशनचे प्रतिनिधी व विकासक उपस्थित राहीले नाहीत. मूळ सभासदांच्या पुनर्वसनाचे व म्हाडा हिस्स्याचे बांधकाम सुरू न झाल्याने फेडरेशनला म्हाडामार्फत आतापर्यंत जारी करण्यात आलेली सर्व देकारपत्रे, ना हरकत प्रमाणपत्रे दि.१/८/२०२२ रोजी म्हाडामार्फत रद्द करण्यात आलेली आहेत. तसेच सदरहू पुनर्विकास प्रकल्पाकरिता जारी केलेल्या सर्व परवानग्या दि.१५/९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये रद्द केल्या आहेत.

सदर आदेशाविरूध्द फेडरेशनचे विकासक मे. एस.बी.एम. रिअल्टर्स प्रा.लि. यांनी मा. उच न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.९०६४३/२०२२ दाखल केली आहे. सदर याचिका न्यायप्रविष्ट आहे.

दरम्यान मा. स्थानिक लोकप्रतिनिधींनी चारकोप सेक्टर-८, कांदिवली (प.) आर.एस.सी. ३ येथील म्हाडाच्या भूखंडावर जैसवाल कंपनीने अतिक्रमण करुन भरणी टाकून उभ्या करण्यात आलेल्या झोपडया/अतिक्रमण काढून भूखंड मोकळा करण्याबाबत म्हाडास दि.२३/४/२०२१ रोजी कळविले. त्यानुसार म्हाडामार्फत दि.७/५/२०२१ रोजी सदरहू भूखंडाची स्थळपाहणी केल्यानंतर श्री. बस बहादूर जैसवाल यांना दि.२९/७/२०२१ रोजी नोटीस दिली. सदर नोटीशीस अनुसरुन श्री. जैसवाल यांनी सदर भूखंडाची मोजमापणी करुन, भूखंड म्हाडा मालकीचे असेल तर रिकामे करण्यास तयार असल्याचे दि.१७/८/२०२१ रोजी म्हाडास कळविले. त्यानुषंगाने म्हाडाने सदरहू भूखंडातील सुविधा भूखंड (Amenity) व मोकळ्या जागेची (Open Space) मोजणी करुन देण्याबाबत नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांना दि.२३/३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले. नगर भूमापन अधिकारी (बोरीवली) यांनी सदरहू भूखंडाचे मिळकत पत्रिकेचे क्षेत्र ११२७०२२.५० चौ. मी. एवढे आहे. म्हाडाच्या पत्रात नमूद सुविधा भूखंड व ओपन स्पेस या क्षेत्राची स्वतंत्र मिळकत पत्रिका व नकाशा तयार झालेला नसल्याने हद्द कायम मोजणी करुन देणे शक्य नसल्याचे म्हाडास दि.२७/९/२०२२ रोजी कळविले.

तद्नंतर, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ व ५३ (१) अन्वये श्री. जयस्वाल यांना मुंबई मंडळाकडून दि.२/१२/२०२२ रोजी नोटीस जारी करण्यात आली होती. सदर नोटीसीच्या विरूध्द श्री. जयस्वाल यांनी मुंबई शहर दिवाणी न्यायालय, दिंडोशी येथे म्हाडा विरूध्द दावा दाखल केला आहे. सदरील दाव्याबाबत दि.९/१/२०२३ रोजी मुंबई मंडळाने प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. सदरचे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

*_*_*_*_*_*

लक्षवेधी सूचना क्र. ५३९
महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन

विधानसभा सदस्य श्री. दौलत दरोडा यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५३९ पुढीलप्रमाणे आहे:-

"पालघर व डहाणू तालुक्यातील शेती सिंचनाची गरज भागविण्यासाठी सुर्या धरण प्रकल्पाचे बांधकाम करण्यात येणे, तथापि सुर्या धरणाच्या डाव्या व उजव्या तीर कालव्यांसह संलग्न असलेले शाखा, कालवे व लघुपाट इत्यांदीची वेळोवेळी देखभाल दुरुस्ती न होणे, त्यामुळे दुरुस्तीअभावी जागोजागी दुरावस्थातील कालव्यांलगत मोठया प्रमाणात झाडेझुडपे वाढलेली असल्याचे तसेच पावसाळयात डोंगरातून वाहून येणारी माती व गाळ नियमित साफसफाई न झाल्याने बोईसर परिसरात कालव्यांमध्ये गाळ साचल्याचे दि. २१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास आढळून येणे, त्यामुळे कालव्यातून पाणी जाण्यास अडथळा निर्माण होऊन सिंचनासाठी आवश्यक पाणी मिळत नसल्याने त्या भागातील हजारो शेतकरी उन्हाळी भातशेती व बागायती पिके अशी दुबार शेतीपिके घेण्यापासून वंचित राहिल्याचेही त्यासुमारास (जानेवारी, २०२३) निदर्शनास येणे, तशात चिल्हार-बोईसर भागावरील खाजगी कारखान्यांनी अतिक्रमण करुन धरण प्रकल्प कालव्यांच्या जागा हडप करुन कालव्यांची नासधूस केली असल्याचे निदर्शनास येणे, त्याविरोधात शेतकऱ्यांनी शासनाचे म्हणजे पाटबंधारे विभागाच्या (जलसंपदा) अधिकाऱ्यांकडे तक्रारी करण्यात येणे,तथापि शासनाकडून कारखान्यांनी नोटीसा बजावण्यापलिकडे कोणतीही कारवाई करण्यात न आल्याचेही व यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी कारखान्यांना पाठीशी घालण्याची भुमिका घेतली असल्याचे त्याचसुमारास निदर्शनास येणे, परिणामी शेतकरी वर्गामध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व शासनाप्रति चिडीची भावना, शासनाने त्यानुसार कालव्यांची देखभाली अभावी झालेली दुरावस्था व कारखानदारांनी कालव्यांची हडप केलेली जागा व त्यामध्ये अधिकाऱ्यांचा अर्थकारणामुळे दिसून येणारा सहभाग याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

पालघर व डहाणू तालुक्यातील शेती सिंचनासाठी सूर्या प्रकल्प सन १९९० मध्ये पूर्ण झालेला आहे. सदर प्रकल्पांतर्गत दोन धरणे असून सूर्या नदीवर मुख्य धरण धामणी ता. विक्रमगड येथे बांधण्यात आले आहे. मुख्य धरणापासून सुमारे ८ कि. मी. अंतरावर कवडास ता. डहाणू येथे उन्नैयी बंधारा बांधण्यात आलेला आहे.

उजव्या व डाव्या कालव्याची नियमित देखभाल दुरुस्ती व सिंचन व्यवस्थापनेची कामे करण्यात येतात. सन २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात आले आहेत. तसेच, काही कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामे केल्याने शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करण्यात येत आहे. मागील तीन वर्षामध्ये सरासरी ११,२९९ हे. इतके सिंचन झाले आहे.

डावा तीर कालवा :-

सूर्या प्रकल्पाच्या डावा तीर कालव्याची एकूण लांबी ४७ कि.मी. इतकी असून सिंचनाखाली येणारे क्षेत्र ४,८५८ हेक्टर एवढे आहे. सदर डावा तीर कालव्याच्या कि.मी. ३३ पर्यंतचे काम मुख्य कालवा व वितरणप्रणालीसह ३० ते ३५ वर्षापुर्वी पुर्ण करण्यात आली आहेत. तथापि, कि. मी. ३४ ते ४७ मधील मुख्य कालवा तसेच वितरणप्रणालीचे काम वनजमीन संपादन अभावी करता आलेले नाही. सद्यस्थितीत डावा तीर कालव्याचे ७० % काम पूर्ण झालेले आहे. २,६५२ हे. सिंचनक्षमता निर्माण झाली असून २,२०६ हे. सिंचनक्षमता वनजमीन संपादनाअभावी निर्माण होवू शकली नाही.

सदर कालव्यावरील वितरिका, लघुपाट व थेट विमोचकांची द्वारे सुस्थितीत नसल्यामुळे अचूक पाणी व्यवस्थापन करणे शक्य होत नाही. त्यामुळे कालव्याच्या शेवटच्या भागात पाणी पोहोचवण्यास अडचण निर्माण होतात. गेल्या ३६ वर्षात सदर कारणांमुळे कालव्याच्या वहन क्षमतेवर परिणाम झालेला आहे. परिणामी कालव्याची संकल्पित विसर्ग क्षमता कमी होवून ३८१.७६ कुसेक्स ऐवजी २५० कुसेक्स इतकी मर्यादित झाली आहे. त्यामुळे पूर्ण क्षमतेने पाणी सोडल्यास भरावातील कालवे फुटण्याची शक्यता आहे. चालू सिंचन हंगामात यांत्रिकी विभागाकडून छोट्या प्रकारच्या

मशिनरींची मागणी करण्यात आली असून मशिनरी उपलब्ध होताच मुख्य कालव्यातील झाडे झूडपे व गाळ काढण्याचे नियोजन आहे. त्यामूळे मुख्य कालव्याची विसर्ग क्षमता वाढविण्यास मदत होणार आहे.

सदर डावा तीर कालव्याच्या कि.मी. ३३ पर्यंतच्या भागातील अतिक्रमण धारकांना नोटीस देण्यात आलेली आहे. या अनुषंगाने ४ अतिक्रमणे नोटीस दिल्यानंतर स्वेच्छेने काढून घेण्यात आली आहेत. इतर बाबतीत कार्यवाही प्रगतीत आहे. सदर डावा तीर कालव्याच्या कि.मी. ३३ च्या पुढील चिल्हार- बोईसर भागातील कालव्यांचे बांधकाम वनजमीन संपादनाअभावी अपूर्णावस्थेत आहेत. वनजमीन वगळता मुख्य कालव्याचे प्रस्तावीत १४ किमी पैकी सुमारे ३ कि.मी. लांबीत व लघुपाट क्र.१५, १६, १७, १८ चे काही भागात कालव्याचे बांधकाम करण्यात आले आहे. सदर किमी ३३ च्या पुढील भागात अद्याप सिंचनासाठी पाणी उपलब्ध झालेले नाही. सूर्या डाव्या तीर कालव्यावरील साखळी क्रमांक ३७.५० किमी. मनोर शाखेवरील लघूपाट क्र. १ वर एका कंपनीने व इतर एका भू-धारकाने जमीनीचे तुकडे होत असल्यामुळे मालमत्तेच्या संरक्षणासाठी कालव्यावर कालव्याचा काटछेद विस्कळीत न करता पक्के कुंपनाचे बांधकाम केले आहे. त्याअनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयाने दि. ३१/०७/२०२१ रोजी संबंधितांना नोटीस दिली आहे. त्यानुसार पक्क्या कुंपनाचे बांधकाम काढणेत येत आहे. डावा तीर कालव्याची उर्वरीत कामे शासनाच्या धोरणानुसार बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे असून त्यासाठी बांधकाम प्रस्तावित भूसंपादनाची आवश्यकता राहणार नाही.

**उजवा तीर कालवा :-**

सूर्या उजवा तीर कालव्याची एकूण लांबी २८.५१ कि. मी. इतकी असून सिंचनाखाली येणारे क्षेत्र ९,८३८ हेक्टर एवढे आहे. उजवा तीर कालव्याचे काम मुख्य कालवा व वितरण प्रणालीसह सन १९९३ मध्ये पूर्ण झालेले आहे. सद्यस्थितीत सूर्या उजवा तीर कालव्याचे १०० % काम पूर्ण झालेले असून ९,८३८ हेक्टर (१०० %) सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. सूर्या प्रकल्पांतर्गत उजवा तीर कालव्यावरील एकूण ७० गावांना सिंचनाचा लाभ होत आहे. सूर्या उजवा तीर कालव्यावरील किमी. १ ते २९ व त्यावरील वितरण व्यवस्था आणि पालघर शाखा क्रमांक दोन किमी. १ ते ३६ व त्यावरील वितरण व्यवस्थेवर सिंचनासाठी पाणी उपलब्ध असून, सद्यस्थितीत पालघर शाखा क्रमांक दोन वरील किलोमीटर २५ पर्यंत सिंचन होत आहे.

सूर्या प्रकल्पाचे कालवे ज्या भागातून जात आहेत तो भाग काळ्या मातीचा असल्याने बऱ्याच ठिकाणी कालव्याचे अस्तरीकरण खराब झालेले आहे. तसेच, डोंगरातून येणारे पाणी, गाळ, कचरा यांमुळेदेखील कालव्यांचे बऱ्याच ठिकाणी नुकसान झालेले आहे. कालव्यामध्ये साचलेला गाळ, कालव्याचे भराव बऱ्याच ठिकाणी खचल्यामुळे, कालव्याचे काटछेद अनियमत झाल्याने व इतर कारणांमुळे कालव्यातून जास्तीत जास्त ४५० कुसेक्स इतका विसर्ग सद्यस्थितीत सोडता येत आहे. त्यामुळे यांत्रिकी विभागाकडुन छोट्या प्रकारच्या मशिनरींची मागणी करण्यात आली असून मशिनरी उपलब्ध होताच मुख्य कालव्यातील झाडे झूडपे व गाळ काढण्याचे क्षेत्रीय स्तरावर नियोजित आहे.

सूर्या उजवा तीर कालवा व त्यावरील वितरण व्यवस्था आणि पालघर शाखा क्र. दोन व त्यावरील वितरण व्यवस्थेवरील जलसंपदा विभागाच्या कालव्याच्या संपादित क्षेत्रामध्ये कालव्यावर कोणत्याही प्रकारचे औद्योगीकरण व नागरीकरणाची बांधकामे झालेली नाहीत. पालघर शाखा क्र. २ च्या लाभक्षेत्रात काही कंपन्यांना औद्योगिकरणासाठी परवानगी प्राप्त आहे. सदर कालव्याच्या जागेचे भूसंपादन झालेले नाही. कालव्यालगत झालेल्या बांधकामांबाबत नोटिसा देण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी ५ प्रकरणांमध्ये महसूल व इतर विभागांमार्फत परवानगी दिल्याचे आढळून आले असून उर्वरीत प्रकरणांचे दस्तावेज उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना कायमस्वरुपी सिंचनाकरीता सुरळीत पाणी उपलब्ध होण्यासाठी शासनाच्या नवीन धोरणानुसार उजवा व डावा कालव्याकरिता बंदीस्त नलिका वितरण प्रणालीचे काम प्रगतीत आहे. सुर्या प्रकल्पातून सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ वर्षासाठी एकूण अनुक्रमे १२,१२२ हे, ११,२५३ हे. व ११,५२० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ झालेला आहे. उन्हाळी शेतीसाठी सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ वर्षासाठी अनुक्रमे ११४.६३८, १२२.१६० व १८०.९७२ द.ल.घ.मी. पाणी सोडण्यात आलेले असून, याबाबत शेतकऱ्यांनी कोणतीही तक्रार केलेली नाही.



..........

# लक्षवेधी सूचना क्र. २०००

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन

विधानसभा सदस्य डॉ. किरण लहामटे यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २००० पुढीलप्रमाणे आहे:-

"अकोले तालुक्यातील (जि. अहमदनगर) निळवंडे कालव्याच्या पाटाला भर टाकण्यासाठी माती टाकण्यासाठी पाटाच्या कडेला खड्डे खोदून माती काढण्यात येणे, खोदलेले खड्डे बुजवण्यात न आल्यामुळे व रस्ते अरुंद असल्यामुळे त्या ठिकाणी अपघाताचे वाढलेले प्रमाण, दि. १४ फेब्रुवारी, २०२३ रोजी या खड्ड्यामुळे म्हाळादेवी येथील निळवंडे कालव्यात ट्रॅक्टर उलटल्यामुळे या ट्रॅक्टर चालकाचा झालेला दुर्देवी मृत्यू, यापूर्वीसुध्दा याच धरणात खड्ड्यामुळे वाहतूक करणारे वाहन कोसळून तीन व्यक्ती मृत्यूमुखी पडणे, यामुळे तेथील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष व भीततीचे वातावरण, या सर्व प्रकरणाची चौकशी करून खड्ड्यांना जबाबदार असणाऱ्या व्यक्तींविरुध्द कारवाई करुन मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना आर्थिक मदत करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

## श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

निळवंडे, ता. अकोले, जि. अहमदनगर येथील उर्ध्व प्रवरा (निळवंडे-२) प्रकल्पाच्या काटछेदाप्रमाणे डावा कालव्याच्या प्रवाहाच्या डावीकडे ३.५ मी. व उजवीकडे ५.० मी. असे निरीक्षण पथ व सेवा पथाची कामे व कालव्याच्या डाव्या व उजव्या या दोन्ही बाजूने पावसाचे पाणी वाहुन नेण्यासाठी चर (Rain water trench) प्रस्तावित आहेत. यामुळे पावसाच्या पाण्यापासून कालवा सुरक्षित राहणार असून कालव्याच्या लगत असणारे शेत सुरक्षित राहणार आहे. कालव्याच्या दोन्ही बाजूला असणारे चर ही तांत्रिक गरज आहे.

सदर प्रकल्पाच्या डावा व उजव्या कालव्याचे काम काटछेदाप्रमाणे व संकल्पनाप्रमाणे प्रगतीपथावर आहे. सदर कालव्याच्या कडेला केलेले खोदकाम हे खड्डे नसून कालव्याच्या व पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी आवश्यक चर आहेत. सदर चर हे संपादित हद्दीमध्येच करण्यात येत आहेत. सद्यस्थितीत डाव्या कालव्याचे काम प्रगतीपथावर असल्याने कालव्याचे निरीक्षण अथवा सेवापथ रहदारीसाठी खुला नाही. अपघात घडलेल्या ठिकाणी कालवा खोली ३.९० मी. इतकी आहे.

कालव्याच्या निरीक्षण पथावरून जात असताना मयत शेतकरी श्री. विजय गणपत हासे यांच्या ट्रॅक्टरचा तोल गेल्याने ट्रॅक्टर कालव्याच्या आतील भागात त्यांच्या अंगावर पडल्याने त्यांचा दि. १४.०२.२०२३ रोजी जागीच मृत्यु झाला आहे. याप्रकरणी सदर मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला आर्थिक मदत मिळावी म्हणून मुख्यमंत्री सहायता निधी करीता तहसील कार्यालय, अकोले यांचे मार्फत प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. याव्यतिरिक्त सदर स्थळी अन्य व्यक्तींच्या मृत्यूबाबत जलसंपदा विभागाच्या कार्यालयात अथवा महसुल विभागात नोंद नाही.

********

ROTA-H-1194-1 (700-9-2023)

लक्षवेधी सूचना ९३८

**सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन**

**श्री.बंटी भांगडिया, श्री. टेकचंद सावरकर विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"विदर्भात उच्च दर्जाच्या वाळूसाठी प्रसिद्ध असलेले व उपलब्ध असलेले चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गोंदिया व वर्धा जिल्हयातील नदीपात्रातुन अवैध मार्गानी वाळू उपसा होत असल्याचा घटना नित्येची बाब ठरत असणे, अवैध वाळू उपसा करणार्या वाळू तस्करांवर प्रशासनाने नियंत्रण आणावे, आणण्याची मागणी सातत्याने नदीकाठच्या गावातील ग्रमस्थांकडुन होणे, अनेक वेळा नदीकाठच्या ग्रामस्थांनी अवैधरीत्या होत असलेला वाळू उपसा महसूल विभागाला रंगेहात पकडुन दिल्यानंतरही अवैध वाळू उपसा करणार्यांवर कोणतीही कायदेशीर कारवाई महसूल व संबंधित विभागाकडुन न होणे, अनेकदा महसूल विभागामार्फत थातुरमातुर कारवाई केल्या जाणे ज्यामुळे आजमितीस एकाही जप्ती केलेल्या वाहनाची, जप्ती केलेल्या यंत्रांची किंवा अवैध जमा साहीत्याची लिलाव झाल्याचे किंवा भंगारात काढल्याचे निदर्शनास न येणे, किरकोळ कारवाई करून वारंवार त्याच ठिकाणी पुन्हा अवैध वाळू उपसा होत असणे, त्यामुळे जिल्हयातील नदीकाठच्या ग्रमस्थांचे व ग्रमसभेचे मानसिक खच्चीकरण होणे, अवैध वाळू उपसा करणारे महसूल विभागाची कुठलीही भिती मनात न बाळगता राजरोसपणे वावरत असणे, यापैकी काही प्रकरणी प्रशासनाने जिवावर बेतुन गुन्हे दाखल केले असतांनाही देखील त्यामधुन कायद्यांमधील पळवाटाचा फायदा घेऊन वाळू तस्कर निर्दोष सुटत असणे, या वाळू तस्करांवर होणारी कायद्यांमधील फौजदारी गुन्हयांची कलमे किरकोळ असल्याने कारवाई होऊनही पुन्हा अवैध वाळूची तस्करी जोमाने केली जाणे, त्यामुळे वाळू तस्करांवर वेळीच आवर घालण्यासाठी गुन्हयांची कलमे व कारवाईत सुरक्षा पुरविण्याची गरज निर्माण होणे, नियम आणखी कडक करण्याचा आवशकता, वाळू तस्करांद्वारा कारवाईस गेलेल्या प्रशासकीय अधिकार्यांवर वाढलेले हत्यांरांद्वारा हिंसक व जिवघेणे हल्ले, कठोर कारवाई व प्रसंगी कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याची गरज याकडे प्रशासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष त्यावर प्रशासनाने करावयाची तातडीची करवाई व याबाबत प्रशासनाची भुमीका आणि यावर प्रतिक्रिया."

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

विदर्भातील अमरावती व नागपूर विभागातील जिल्ह्यामध्ये गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीवर आळा घालण्याकरीता तालुका भरारी पथकाची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच गौण खनिजाच्या वर्दळीच्या ठिकाणी चेकपोस्ट लावण्यात आलेले आहे. तसेच चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गोंदिया व वर्धा जिल्ह्यामध्ये अवैध गौण खनिज उत्खननामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये या करीता जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर दक्षता पथकाची नेमणुक करण्यात आलेली आहे.

चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गोंदिया व वर्धा जिल्ह्यात अनधिकृत मुरूम, माती, दगड, खडी व वाळू/रेती या गौणखनिज वाहतुकीवर आळा घालण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय पथकामार्फत वेळोवेळी तपासणी करून सन २०२२-२३ मध्ये अवैध उत्खनन व वाहतुकीच्या एकुण १५५६ प्रकरणामध्ये रू.१५६९.४४ लक्ष रक्कम दंड वसुल करून शासन जमा केला आहे. तसेच सदर प्रकरणी ११३गुन्हे दाखल करण्यात आलेले असून ३१ आरोपीना अटक करण्यात आली आहे व एकुण १०२५ वाहने जप्त केली आहे.

**************

लक्षवेधी सूचना क्र.१२४३

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. निलेश लंके. मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"माहे जानेवारी २०२३ च्या शेवटच्या आठवडयात वा त्या सुमारास, मुंबई-बडोदा द्रुतगती महामार्ग निर्मितीच्या कामासाठी नेमलेल्या जी.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट या कंपनीने मु.पो.ता.सफाळे (जि.ठाणे) रेल्वे स्थानकाच्या पुर्वेकडील नवघर गावातील गट क्र.१८८ मधून आठ हजार ब्रास मुरुम उत्खननाचा परवाना असताना, सुमारे दीड लाख ब्रास माती उत्खनन केल्याची तक्रार ग्रामस्थांनी महसुल प्रशासनाकडे लेखी स्वरुपात करणे, उत्खनन परवाना मुदत संपल्यावरही उत्खनन सुरु असल्याचे प्रशासनाने केलेल्या पाहाणीत उघडकीस येणे, तक्रारदार संदीप किमी, राहुल सापने, सफाळे मंडळ अधिकारी तेजल पाटील, करवाळे सजेचे, तलाठी किरण जोगदंड यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन केलेल्या पाहाणीत १ लाख ६० हजार ब्रास मातीचे उत्खनन केल्याचे निदर्शनास येणे, मंडळ अधिकारी यांनी आपला पाहाणी अहवाल तहसील कार्यालयास पाठविण्यास हेतूत:सुरु असलेली चालढकल व विलंब, गट क्र.१८८ ची शासकीय मोजणी व सिमा निश्चिती न केल्याने जी.आर.इन्फ्रा प्रोजेक्ट कंपनीने परवानगीपेक्षा जास्त केलेले बेकायदेशीर उत्खनन, सदर प्रकरणी महसुल प्रशासन संबधित ठेकेदार कंपनी विरोधात कोणतीच कायदेशीर कारवाई करत नसल्याने सफाळे, नवघर इ. भागात वास्तव्य करणाऱ्या हजारो ग्रामस्थांच्या मनात महसुल प्रशासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे नवघर येथील गट नं. १८८, १८९, १९०, १९१, १९२ मधून कोणत्याही प्रकारची उत्खनन किंवा वाहतुक परवानगी न घेता मोठया प्रमाणात मुरुम-मातीचे उत्खनन केल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी तहसिलदार, पालघर यांचेकडे दिनांक २१.०७.२०२२ रोजी व दिनांक ०५.०१.२०२३ रोजी केली आहे.

मंडळ अधिकारी, सफाळे व तलाठी, करवाळे यांनी दिनांक ०७.१२.२०२२ रोजी केलेला स्थळपाहणी अहवाल तहसिलदार, पालघर यांना सादर केला आहे. तक्रारदार यांनी तक्रार अर्जातील नमुद गट नं. १८९, १९०, १९१, १९२ मध्ये कोणतेही उत्खनन

झाल्याचे आढळून आलेले नाही. परंतु, मौजे नवघर ता. जि. पालघर येथील स.नं./गट नं. १८८ एकुण ५७,५८८ ब्रास मुरुम-मातीचे उत्खनन केल्याचे आढळून आले.

त्यानुसार तहसिलदार, पालघर यांचेकडून संबंधित कंपनीस दिनांक ०८.१२.२०२२ रोजी एकूण ५७,५८८ ब्रास अनधिकृत मुरुम-माती उत्खनन केल्याबाबत नोटीस देण्यात येवून दिनांक १९.१२.२०२२, दि.२९.१२.२०२२ व ०९.०१.२०२३ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणी वेळी कंपनीने सादर केलेल्या खुलाशात नमुद केले आहे की, सदर प्रकल्पाचे काम पुढील २ वर्षे चालणार आहे. कालावधी संपल्यानंतर कंपनीस उत्खननासाठी देण्यात आलेल्या परवानगी पेक्षा जास्त उत्खनन झाल्यास ते उत्खनन अनाधिकृत समजावे लागेल. सदर जागेत उत्खननाची प्रक्रीया सुरू असून केवळ ग्रामस्थ किंवा वर्तमान पत्रातील बातमीमुळे मोजमाप करून दंडात्मक कारवाई केल्यास न्यायालयीन वाद निर्माण होऊन राष्ट्रीय प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यास विलंब लागू शकतो ही बाब विचारात घेऊन कंपनीने सादर केलेला खुलासा मान्य केला असून तहसिलदार, पालघर यांनी कंपनीस दि.०८.१२.२०२२ रोजी दिलेली नोटीसा दि.०६.०२.२०२३ रोजी मागे घेतली आहे.

**************

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. विश्वनाथ भोईर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"मौजे मोहने (ता. कल्याण, जि.ठाणे) येथील उल्हास नदीच्या पुलाजवळ गोदरेज समूहाने मोठ्या प्रमाणात गृहनिर्माण प्रकल्पाचे काम सुरू करणे, सदर गृहनिर्माण संकुल बांधकामाकरिता गोदरेज समूहाने नदीतील परिसरात मोठ्या प्रमाणात केलेल्या उत्खननामुळे उल्हास नदीच्या तीरालगत असलेल्या नैसर्गिक उंचवट्याचा समतोल बिघडणे, परिणामी आर. आर. झेड व सी. आर.झेड. क्षेत्रातील नियमाची पायमल्ली सदर विकासाकडून होणे, उल्हास नदी परिसरातील उपरोक्त नैसर्गिक उंचवटा हा अतिवृष्टी काळात सह्याद्री खोऱ्यातील मोहने बंदराकडून पाण्याचा जोर उल्हास नदी पुलाखालून वाहत येणाऱ्या पुराच्या पाण्याची गती वक्राकार नैसर्गिक उंचवट्यामुळे इतरत्र न पसरतात थेट बारावे जंक्शन येथे कल्याणकडे जाऊन मिळत असणे, असे जुन्या जाणकारांचे मत असणे, उल्हास नदीच्या उपरोक्त नैसर्गिक उंचवट्याचा (टेप) समतोल बिघडल्याने संभाव्य पुराचा धोका निर्माण होण्याची शक्यता असणे, त्याचा धोका उल्हासनदी व बारावेखाडी परिसरातील वडवली, अटाळी, शहाड, गौरीपाडा, बारावे जंक्शन या नदी परिसरातील गावांना बसून मोठी वित्त व जीवन होण्याची शक्यता नाकारताना येणे, उल्हासनदी पुला जवळ नदीतीरा लगत गोदरेज समूहाने सुरु केलेल्या बांधकामा साठी नदी परिसरात केलेल्या उत्खननामुळे आर. आर.झेड.व सी.आर.झेड. नियमांची सदर विकसकाने केलेल्या उल्लंघनाचे सखोल चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

### श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे वडवली, ता. कल्याण, जि. ठाणे येथील स. नं.५२ हिस्सा नं. १, स. नं. ५४/ब चा हिस्सा नं. १,२ व ३ या भूखंडाचे क्षेत्र ७८,८२२.०० चौ.मी आहे. महापालिकेच्या मंजूर विकास योजनेमध्ये नदीकिनारी लगत हरित क्षेत्र प्रस्तावीत आहे. यापैकी CRZ-II मधील क्षेत्र २९९१८.७० चौ.मी असून ४८९०३.३० चौ. मी. क्षेत्राचा Industrial Zone (I-२ Zone) मध्ये समाविष्ठ होत आहे. ४८९०३.३० चौ. मी. Industrial Zone (I-२ Zone) या क्षेत्रासाठी महानगरपालिकेकडून औद्योगिक विभागात निवासी व अनिवासी वापराकरीता बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

शासनाने दिनांक ०२.१२.२०२० रोजी मंजूर केलेल्या एकत्रितकृत विकास नियंत्रण व प्रात्सोहान नियमावली (UDCPR) मधील तरतूद क्रमांक ४.८.१ नुसार औद्योगिक विभागात निवासी व अनिवासी वापराकरीता बांधकाम परवानगी प्रदान करण्यात आलेली असून यामध्ये CRZ-II

क्षेत्रावर कोणतेही बांधकाम अनुज्ञेय करण्यात आलेले नाही. तसेच CRZ-II क्षेत्राचे कोणतेही क्षेत्र चटईक्षेत्र स्वरूपात बांधकाम परवानगीमध्ये अनुज्ञेय केलेल नाही.

CZMP (Costal Zone Managment Plane) च्या CZMP-२०११ नुसार (HTL) High Tide Level विचारात घेण्यात आलेली असून यानुसार CRZ-II मध्ये Green Belt विकसित करण्याकरीता MCZMA ने परवानगी दिलेली असल्याचे निदर्शनास येत आहे. प्रशासक तथा आयुक्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांच्या अहवालानुसार नदीच्या पाण्याच्या प्रवाहास अडथळा निर्माण होईल किंवा नैसर्गिक उंचवट्याचा समतोल बिघडेल, अशी वस्तुस्थिती आढळून आलेली नाही.

उप विभागीय अधिकारी, कल्याण यांनी दिनांक १९.१२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये मौजे वडवली, ता. कल्याण, जि. ठाणे येथील स. नं.५२ हिस्सा नं. १, स. नं. ५४/ब चा हिस्सा नं. १,२ व ३ मधील ७८८२२ चौ.मी क्षेत्रावर २००० ब्रास करीता गौणखनिज उत्खनन/वाहतूकीसाठी परवानगी संबंधित विकासकास दिली आहे.

तहसिलदार, कल्याण यांचेकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने स्थळपाहणीत दगड एकूण १६४८८ ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे आढळून आल्याचे निदर्शनास आल्याने, तहसिलदार, कल्याण यांनी उक्त समुहास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८(७) अन्वये दिनांक ०६.०३.२०२३ रोजी संबंधितांनी एकूण १६४८८ ब्रास अनाधिकृतपणे माती व मुरूम याचे उत्खनन व साठा केल्याबाबत नोटीस बजाविण्यात आली. सदर नोटीसच्या अनुषंगाने तहसिलदार, कल्याण दिनांक १३.०३.२०२३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली असता, संबंधित विकासकाने लेखी म्हणणे सादर करण्यास मुदत देण्याची विनंती केल्यामुळे पुढील सुनावणी दिनांक ०३.०४.२०२३ रोजी ठेवण्यात आलेली आहे.

तथापि, गोदरेज समूहाने अतिरिक्त १४४८८ ब्रास गौणखनिजाचे उत्खनन व साठवणूक केले असून अतिरिक्त गौणखनिज उत्खननच्या अनुषंगाने सदर प्रकरणी संबंधिताचे लेखी म्हणणे प्राप्त झाल्यांनतर तहसिलदार, कल्याण यांच्याकडे सूरू असलेल्या सुनावणीअंती महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

*******

**लक्षवेधी सूचना २१६४**

**सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन**

**श्री.सुनिल भुसारा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

मौजे रायसळ ता.वाडा जिल्हा पालघर येथे गट क्रमांक ४३/२ आणि ४३/५ या जमिनीवर बेकायदा उत्खनन झाल्याचे माहे फेब्रुवारी २०२२ मध्ये उघडकीस येणे, तहसिलदार वाडा यांनी हे बेकायदा उत्खनन झाल्याने १०५ कोटी रुपयाची दंडात्मक नोटीस मे. जिजाऊ कन्स्ट्रक्शन यांना देणे. सदर नोटीसला उत्तर देण्यासाठी संबंधितांना तीन आठवड्यांची मुदत देणे. असे असतांना अचानक दिलेली दंडात्मक नोटीस ७५ कोटी रुपये कमी करुन सुधारित नोटीस फक्त ३० कोटी रुपयाची देणे. पहिल्या नोटीसमध्ये झालेले उत्खनन हे १ लाख ३७ हजार ब्रास दाखवणे आणि अचानक दुसऱ्या नोटीसमध्ये ते ४७ हजार ब्रास दाखविणे आणि त्या अनुषंगाने दंडाची रक्कम कमी करणे. तसेच मौजे रायसळ हे गाव पश्चिमघाट संवेदनशिल क्षेत्रात येत असल्याने हे उत्खनन करत असतांना पर्यावरण विषयक कोणत्याही परवानग्या न घेतल्याचे निदर्शनास येणे. एकंदर तहसिलदार वाडा यांची कृती ही संशस्यास्पद अशी असणे. तहसिलदार यांच्या या कार्यवाहीमुळे शासनाचे महसुलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणे. तसेच गौण खनिज माफिया यांचे मनोबल मध्ये वाढ होणे. यामुळे वाडा तालुक्यात असंतोषाचे वातावरण निर्माण होणे. याबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही.

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

मौजे रायसळ ता. वाडा जि.पालघर येथील ग.नं.४३/२ आणि ४३/५ या जमीनीवर अनधिकृतरित्या उत्खनन झालेबाबत तहसिलदार, वाडा दिनांक ०२.०५.२०२२ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कंपनीस कोणतेही उत्खनन न करण्यास कळविण्यात आले. तसेच, मंडळ अधिकारी, कंचाड यांनी केलेल्या चौकशीत एकुण १,३७,५९७ ब्रास उत्खनन आढळून आले त्यानुषंगाने तहसिलदार, वाडा यांनी दिनांक २६.०५.२०२२ रोजी रू.१०५,२६,१७,०५०/- एवढया दंडात्मक रकमेची नोटीस संबंधीत कंपनीस बजाविण्यात आली असता, संबंधित कंपनीने नोटीसच्या अनुषंगाने उत्खननाबाबत फेरमोजणी करावी याबाबतची विंनती केली.

मंडळ अधिकारी, वाडा व कोने यांनी संयुक्तपणे केलेल्या पंचनाम्यानुसार ४७,१०६ ब्रास दगड उत्खनन व ९०४८ ब्रास माती उत्खनन केल्याबाबत व त्यापैकी सदर माती उत्खनन करून त्याच ठिकाणी साठा केलेला असल्याबाबत अहवाल तहसिलदार वाडा यांना सादर केला.

मंडळ अधिकारी, कंचाड यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये आणि मंडळ अधिकारी वाडा व कोने यांनी तहसिलदार वाडा यांना सादर केलेल्या अहवाल यामध्ये तफावत असल्याने तहसिलदार, वाडा यांनी मंडळ अधिकारी, कंचाड यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने दगड उत्खननाबाबत तहसिलदार, वाडा यांनी दिनांक ०७.०७.२०२२ अन्वये ४७,१०६ ब्रास बाबत संबंधितास दंडात्मक नोटीस देण्यात आली. सदर नोटीशीच्या अनुषंगाने

संबंधित कंपनीने सादर केलेला खुलासा विचारात घेवून तहसिलदार, वाडा यांनी दिनांक १०.०८.२०२२ रोजी रु.३०,२९,८५,९००/- एवढया रक्कमेची दंडात्मक नोटीस संबंधीत कंपनीस दिली. तद्नंतर कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांच्याकडून प्राप्त पत्रानुसार संबंधित कंपनीने मौजे रायसळ येथील ग.नं.४३/१ ते ४३/५ यामधून ९९८१ ब्रास व ५४३८९ ब्रास गौणखनिज परीमाण उपयोगात आणलेले आहे व त्यांबाबतची रक्कम शासन जमा झाले आहे असे नमूद केले होते. ही बाब विचारात घेता तहसिलदार,वाडा यांनी तक्रार अर्ज निकाली काढला. तथापि, जिल्हाधिकारी, पालघर यांनी याप्रकरणी फेरचौकशी करून आदेश पारित करण्याच्या सुचना तहसिलदार, वाडा यांना देण्यात आल्या त्यांनुषंगाने मौज रायसळ येथील ग.न.४३/१ ते ४३/५ मधील उत्खननाबाबत ईटीएस मोजणी करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने संबंधीतास तहसिलदार, वाडा यांच्याकडून चौकशीची कार्यवाही सुरू आहे.

**********

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"मौजे नाहूर, ता. कुर्ला, जि. मुंबई उपनगरे येथील १५/४ व इतर या जमिन मिळकतीमध्ये १९४० पासून मतीबाई शंकर यांचे कुळ दाखल असून १९६२ पासून सॉल्ट डिपार्टमेंटनी बेकायदेशीर धारक नोंदी नाव चढवून नंतर महसुल विभागाच्या अध्यादेशानुसार नाहूर गावाच्या जमिन मिळकती या बिनशेती व औद्योगीक प्रयोजनाकरीता बाधित ठेवल्याचे महसुल विभाग नोटिफिकेशन टीएनसी / ५१५७/३१९०-एम. दि. २९ मार्च १९५७ द बॉम्बे गव्हर्नमेंट गॅझेट ४ एप्रिल १९५७अन्वये बिनशेती व औद्योगिक विकाससाठी राखून ठेवले असल्यामुळे कुळकायदा नाहूर गावी लागु होत नाही, असे सबब अद्यादेशमध्ये नमुद करणे, परंतु नाहूर या गावी अजुनही बिनशेती व औद्योगिक प्रयोजन न झाल्याने मुंबई कुळवहिवाट अधिनियम १९४८ हैद्राबाद कुळवहिवाट शेतजमिन अधिनियम १९५० व विदर्भ कुळवहिवाट अधिनियम १९५८ नुसार शेतकऱ्यांना जमिन परत देण्याचे अध्यादेशात नियोजीत असून सदर जमिन मिळकतीत नऊ दशकांपासून भूमिहीन विधवा महिला मतीबाई शंकर हिचे कुळ दाखल असल्यामुळे या कुळाचे वारस लावणेकामी दि. १५/७/२०२२ रोजी विभागीय आयुक्त कोकण विभाग, मुंबई व प्रधान सचिव, महसूल यांना अरुण रामा पाटील यांनी वेळोवेळी अर्ज दाखल केला असणे, तसेच मौजे बाळकुम ता. जि. ठाणे येथील सर्व्हे क्र. ७४/ १५ व ईतर मध्ये रोहिदास इंद्रपाल पाटील यांनी दि. २७/२/२०२० मा. उपविभागीय अधिकारी, ठाणे यांच्याकडे पुनर्विलोकनाखाली केस चालु असुन जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे व उपविभागीय अधिकारी ठाणे यांच्याकडून कुठलीही ठोस कारवाई होत नसल्याने त्याबाबत शासनाने दुर्बल व इतर मागासवर्गीय शेतकऱ्यांचे वारस लावणेकामी व ती जमिन मुंबई कुळवहिवाट अधिनियम १९४८ नुसार शेतकऱ्यांना जमिन परत देण्यासाठी शासनाकडून अंमलबजावणी करणे अनिवार्य असल्याने शासनाने अतिगंभीररीत्या दखल घेऊन शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

---

### श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, माननीय मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे नाहुर, येथील स.नं. १५/४, क्षेत्र १ एकर, १०.५ गुंठे ही मिळकत सन १९३९ पासून सॉल्ट डिपार्टमेंट यांच्या नावे दाखल असून, सन १९५० मध्ये मतीबाई शंकर यांचे नाव गाव नमुना नंबर ७/१२ च्या इतर हक्क सदरी "संरक्षित कुळ" म्हणून दाखल आहे. दिनांक १५/०७/२०२२ वा त्या दरम्यान कुळाच्या वारसांची नोंद घेण्यासाठी निवेदने प्राप्त झालेली आहेत. तथापि, मौजे नाहुर या गावात अधिसूचना क्र.TNC – ५१५७/ ३१९० - M, दिनांक २९

मार्च, १९५७ व बॉम्बे गर्व्हमेंट गॅझेट, दिनांक ०४ एप्रिल, १९५७ अन्वये "बिनशेती व इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट" या प्रयोजनासाठी राखून ठेवली असल्यामुळे नाहुर गावास कुळकायदा लागू नाही. तसेच सदर जमीन केंद्र शासनाची असल्याने, मौजे नाहुर, येथील स.नं. १५/४, क्षेत्र १ एकर, १०.५ गुंठे या जमिनीच्या अभिलेखात कुळाच्या वारसांची नोंद घेण्याचे / वारसांची नावे दाखल करणे शक्य नाही.

मौजे बळकुम, ता.जि.ठाणे येथील नविन सर्व्हे नं.१५१/ १५ (जुना स.नं. ७४/ १५) चे क्षेत्र ०-२९-५ हेक्टर आर ही जमीन सन १९६३ साली महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या कलम ६३ मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या पूर्वपरवानगीने दिनांक ०७/०६/१९६३ रोजीच्या आदेशान्वये मे. राधाकृष्णन रामनारायण प्रा.लि. यांना "औद्योगिक प्रयोजनासाठी" खरेदी करण्यास मान्यता दिली आहे.

तथापि, महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एनएपी-१००२/ प्र.क्र.२१६/ २००९, दिनांक ०५/१२/२००५ मधील मुद्दा क्र.४.३.१ अनुसार तसेच सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१ अन्वये महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या कलम ६३ आणि कलम ६३ एक-अ मधील तरतूदीनुसार अकृषिक प्रयोजनासाठी अथवा खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी खरेदी झालेल्या कुळवहिवाटीच्या शेतजमिनींचा खरेदीदाराकडून विहित मुदतीमध्ये (५+५वर्ष) तद्नुषंगिक वापर होणे अनिवार्य आहे. परंतु, असा अकृषिक वापर करण्यास संबंधित खरेदीदार यांनी कसूर केल्यास, जिल्हाधिकारी संबंधित खरेदीदारास एका महिन्याची नोटीस बजावून खरेदीदाराकडून जमीन परत घेईल आणि अशी जमीन शासनाकडे निहित होईल, अशी कुळवहिवाटीची शासन जमा झालेली जमीन ज्या भूधारणापध्दतीने प्रारंभी धारण केली होती, त्याच भूधारणापध्दतीने मुळजमीनधारकास अकृषिक वापरासाठी ती जमीन ज्या किंमतीला हस्तांतरीत झाली होती, त्याच किंमतीला मुळ जमीनधारकाला परत करण्याची तरतूद आहे.

उपरोक्त तरतुदीनुसार, श्री. रोहिदास इंद्रपाल पाटील यांनी मौजे बळकुम, ता. जि. ठाणे येथील नविन सर्व्हे नं. १५१/१५ (जुना स.नं.७४/१५) चे क्षेत्र ०-२९-५ हेक्टर आर, मे. राधाकृष्णन रामनारायण प्रा. लि. यांना औद्योगिक प्रयोजनासाठी खरेदी करण्यास परवानगी दिलेली जमीन संबंधित खरेदीदाराने विहित मुदतीत वापरात आणण्यास कसुर केल्याने मुळमालकास परत करण्याबाबत निवेदने जिल्हाधिकारी, ठाणे यांना सादर केली आहेत. तथापि, महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या कलम ६३ आणि कलम ६३ एक-अ मध्ये सन २०१६ साली केलेली अधिनियमातील सुधारणा ही पूर्वलक्षी प्रभावाने या प्रकरणी लागू करणे शक्य नसल्याने, उप विभागीय अधिकारी, ठाणे यांनी अर्जदाराचा उक्त जमीन परत मिळण्याबाबतचा अर्ज दिनांक ०९/०३/२०२३ रोजीच्या आदेशान्वये फेटाळला आहे.

*******

**लक्षवेधी सूचना क्र.५४४०६६१/फ**

**सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय अधिवेशन)**

**मा. श्री. रोहित पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"अहमदनगर जिल्हयातील कर्जत तालुक्यामधील वन विभागाच्या हद्दीतील माळढोक पक्षी अभयारण्याच्या पर्यावरण क्षेत्रातील खाणी संदर्भात माहे डिसेंबर २०२२ मध्ये नागपुर येथील अधिवेशनात उपस्थित लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात येणे. सदर चर्चेला उत्तर देताना एका मा. लोकप्रतिनिधीच्या आग्रहापाय महसूल विभागांतर्गत असलेल्या प्रांताधिकारी, कर्जत व तहसिलदार, कर्जत यांना शासनाने निलंबित करण्याबाबत सभागृहात सांगण्यात येवून तेव्हांपासून शासनाने त्यांचे निलंबन करण्यात येणे. परंतु पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचे संरक्षण करण्याची जबाबदारी ही जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सदस्य सचिव असलेल्या उपवनसंरक्षक अहमदनगर यांच्या समितीवर सनियंत्रण समितीची असणे, त्यामुळे माळढोक क्षेत्र अधिसूचित झाल्यानंतर सदस्य सचिव यांनी कारवाई करणे गरजेचे असणे, किंबहुना त्यांचमार्फत कार्यवाही होणे बंधनकारक असण, तथापि असे असतांना त्यांचेवर कारवाई होण्या महसूल विभागाच्या प्रांताधिकारी कर्जतहसिलदार, कर्जत यांचेवर कारवाई करून निलंबित करण्यात येणे. वास्तविकत: त्यांच्या या संदर्भातील निलंबनाला मॅट ने स्थगिती देऊन त्यांचे पुनस्थापना करण्याबाबत आदेशित करण्यात आलेले असणे, परंतु शासनाने त्याबाबत कार्यवाही करण्यात न येणे. सदर दोन्ही अधिकारी हे कार्यक्षम असून उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी व उत्कृष्ट तहसिलदार म्हणून शासनाने त्यांना गौरविण्यात आलेले असणे, त्यांचे केलेले निलंबन हे त्यांचेवर अन्यायकारक असणे, त्यामुळे त्यांचे निलंबन रद्द करून त्यांना पुन्हा सेवेत घेण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**श्री. राधाकृष्ण विखे पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

श्री. राम शिंदे,मा.विधानपरिषद सदस्य यांनी हिवाळी अधिवेशन २०२२ मध्ये कर्जत जि. अहमदनगर तालुक्यातील अनधिकृत खडी क्रशरच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक २०२ उपस्थित केली होती. सदर लक्षवेधी सूचनंवर दिनांक २७.१२.२०२२ रोजी सभागृहात झालेल्या चर्चेस अनुसरुन तत्का, उपविभागीय अधिकारी, कर्जत जि. अहमदनगर व तत्का तहसिलदार कर्जत जि. अहमदनगर यांनी केलेल्या अनियमिततांच्या अनुषंगाने त्यांना दि.३०.,१२.२०२२ रोजच्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले होते. तसेच प्रस्तुत प्रकरणातील अनियमीततेची संपूर्ण

चौकशी करून अहवाल तातडीने शासनास सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त, नाशिक यांना देण्यात आल्या असून त्यांचा अहवाल प्राप्त झालेला नाही. दरम्यानच्या कालावधीत उक्त निलंबन आदेशाविरुध्द संबंधित अधिकारी यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे न्यायालयीन प्रकरण दाखल केले होते. त्यास अनुसरुन शिक्षक आणि पदवीधर विधानपरिषद निवडणूक २०२३ च्या अनुषंगाने तत्का. उपविभागीय अधिकारी, कर्जत व तत्का. तहसिलदार कर्जत जि. अहमदनगर यांना लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ मधील कलम २८(A), लागू होत असल्याचे मत नोंदवून मा. न्यायाधिकरणाने उक्त दि.३०.१२.२०२२ रोजीच्या निलंबन आदेशास स्थगिती दिलेली असून सदर बाबतीत शासनाच्या वतीने मा.न्यायाधिकरणात शपथपत्र दाखल करुन प्रकरणातील वस्तुस्थिती मा.न्यायाधिकरणाच्या निदर्शनास आणण्यात आली आहे. तसेच, निलंबन आदेशास देण्यात आलेली स्थगिती रद्द करण्याची विनंती मा. न्यायाधिकरणास करण्यात आली आहे. तद्नंतरच्या कालावधीत संबंधित अधिका-यांनी शासन सेवेत पुनःस्थापित करण्याच्या केलेल्या विनंतीस अनुसरुन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक दि.०९.०७.२०१९ मधील तरतुदीनुसार तत्का. उपविभागीय अधिकारी, कर्जत व तत्का. तहसिलदार कर्जत यांना दि.०४.०५.२०२३ रोजीच्या आदेशान्वये शासनसेवेत पुनःस्थापित करण्यात आले आहे व त्यांना इतरत्र पदस्थापना देण्यात आली आहे.

********************

**लक्षवेधी सूचना क्र.२५२०**

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

श्री.धनंजय मुंडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.२५२० पुढीलप्रमाणे आहे:-

"मौजे मानघर (तालुका पनवेल, जिल्हा रायगड) येथे सर्व्हे नंबर ६७ ही दळी जमीन असणे, दळी जमीन ही स्थानिक ग्रामस्थ कुळांना देणे संदर्भात शासनाचे धोरण असणे, सदर धोरणाअंतर्गत स्थानिक ग्रामस्थांनी २०१४-१५ मध्ये तहसिलदार यांच्याकडे अर्ज करणे, तहसिलदार यांनी सदर अर्ज चौकशीकामी वनविभाग व मंडळ अधिकाऱ्याकडे पाठवणे, वन अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी ग्रामस्थांच्या बाजूने अहवाल पाठवणे, तद्नंतर वाटप करावयाची जमीन निर्वणीकरण झाली असल्याने वाटपासाठी सदर जमिनीचा स्वतंत्र ७/१२ तयार होणे, दरम्यानच्या काळात स्थानिक ग्रामस्थांनी वन हक्क कायद्यान्वये त्यांचे हक्क असल्याने अर्ज करणे, सन २०१८ मध्ये वन हक्क कायद्यान्वये स्थानिक ग्रामस्थांचे नाव लावण्यासंदर्भात तहसिलदार यांनी अहवाल पाठविला असणे, परंतु सदरची जमीन ही नवी मुंबई विमानतळा जवळ असल्याने व कोट्यावधी रुपयांची असल्याने एका विकासकाने जाणीवपूर्वक जमीन बळकाविण्याच्या दृष्टिकोनातून दळीनायकाच्या कुटुंबातील व्यक्ती व तहसिलदार यांना हाताशी धरून नियोजनबद्ध आराखडा तयार करणे, यातून ग्रामस्थांच्या अर्जावरून तयार झालेली फाईल तहसिलदार कार्यालयातून गायब करणे, व तद्नंतर दळी नायकांच्या वारसांच्या वारस हक्क प्रमाणपत्राच्या आधारे तहसिलदार यांचेकडून संपूर्ण सर्व्हे नंबर ६७ मधील १४२ एकर जमीन दळीनायकाच्या तीन वारसांच्या नावे करणे, तद्नंतर सदर जमीन विक्री परवानगीसाठी अर्ज करणे, वास्तविक पाहता सदर जमीन दळीनायकांच्या वारसांच्या नावे न करता स्थानिक ग्रामस्थ कुळांच्या नावे करण्याची तरतूद असणे, एका व्यक्तीला पाच एकर पेक्षा जास्त जमीन देय नसताना संपूर्ण १४२ एकर जमीन दळी नायकांच्या तीन वारसांना वाटप करण्याचे तहसिलदार यांनी आदेश करणे, तहसिलदार यांचे बेकायदेशीर आदेश रद्द करून त्यांचे नावे जमीन वाटप करण्यासंदर्भात वेळोवेळी तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज केलेला असणे, तथापि स्थानिक ग्रामस्थांचे हक्क दुर्लक्षित करून सदर जमीन भू-माफियांना विक्री करण्याच्या संदर्भातील प्रयत्नांना स्थानिक अधिकाऱ्यांनी सहकार्य करणे, ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनावर मा. महसूल मंत्री व मा.राज्यपाल यांच्या सूचनांकडे अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुलर्क्ष करणे, यामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये झालेला असंतोष व करावयाची उपाययोजना.

---

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

मौजे मानघर ता.पनवेल येथील गट क्रमांक ६७ मध्ये १४४-३३ हे.आर. इतके क्षेत्र असुन सदरचा ७/१२ मुळचा रिझर्व्ह फॉरेस्टचा आहे. दळी जमीन वाटपासंदर्भात महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.४२६८/२७०२३-w, दिनांक १४/०१/१९७० व दिनांक २६/०७/१९७१ अन्वये धोरण निश्चित करण्यात आले आहे. मौजे.मानघर येथील ग्रामस्थांनी सन २०१४-१५ मध्ये तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे केलेला अर्ज, वन अधिकारी, मंडळ अधिकारी यांच्या अहवाला यासंदर्भात तलाठी गाव दप्तर, मंडळ अधिकारी

लक्षवेधी सूचना क्र.२५४६

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंल्पीय) अधिवेशन

श्री. नितीन पवार, मा.विधानसभाद सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"जि.पालघर, डहाणू तालुक्यातील वाणगाव-चारोटी मार्गावरील दाभले गावच्या हद्दीतील जागेत सुरु असलेल्या प्रिमीयम इन्फ्रा सर्विसेस प्रा.लि. या कंपनीच्या कास्टींग यार्डमधील आएमसी प्लांटची परवानगीची मुदत २५ जून २०२२ रोजी संपुष्टात आली असतानाही सदरहू प्लांट गेले ७ महिन्यांपासून विनापरवानगी बेकायदेशीररित्या सुरु असल्याचा प्रकार दि. १८/१/२०२३ रोजी निदर्शनास येणे, सदरहू प्लांटमधून वेस्टर्न डेडीकेटेड फ्रेट कॉरीडॉर मार्गावरील पुल व इतर कामांसाठी आवश्यक रेडीमिक्स कॉंक्रिट तयार करुन त्याची वाहतूक करण्यात येत असणे, सदरहू प्लांट सदर जागेवर गेले तीन वर्षांपासून सुरु असल्याने प्लांटमधून उडणारे धुलीकण हवेद्वारे आजुबाजुच्या बागायती पिकांवर बसत असल्याने मोठया प्रमाणात रोग पसरुन शेती पिकांची प्रत घसरल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, वाणगाव परिसरात पिकणारी साधी मिरची संपूर्ण देशात प्रसिध्द असून परदेशात देखील मोठया प्रमाणात निर्यात होत असणे. सदर परिसरात साधी मिरची ८०० हेक्टर तर ढोबळी मिरची २५० हेक्टरवर पीक घेण्यात येत असल्याने सदर भागात सुरु असलेल्या आरएमसी प्लांटमुळे या परिसरातील पिकांना सिमेंटमिश्रीत धुलीकणांच्या प्रदूषणामुळे वाणगावसहित दाभले, गोवणे, साखरे आदी गावातील बागायती शेतीला फटका बसून पिकांची प्रतवारी घसरल्यामुळे येथील हजारो शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत असणे, डहाणू परिसर हा पर्यावरणीय दृष्टीने अतिसंवेदनशील घोषित करण्यात आला असून, प्रदूषण करणारे उद्योग तथा आरएमसी प्लाटसारखे प्रकल्प, पर्यावरणाला धोका निर्माण करणारे प्रकल्प सुरु करण्यास बंदी असतानाही, सदर परिसरात मुदत परवानगी संपूनही आरएमसी प्लांट विना परवाना बेकायदेशीररित्या सुरु असणे, सदरहू प्लांट गेले सात महिन्यांपासून प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आणि डहाणू तहसीलदार यांचे आर्थिक संगनमताने सुरु असल्याने सदर प्लांटच्या प्रदूषणामुळे येथील स्थानिक शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होणे, शेती आणि बागायतीला गंभीर धोखा पोहोचविणाऱ्या सदर प्रदूषणकारी प्रिमीयर इन्फ्रा सर्विसेस प्रा. लि. कंपनीच्या आरएमसी प्लांटला परवानगी देऊ नये अशी स्थानिक शेतकऱ्यांनी मागणी करुनही सदर प्रकरणी शासन तथा सबंधित विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याने सदर शासकीय अधिकारी यांचे आर्थिक संगनमताने अद्यापही आरएमसी प्लांट सुरु असणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील स्थानिक शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व चिंतेचे वातावरण याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

डहाणू तालुक्यातील वाणगांव चारोटी मार्गावरील मौजे दाभले येथील गट क्र.१४५/८ व गट क्र.१५७/२ या क्षेत्रावरील जमिनीत प्रिमीयर इन्फ्रा सर्विसेस प्रा.लि.यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडील परवानगी घेऊन रेडीमिक्स कॉक्रीट (आर. एम. सी) प्लांट सुरू केलेला आहे. सदर प्रकल्पास

दाभले ग्रामपंचायतकडून दिनांक २५.०६.२०२० रोजी ना हरकत प्रमाणपत्र दिले असून रेडीमिक्स कॉक्रीट (आर. एम. सी) प्लांट परवान्याची मुदत दिनांक ३१.०८.२०२३ पर्यंत देण्यात आलेली आहे. त्यामुळे विना परवानगीने बेकायदेशीररीत्या प्लांट सुरू असण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

सदर प्लांटमुळे मौजे वाणगाव, दामले, गोवणे, साखरे, या गावातील स्थानिक शेतकऱ्यांकडून साधी मिरची होळी मिरची तसेच इतर बागायती पिकांच्या नुकसानीचायत आणि घसरणाऱ्या प्रतवारीबाबत निवेदन/तक्रार अथवा अर्ज तहसिल कार्यलय डहाणू यांचेकडे प्राप्त झालेले नाही. तथापी, सदर पिकांच्या नुकसानीबाबत तालुका कृषि अधिकारी डहाणू यांचेकडून अहवाल मागविण्यात आलेला असून सदर मुळे बागायती पिक नुकसानीबाबत अदयाप पर्यंत कोणत्याही समाजसेवी संस्था व स्थानिक बागायतीदारांनी या संबंधी निवेदन तालुका कृषि कार्यालयास दिलेले नाही.

डहाणू तालुका पर्यावरण दृष्टया अतिसंवेदनशिल म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. तथापी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडील पूर्व परवानगीने सदर आर.एम.सी. प्लांट सुरू आहे. तसेच हा प्रकल्प सर्व परवानगी घेऊन सुरू असल्याने अधिकाऱ्यांचे संगनमत वा दुर्लक्ष केल्याची बाबीत तथ्य नाही. तसेच सदर प्लांटच्या प्रदूषणामुळे स्थानिक शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होणे, शेती आणि बागायतीला गंभीर धोका पोहोचविणाऱ्या सदर प्रदूषणकारी प्रिमीयर इन्फ्रा सर्विसेस प्रा. लि. कंपनीच्या आरएमसी प्लांटला परवानगी देऊ नये? अश्या आशयाचे निवेदन/ अथवा अर्ज प्राप्त झालेले नाही.

**************

**लक्षवेधी सूचना क्रमांक :- ११५६**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्रीमती प्रतिभा धानोरकर, ॲड यशोमती ठाकूर (सोनावणे), विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ११५६ पुढीलप्रमाणे आहे :-

"चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा- अंधारी व्याघ्र प्रकल्पालगत असलेल्या मोहुर्ली बफर क्षेत्रात शेतावर जात असलेलया शेतक-याला दगा धरुन बसलेल्या पट्टेदार वाघाने हल्ला करुन ठार केल्याची घटना ०८.२०.२०२३ रोजी घडणे, निळकंठ नारायण नन्नावरे असे मृतक शेतक-यांचे नांव असणे, या घटनेमुळे या परिसरात शोक व्यक्त होणे तसेच घबराटीचे वातावरण निर्माण होणे, येथे माणसांवर वाघांचे हल्ले होणे ही नित्याची बाब झाली असणे, त्यामुळे शेतक-यांना शेतात जाणे, विद्यार्थ्यांना शाळेत जाणे दुरापास्त होणे, त्यामुळे शासनाने येथील वाघांचे वाढते हल्ले रोखण्याबाबत तातडीची कार्यवाही करावी अशी आग्रही मागणी असतसानाही त्याबाबत शासनाने होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. सुधीर मुनगंटीवार**

### निवेदन

चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये ताडोबा राष्ट्रीय उद्यान व अंधारी वन्यजीव अभयारण्याचा समावेश असून व्याघ्र प्रकल्पाचे कोर क्षेत्र ६२५.८२० चौ.कि.मी. असून बफर क्षेत्र ११०१.७७१ चौ.कि.मी. आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पांतर्गत उपसंचालक (बफर) विभागामध्ये ६९७.३३ चौ.कि.मी. वनक्षेत्र असून त्या अंतर्गत मोहर्ली, चंद्रपूर (बफर), मूल, शिवणी, पळसगांव, खडसंगी (बफर) असे एकूण ६ परिक्षेत्रांचा समावेश आहे. सदर क्षेत्रात वाघ, बिबट, अस्वल, रानडुक्कर, रानगवा व इतर वन्यप्राण्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वावर आहे.

बफर विभागाच्या मोहर्ली परिक्षेत्रांतर्गत नियतक्षेत्र मोहर्ली-१ मध्ये दिनांक ०८.०२.२०२३ रोजी श्री. निलकंठ नारायण नन्नावरे, रा. मोहर्ली यांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आली आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास रु. २०.०० लक्ष इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- नियमित गस्तीद्वारे वन्यप्राण्यांच्या हालचालींचे सनियंत्रण करण्यात येते. याकरीता अत्याधुनिक साधन सामुग्री जसे की कॅमेरा ट्रॅप, दुर्बिण, जीपीएस, पीडीए यांचा वापर करण्यात येतो.
- ज्या भागात वाघाचे/बिबटयाचे अस्तित्व आहे त्या ठिकाणी जंगलात न जाण्याबाबत सावधानतेचा इशारादर्शक पोस्टर्स लावण्यात येतात.
- वन्यप्राण्यांसाठी जंगलात पिण्याच्या पाण्याची सुविधा व्हावी याकरीता पाणवठे तयार करण्यात येतात.
- वाघ/बिबटयांचे भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्राण्यांसाठी जंगलातच चारा उपलब्ध होण्यासाठी कुरण विकासाची कामे घेण्यात येतात.

- लोकांनी जंगलात जाऊ नये व मानव-वन्यप्राणी संघर्ष होऊ नये म्हणून उपलब्धतेनुसार गावक-यांना निस्तार दरावर फाटे, बांबु व सरपण उपलब्ध करून देण्यात येते.
- ग्रामस्थांचे वनावरील अवलंबित्व कमी व्हावे व मानव-वन्यप्राणी संघर्षाला आळा बसावा म्हणून प्रायोगिक तत्वावर एलपीजी गॅस पुरवठा करण्यात आलेला आहे.
- वाघ/बिबट यांना नागरी वस्तीत येण्यापासून रोखण्याकरीता कर्मचा-यांचे वेगवेगळे गट तयार करण्यात येवून तसेच स्थानिक क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी, फिरते पथक, संरक्षण पथक यांचेमार्फत क्षेत्रात नियमित गस्त करण्यात येते.
- मानव-वन्यप्राणी संघर्ष रोखण्याकरीता वनविभागात जलद प्रतिसाद चमू गठीत करण्यात आलेली असून त्यांना सर्व साहीत्यासह वाहन उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. सदर चमुद्वारे वनक्षेत्रात सतत गस्ती करून मानव-वन्यप्राणी संघर्ष रोखण्याचे कार्य करण्यात येत आहे.
- वन्यप्राण्याचे हल्ल्यात मृत/जखमी चे कायदेशीर वारसांस नियमानुसार तात्काळ नुकसान भरपाईची रक्कम अदा करत येते.

*******

लक्षवेधी सूचना क्रमांक :- १५३८

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

श्री. पृथ्वीराज चव्हाण, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १५३८पुढीलप्रमाणे आहे :-

"सातारा जिल्ह्यातील कराड व पाटण तालुक्यातील डोंगरी व दुर्गम भागामध्ये वन्य जीवप्राण्यांचा वावर असणे, अन्नांच्या शोधामध्ये या वन्य प्राण्यांचा शहरी भागांमध्ये वावर वाढलेला असणे, परिणामी वन्य प्राण्यांकडून शेतकरी व त्यांच्या पाळीव जनांवरना धोका निर्माण होत असणे, वराडे, ता. कराड, जि. सातारा येथे जखमी वन्य प्राण्यांवर उपचार करण्याकरिता १० महिन्यांपूर्वी ट्रांझिट सेंटर सुरु करण्याची मंजूरी मिळालेली असणे. कोल्हापूर, सांगलीसह कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी येथील वन्यजीवांवर उपचारासाठी व देखभालीसाठी वराडे, ता. कराड येथील केंद्र सोयीचे असणे. ७ कोटी ५८ लाखांच्या कामांकरिता उपवनसंरक्षक यांच्या नावे जमा झालेली रक्कम त्यांनी तात्काळ सार्वजनिक बांधकाम विभागास वर्ग करुन ही मागील १० महिन्यांमध्ये कोणतेही काम सुरु न करणे. जखमी व शहरी वस्तीमध्ये पकडण्यात आलेल्या वन्य प्राण्यावर उपचार करणारे ट्रांझिट सेंटरचे काम त्वरीत सुरु करणेबाबत शासनाची कार्यवाही व उपाययोजना"

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. सुधीर मुनगंटीवार**

**निवेदन**

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वन्यजीवांच्या उपचाराकरिता ट्रान्झीट ट्रिटमेंट सेंटरची (Transit Treatment Centre) निर्मिती करण्याचा निर्णय राज्य वन्यजीव मंडळाच्या १६ व्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यानुसार ट्रान्झीट ट्रिटमेंट सेंटर बांधकामाच्या प्रारुप नकाशास (Type Plan) शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सातारा वन विभागांतर्गत कराड वनपरिक्षेत्रात मौजे वराडे, गट नं.७२८ ता. कराड, जि.सातारा येथे ट्रान्झीट ट्रिटमेंट सेंटर स्थापन करणे प्रस्तावित करण्यात आले.

ट्रान्झीट ट्रिटमेंट सेंटर, विद्यमान इमारत दुरुस्ती, ट्रान्झीट ट्रिटमेंट सेंटर प्रशासकीय इमारत क्र.१ व क्र.२ पक्षीगृह युनिट, Carnivorous Unit, Herbivorous Unit, Reptile Unit इ. बाबींचा समावेश करुन स्टेज १ चे प्राथमिक अंदाजपत्रक रक्कम रु. ७५८.१२ लक्ष चे नमूना आराखडयानुसार तयार करण्यात आला. सदर आराखड्यानुसार राज्य कॅम्पा योजनेंतर्गत उपलब्ध झालेले रु. ७५८.१२ लक्ष अनुदान कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, (पश्चिम) विभाग सातारा यांचेकडे दिनांक ३१.०३.२०२२ रोजी वर्ग करण्यात आले आहे.

सदर कामाच्या अंदाजपत्रकास मुख्य अभियंता, पुणे यांनी तांत्रिक मंजुरी प्रदान केली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने ई-निवीदा प्रक्रिया राबविण्यात आली असता सर्वात कमी दराच्या (L-१) निवीदा धारकास कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांचेमार्फत दिनांक २३.०१.२०२३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

मौजे वराडे येथील गट नं. ७२८ येथे अस्तित्वात असलेल्या वन व सामाजिक वनीकरण विभागाच्या दोन रोपवाटीका अन्यत्र हलवून दिनांक १३.०२.२०२३ रोजी वनक्षेत्रपाल कराड व उपविभागीय अधिकारी, सा.बां.उपविभाग (उत्तर) कराड यांचे प्रतिनिधी यांनी संयुक्त पाहणी करुन सदर जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात देण्यात आली आहे. त्यानुसार ट्रान्झीट ट्रिटमेंट सेंटरचे बांधकाम प्रगती पथावर असून सदर काम माहे डिसेंबर, २०२३ पर्यत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

******

रोटा/एच-१०४८[८००-८-२०२३]-

**लक्षवेधी सुचना क्र. ७१**

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन**

"श्री. अतुल भातखळकर विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७१ पुढील प्रमाणे :-

"ऑनलाईन अर्ज करुनही राज्यातील १ लाख २३ हजार विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालयांनी प्रलंबित ठेवल्याची धक्कादायक बाब माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यामध्ये, ठाणे, मुंबई, पालघर व रायगड या जिल्ह्यांतील तब्बल ७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित असणे, त्यामुळे, अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले असणे, त्यामुळे, मोठ्या प्रमाणावर अर्ज प्रलंबित ठेवणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई करण्याची गरज असणे, तसेच, विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये याकरीता ठोस उपाययोजना करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**श्री. चंद्रकांत पाटील, मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे निवेदन**

उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत एकुण १७ शिष्यवृत्ती योजना राज्यात कार्यान्वित आहेत. या शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन पध्दतीने महाडीबीटी पोर्टलमार्फत राबविण्यात येतात. तसेच या योजनाअंतर्गत शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांच्या थेट बँक खात्यावर ऑनलाईन पध्दतीने जमा करण्यात येतो. माहे जुलै, २०२३ मधील महाडीबीटी डॅशबोर्डनुसार सन २०२२-२३ मध्ये उच्च व तंत्र शिक्षण संचालनालयाअंतर्गत एकुण ५,१४,३४५ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज प्राप्त झाले. या अर्जापैकी ४,६४,९७७ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. तसेच सन २०२२-२३ मध्ये ठाणे, मुंबई, पालघर व रायगड या जिल्हयातील ४९,५५१ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज प्राप्त झाले, यापैकी ४५,९२९ विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. उर्वरीत विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या अर्जांची नियमानुसार तपासणी करुन शिष्यवृत्ती अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

------------------

शेरा - ५५६२४ - (७५०-७-२०२३)

E:\Jagtap\2021\LAQ 2021\2023 अर्थसंकल्पिय अधिवेशन\लक्षवेधी सुचना क्र. 71.docx

लक्षवेधी सूचना क्रमांक-७३४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक-७३४

श्री.धनंजय मुंडे, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ७३४ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील उद्योगांपाठोपाठ पंतप्रधान दिवस योजनेतून मंजूर करण्यात आलेली घरकुले अन्य राज्यात वळविण्यात येण्याबाबत केंद्रीय ग्रामविकास विभागाने राज्य शासनास आदेशीत केल्याची बाब माहे डिसेंबर २०२२ ते जानेवारी २०२३ दरम्यान उघडकीस आली असणे, राज्यात सदर योजनेतून मंजूर करण्यात आलेल्या घरकुलांच्या उद्दिष्टातून प्रत्यक्ष घरकुल मंजुरी करण्याचा कालावधी दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत असताना देखील शासनाने जिल्हा प्रशासनांना ३१ डिसेंबर पर्यंतच आपले उद्दिष्ट पूर्ण करावे व ३१ डिसेंबर अखेरीस मंजुरीसाठी शिल्लक राहिलेली घरकुले अन्य राज्यात वळविण्यात येतील असे आदेश दिले असणे व या आदेशान्वये राज्यातील गरजू जनतेचे सुमारे १ लाख घरकुले ही अन्य राज्यात वळविण्यात आलेली असणे, सदर आदेश रद्द करून राज्याच्या हक्काची घरकुले पुन्हा मंजूर करण्याबाबत होत असलेली मागणी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा.मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे निवेदन

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत राज्यास १४,१८,०७८ इतके उद्दिष्ट प्राप्त असून त्यापैकी १४,१६,०२३ (९९.८%) घरकुलांना मंजूरी देण्यात आली असून ९,९९,६२७ इतकी घरे पूर्ण असून ४,१६,३९६ इतकी घरे प्रगतीपथावर आहेत व मंजूरीसाठी शिल्लक २०५५ उर्वरीत घरकुलांच्या मंजुरीची प्रक्रिया सुरु आहे.

केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या दिनांक २७ डिसेंबर २०२२ च्या पत्रान्वये, ऊर्वरित लाभार्थ्यांची मंजुरी दिनांक ३१ डिसेंबर २०२२ अखेर पूर्ण करावी अन्यथा सदरचे उद्दिष्ट दुसऱ्या

नोंद-ब्च ५५८ (७२५-७-२०२३)

(कृ.मा.प.)

राज्यास देण्याबाबतच्या सूचना सर्व राज्यांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत ऊर्वरीत लाभार्थ्यांना मंजुरी देण्याच्या सूचना सर्व जिल्ह्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच या संदर्भात अपर मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायतराज विभाग व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांनी सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक यांच्या बैठका घेऊन कालबध्द कार्यक्रम आखून सर्व लाभार्थ्यांना मंजूरी देण्याच्या सूचना दि.२७/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिल्या आहेत. तथापि, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाकडून अजुनही मंजूरीची प्रक्रिया सुरु असून, राज्याचे कोणतेही उद्दिष्ट इतर राज्यात वळविण्यात आलेले नाही. मंजूर उद्दिष्टापैकी ऊर्वरित पात्र लाभार्थी मंजुरीची प्रक्रिया सुरु असून यापैकी कोणतेही पात्र लाभार्थी घरकुलापासून वंचित राहणार नाहीत.

---

लक्षवेधी सूचना क्रमांक:- २५४२

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्री.अनिल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २५४२ पुढीलप्रमाणे आहे :-

"जि.ठाणे, शहापूर तालुक्यात राज्य शासनाच्या जलयुक्त शिवार अभियान, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व विविध योजने अंतर्गत २०१६-२०१८ या कालावधीत करण्यात आलेल्या २० गावांमध्ये साध्या विहिरीचे बांधकाम आणि दुरुस्तीची कामे गणेशकृपा कन्स्ट्रक्शन (मुरबाड), बुधरानी धर्मू इंदनदास, उल्हासनगर या ठेकेदारांनी प्रत्यक्षात विहिरीची कामे न करता सुमारे १ कोटी १९ लाख रुपये निधीचा अपहार करुन भ्रष्टाचार केल्याचा प्रकार दि.१९/१/२०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, जिल्हा परिषदेच्या उपअभियंता यांनी अघई ग्रामपंचायतीचे सरपंचासह सहा ठेकेदारांवर शहापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणे, सदरहू ठेकेदाराने तालुक्यात कामे न करताच कागदोपत्री पूर्ण केल्याचे दाखवून आणि देयके मिळविण्यासाठी सबंधित ठेकेदाराने २०१७ मध्ये वांद्रे येथील २०१५ पासून बंद असलेल्या शासकीय तंत्र निकेतन संस्थेच्या नावाचा बनावट चाचणी अहवाल सादर करुन १ कोटी १९ लाख रुपये शासकीय निधी प्राप्त करुन हडप करणे, यामुळे सदरहू तालुक्यातील २० गावातील ग्रामस्थ जनतेची विहिरीच्या लाभा अभावी झालेली प्रचंड गैरसोय, ठाणे जिल्हा परिषदेचे सबंधित अधिकारी व घई गावचे सरपंच आणि सहा ठेकेदार यांनी आर्थिक संगनमत करुन शासकीय निधीचा अपहार करुन भ्रष्टाचार करण्यात येणे, सदर प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणे, सदर बोगस काम करणाऱ्या कंपन्यांना तात्काळ काळया यादीत टाकण्याची होत असलेली मागणी, अद्याप पोलीसांनी सदर प्रकरणाची चौकशी करुन यातील दोषींविरुध्द कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, सदरहू भ्रष्टाचारामुळे शासकीय निधीचा मोठया प्रमाणात झालेला अपव्यय व नुकसान, तसेच शेतकऱ्यांचे विहिरी अभावी शेती पिकांचे झालेले प्रचंड नुकसान, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे येथील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले तीव्र संतापाचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया".

---

मा. मंत्री, मृद व जलसंधारण यांचे निवेदन

जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत पंचायत समिती शहापूर येथे जलयुक्त शिवार योजने अंतर्गत १७, देखभाल व दुरुस्ती वॉटर फंड अंतर्गत १ व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत २ अशी एकूण २० विहीर बांधण्याची कामे करण्यात आलेली आहेत. जलयुक्त शिवार योजनेकरीता

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जलयुक्त शिवार अभियान, जिल्हास्तर समिती ठाणे यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे व देखभाल दुरूस्ती वॉटर फंड कामांना जिल्हा परिषदेने प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमामधील कामांना संबंधित ग्रामपंचायत यांच्याकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आहेत. सदर कामांचे कंत्राट गणेशकृपा कन्स्ट्रक्शन, बुधराणी धर्मू इंदनदास, सरपंच ग्राम पंचायत अघई, सिध्दी प्रदिप देशमुख, मनिष गोविंद भेरे, प्रितम गोविंद भेरे यांना ई-निविदेद्वारे स्पर्धा पध्दतीने देण्यात आलेले होते. कामे पुर्ण झाल्यानंतर शासकीय तंत्रनिकेतन बांद्रा, मुंबई या त्रयस्थ तपासणी संस्थेचे साहित्य तपासणी बनावट अहवाल कंत्राटदारांनी सादर केल्याने संबंधित कंत्राटदाराविरुध्द दि. १७.०१.२०२३ रोजी शहापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर प्रकरणाची सखोल तपासणी करण्याकरिता सदर प्रकरण आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांचेकडे वर्ग करण्यात आले आहे व सदर प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

तसेच प्रथम दर्शनी दोषी आढळल्याने संबंधित विभागीय कार्यालयातील तत्कालीन शाखा अभियंता व आरेखक यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. शासकीय तंत्रनिकेतन बांद्रा, मुंबई या त्रयस्थ संस्थेचे तपासणी अहवाल बनावट असल्याचे निर्दशनास आल्यामुळे सदरची कामे सुस्थितीत आहेत किंवा कसे याबाबत खात्री करण्याकरिता सदर कामाचे पुन्हा SKG PROJECT & ENGG.PVT.LTD या संस्थेकडून स्ट्रक्चरल ऑडीट करून घेतलेले आहे. सर्व कामांचा दर्जा व गुणवत्ता योग्य असून सदर योजनांचे संबंधित ग्रामपंचायतीकडे हस्तांतरण करण्यात आले आहे. सदर योजना कार्यान्वित असून सुयोग्य रितीने चालू आहेत व त्याद्वारे ग्रामस्थांना नियमित पाणी पुरवठा सुरू आहे.

---

H-1142-1a

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**सर्वश्री. विजय वडेट्टीवार, सुनिल केदार, अस्लम शेख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २०४४ पुढीलप्रमाणे आहे :-**

"यवतमाळ शहरातील पाणी पुरवठ्याचे नियोजन करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या गलथान कारभाराचा व नियोजनशून्यते मुळे शहरातील पाणी पुरवठा योजनेचे तीनतेरा वाजने असून दिंनाक ४ मार्च २०२३ रोजी सकाळी ८ वाजता माईदे चौकातील विर्दभ हाऊसिंग सोसायटीसमोर अचानक रस्त्यावर स्फोट होऊन पाणी पुरवठा योजनेचे पाईप फुटून पाण्याच्या दाबाने रस्त्यात उखडून गेलयाची माहिती दिंनाक ४ मार्च, २०२३ रोजी निर्देशनास येणे, याच रस्त्यावरून शिकवणी वर्गाला जात असलेली महाविद्यालयीन विद्यार्थीनी या स्फोटामूळे जखमी होणे, जीवन प्राधिकरणाच्या निष्काळजीपणामूळेच हा स्फोट झालयाची नागरिकोची तक्रार असणे, यवतमाळ शहारात बारमाही पाणी टंचाई असणे, शहरातील काही भागात १० ते १५ दिवसांच्या अंतराने नळाचे पाणी पोहोचत असणे, त्यामुळे नागरिकांचा रोष जीवन प्राधिकारण वर असणे, शहारातील पाणी टंचाई लक्षात घेता प्राधाकरण मंडळाच्या वतीने करण्यात येत असलेले निष्काळजीपणा याकडे शासनाचे होत असलेले अखम्य दुर्लख त्यामुळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी या गंभीर प्रकरणाची चौकशी करून संबधितावर कार्यवाही होणेबाबत तसेच यवतमाळ शहराला बारमाही शुघ पाणी उपलब्ध होण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना, व शासनाची प्रतिक्रिया."

**-: <u>मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u> :-**

यवतमाळ शहरासाठी मुळ पाणीपुरवठा योजना निळोणा धरण उद्भव घेवुन २००१ सालच्या लोकसंख्येवर संकल्पित करून सन १९७२ मध्ये पूर्ण करण्यात आली. तद्नंतर निळोणा व चापडोह धरणावरून सन २०२६ सालच्या लोकसंख्येवर संकल्पित करून सन २००३ पासून पाणीपुरवठा सुरु करण्यात आला.

यवतमाळ शहरालगतच्या ८ गावांचे विलीनीकरण झाल्याने केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०४८ सालची संकल्पित लोकसंख्या गृहीत धरून वाढीव पाणीपुरवठा योजना बेंबळा धरणावरून मंजूर करण्यात आली. सदर योजनेचे सद्यस्थितीस ९५ टक्के काम पूर्ण झाले असून जुलै, २०२२ पासून शहराला पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे. सद्यस्थितीस निळोणा व चापडोह धरणावरून पूर्ण क्षमतेने व बेंबळा धरणावरून ३५ टक्के क्षमतेने चालवून ५० एमएलडी पाणीपुरवठा करण्यात येत आहे व शहरास आता काही भागात दोन दिवसाआड तर काही भागात तीन ते चार दिवसाआड पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.

दिनांक ०४ मार्च, २०२३ रोजी सकाळी आठ वाजता माईदे चौकात साई पॉईंट जवळ जुन्या अस्तित्वातील ७६२ मिमी व्यासाची मृदू पोलादी पाईप लाईन फुटली. तेव्हा, पाण्यामुळे रस्त्यावर जात असलेली एक मुलगी घसरून पडली. सदर मुलीची चौकशी करून कार्यकारी अभियंता व उपविभागीय अभियंता हे त्या मुलीच्या घरी भेटीसाठी गेले. त्या मुलीला घसरून पडल्यामुळे एका हाताला व पायाला खरचटले होते. सदर पाईप लाईन चापडोहवरील सन २००० मध्ये टाकलेली पाईप लाईन आहे. सदर लाईनवर चालू झाल्यापासून एकदाही इतक्या मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती झाली नाही. तसेच, दीडमहिन्यापूर्वीच या लाईनवरील Air Valve दुरुस्त करण्यात आलेले आहे. सदर पाईप लाईन फुटण्यासाठी कोणतेही तांत्रिक कारण आढळून येत नाही. त्यामुळे, सदर लाईनवर Air Lock होऊन कमकुवत ठिकाणी पाईप फुटला असावा, अशी शक्यता वाटते. तद्नंतर त्वरित पंप बंद करून २४ तासाच्या आत गळती काढून पाणीपुरवठा सुरु करण्यात आला. शिवाय नव्याने प्रस्तावित अमृत अभियानांतर्गत कार्यालयीन परिसरात पाईप लाईन टाकण्यात आली आहे व कार्यान्वित सुद्धा करण्यात आली आहे. काही काळानंतर चापडोह योजनेतील पाईपलाईन संपूर्णतः निकामी करण्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नियोजन आहे.

अमृत अभियानांतर्गत यवतमाळ वाढीव पाणीपुरवठा योजनेचे काम ९५ टक्के पूर्ण झाली असून शहरात टाकलेल्या वितरण व्यवस्थेची आंतरजोडणीचे कामे प्रगतीत आहेत. सदर आंतरजोडणी पूर्ण झाल्यावर शहरास नियमित पाणीपुरवठा करण्यास मदत होणार आहे व त्यामुळे यापुढे शहराला कोणतीही पाणीटंचाई शहराला भासणार नाही.

*****

लक्षवेधी सूचना क्र.१४८३

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

**श्री.विश्वनाथ भोईर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"मौजे आंबिवली ता. कल्याण जि.ठाणे येथील एन.आर.सी कंपनीने आदानी समूहास जमिनी विक्री करणे सदर जमिनीवर आदानी समूहा तर्फे मोठ्या प्रमाणात बांधकामास सुरुवात करणे, बांधकामा करिता आदानी समूहातर्फे सदर जमिनीवर स्फोटकांचा वापर करून जमिनीमध्ये उत्खनन केल्याजाणे सदर स्फोटामुळे आंबिवली परिसरातील घरांना तडे जाणे खिडक्यांची काचे फुटून नागरिकांच्या घरांचे प्रचंड नुकसान होणे. सदर नुकसानी बाबत स्थानिक नागरिकांनी आदानी समूहाकडे नुकसान भरपाई ची मागणी केली असता आदानी समूहाकडून नागरिकांना उद्धट वागणूक देऊन हाकलून देणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नागरिकांची शासनप्रती निर्माण झालेला तीर्व असंतोष आदानी समूहाने एन.आर.सी कंपनीच्या जागेवर सुरु केलेल्या बांधकामासाठी जमिनीमध्ये उत्खनन करण्यासाठी केलेल्या स्फोटामुळे परिसरातील नागरिकांच्या घराचे झालेले नुकसानीचा मोबदला अदा करून आदांनी समूहावर कारवाई करणेबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाय योजना."

**श्री.राधाकृष्ण, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

मौजे आंबिवली ता.कल्याण येथील जमिन स.नं.११, स.नं. १३ ते २४ या जमिनी नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लिमीटेड कंपनीचे नांवे दाखल आहेत. एन.आर.सी. कॉर्पोरेशन लिमीटेड कंपनीमार्फत सदर जमीनी विकसीत करण्याचे कामकाज चालु असुन सदर जमीनीचे सपाटीकरण करणेकामी जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ०७.११.२०२२ अन्वये उत्खनन व सपाटीकरण करीता परवानगी देणेत आली आहे. सदर जमीनीचा विकास करताना मातीचे उत्खनन करुन ती माती त्यांच भूखंडाच्या सपाटीकरणांकरिता वापरली जात आहे. सदरचे केलेले गौणखनिज उत्खनन बाहेरच्या ठिकाणी वाहतूक केले जात नाही.

मे. हॅरी इंन्फ्रास्टक्चर प्रा.लि. या कंपनीने दि. २३.११.२०२२ अन्वये स्फोटके वापरणेची परवानगी घेतलेली आहे. त्यानुसार सदर जमीनीमध्ये Control Blasting या आधुनिक जर्मन पध्दतीने उत्खनन केले जात आहे. अंबिवली ग्रामंस्थाकडून सुरूगंस्फोटकांच्या वापरामुळे घरांचे नुकसान झाले असेलेबाबत तक्रारी अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने पाहणी केली असता ज्या ठिकाणी स्फोटके वापरण्यात येतात त्या ठिकाणपासुन आंबिवली हे गाव अंदाजे ७०० मिटर अंतरावर आहे तसेच, स्वराज्य नेपच्युन ही नागरी वसाहत अंदाजे ८०० मिटर अंतरावर आहे. संपूर्ण जमिनीत एन.आर.सी. कंपनीने अंदाजे १५ फुट उंचीचे दगडी कंपाऊंड घातलेले आहे. संपूर्ण जागेत दगडी सरंक्षण भिंत असुन भितीस लागुन गावाचे बाजुस कल्याण-टिटवाळा रोड असून त्यांनतर मध्य रेल्वेच्या कल्याण -कसारा दोन रेल्वे ट्रॅक आहेत. रेल्वेलाईन लगत रेल्वेची सरंक्षक भिंत आहे. भिंती जवळून गावात जाण्याचा

रस्ता आहे. रेल्वेची सरंक्षण भिंत अंदाजे १०० मिटर अंतरावर आहे. कपंनीची सरंक्षण भिव व आंबिवली गाव यामध्ये अंदाजे ८०० मीटर अंतर असून कंपनीची सरंक्षक भिंत रेल्वेची सरंक्षक भिंत व रस्त्यालगत असलेली घरे यांना तडे गेलेले आढळून आलेले नाही. तसेच स्वराज्य नेपच्युन या रहिवास वसाहतीचे इमारतींना कोणत्याही प्रकारे तडे गेलेले नाहीत किंवा इमारतीच्या काचा फुटलेल्या नाहीत.

***************

**लक्षवेधी सूचना क्र.२२१३**

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
## महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

**श्रीमती मंजुळा गावीत, मा.विधानसभा सदस्य**

"मनरेगा अंतर्गत धुळे जिल्ह्यात मागील पाच वर्षात असलेले विहीरींचे उदिष्ट तालुका निहाय देण्यात आलेले असणे, साक्री तालुक्यात या योजनेत दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास येणे, आता पर्यंत तालुक्यात किती विहीरींचे प्रस्ताव प्राप्त झाले व त्यापैकी किती विहीरींचे प्रस्ताव मंजूर करुन त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले याबाबत माहिती उपलब्ध करुण देण्यात न येणे, तसेच अनेक लाभार्थींना पहिला व अंतिम हप्ता देण्यात आलेला नसणे, त्यामुळे सदर योजनेचे उदिष्ट हे केवळ कागदावरच असल्याचे स्पष्ट होणे, शासनाने यासंदर्भात तात्काळ चौकशी करून साक्री तालुक्यासह धुळे जिल्ह्यातील विहीरींचे उदिष्ट पूर्ण करण्याच्या अनुषंगाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

## मा.मंत्री (रोजगार हमी योजना) यांचे निवेदन

शासन पत्र दि. २८ ऑक्टोबर, २०१६ अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत समृध्द महाराष्ट्र जनकल्याण योजनेच्या माध्यमातून ११ कामांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्यात धुळे जिल्ह्याकरिता एकुण ७००० सिंचन विहीरी पुर्ण करण्याचे उद्दिष्ट दिले होते.

साक्री तालुक्यात आतापर्यंत विहिरींचे एकूण ३८७० प्रस्ताव प्राप्त झाले. सन २०१७-१८ मध्ये २७७२ सिंचन विहीरींना मंजुरी देण्यात आलेली होती पैकी १९०८ सिंचन विहरींची कामे सुरु होवून आजअखेर १६९२ सिंचन विहीरी पूर्ण करण्यात आलेल्या असून २१६ सिंचन विहीरीची कामे प्रगतीत आहेत तसेच सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात ३३४६ सिंचन विहीर प्रस्तावांना मंजुरी देण्यात आलेली असून कामांचे कार्यारंभ आदेश देण्याचे काम प्रगतीत आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक सिंचन विहीरीची कामे ही अकुशल व कुशल घटका अंतर्गत करण्यात येतात.अकुशल घटकामध्ये मजुरांमार्फत कामे करुन साप्ताहिक हजेरीपट निर्गमित करण्यात येतात व आठवड्याची

मजुरी थेट मजुरांच्या खात्यावर ABPS च्या माध्यमातून जमा करण्यात येते. सिंचन विहीरीवर ६०% खर्च हा अकुशल म्हणुन करण्यात येतो व ४०% खर्च हा कुशल खर्च म्हणून करण्यात येतो. कुशल घटकामध्ये सिंचन विहिरी कामाची कुशल देयके दोन किंवा तीन बिलांच्या माध्यमातून तयार करण्यात येतात व सदर कुशल रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यावर थेट जमा केली जाते, त्यामुळे सिंचन विहीर कामांमध्ये लाभार्थ्यांना पहिला किंवा अंतिम हप्ता देण्याची बाब लागू होत नाही.जिल्हा स्तरावर सिंचन विहीर कामाचे ६०:४० (अकुशल : कुशल) गुणोत्तर राखण्यात येवून कामे प्रत्यक्षात पुर्ण करण्यात येतात. त्यामुळे योजनेचे उद्दिष्ट हे केवळ कागदावरच असल्याची बाब दिसुन येत नाही.

धुळे जिल्हयातील मागील ५ वर्षापासूनची सिंचन विहीर कामांची माहीती ही खालील कोष्टकात तालुकानिहाय भरुन सादर करण्यात येत आहे.

| तालुका | आर्थिक वर्ष | सिंचन विहिर पूर्ण कामे | अकुशल खर्च (रु. लाखात) | कुशल खर्च (रु. लाखात) | एकूण खर्च (रु. लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| धुळे | २०१९-२०२० | ७८३ | २९९.७८ | ९९१.२२ | १२९१ |
| | २०२०-२०२१ | ३०० | ४५.१३ | १५१.६७ | १९६.८ |
| | २०२१-२०२२ | १८६ | १५.५५ | ५७.०४ | ७२.५९ |
| | २०२२-२०२३ | ९५ | ०.५६ | ८८.९१ | ८९.४७ |
| | २०२३-२०२४ | ० | ० | ० | ० |
| | एकुण | १३६४ | ३६१.०२ | १२८८.८४ | १६४९.८६ |
| साक्री | २०१९-२०२० | ५६२ | ४६८.७३ | ९८४.४४ | १४५३.१७ |
| | २०२०-२०२१ | ३०९ | ११२.२ | ३७८.२३ | ४९०.४३ |
| | २०२१-२०२२ | ६४६ | ४३.९४ | १९२.६७ | २३६.६१ |
| | २०२२-२०२३ | १५१ | १.७४ | ८०.८२ | ८२.५६ |
| | २०२३-२०२४ | ६ | ० | ० | ० |
| | एकुण | १६७४ | ६२६.६१ | १६३६.१६ | २२६२.७७ |
| शिंदखेडा | २०१९-२०२० | ५७१ | ५८६.०५ | ९६२.७३ | १५४८.७८ |
| | २०२०-२०२१ | ३९५ | ६५.८१ | २५१.४५ | ३१७.२६ |
| | २०२१-२०२२ | २९० | २१.०६ | १६१.९५ | १८३.०१ |
| | २०२२-२०२३ | ११७ | ०.०२ | ९६.६६ | ९६.६८ |
| | २०२३-२०२४ | ० | ० | ० | ० |
| | एकुण | १३७३ | ६७२.९४ | १४७२.७९ | २१४५.७३ |
| शिरपुर | २०१९-२०२० | १९४ | ७८.२१ | २१३.७४ | २९१.९५ |
| | २०२०-२०२१ | २१५ | ७.८३ | ८४.३५ | ९२.१८ |
| | २०२१-२०२२ | १६८ | ८.८३ | ४२.१३ | ५०.९६ |
| | २०२२-२०२३ | २८ | ० | १३.१५ | १३.१५ |
| | २०२३-२०२४ | ३ | ० | ० | ० |
| | एकुण | ६०८ | ९४.८७ | ३५३.३७ | ४४८.२४ |

लक्षवेधी सूचना क्र.२३०४

# सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

**श्री. कुणाल रोहिदास पाटील, मा.विधानसभा सदस्य**

"धुळे तालुक्यात सिंचन विहिरीचा लाभ मिळवून देण्याच्या बहाना करत शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण करणारे रॅकेट सक्रिय झाले असल्याचे निदर्शनास येणे, शासनाकडून जिल्ह्यासाठी सिंचन विहिरींचे कोणते उद्दिष्ट प्राप्त नसताना शेतकऱ्यांना अर्ज विक्री होत असल्याच्या तक्रारी स्वतः शेतकऱ्यांनीच प्रशासनाकडे केलेल्या असणे, विहित अर्जाचा कुठलाही शासकीय नमुना अस्तित्वात नसताना धुळे व साक्री तालुक्यात बनावट अर्ज छापले कुणी ? असा प्रश्न शेतकरी बांधव उपस्थित करीत असणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून मागेल त्याला सिंचन, विहिरीचा लाभ देण्याची योजना शासनाने हाती घेतल्यानंतर सन २०१६-१७ मध्ये सिंचन विहिरींसाठी तीन लाख रुपये प्रति लाभार्थी लाभ दिला गेला, दिनांक ४ नोव्हेंबर २०२२ ला सुधारित शासन निर्णय प्रसारित करुण सिंचन विहिरींच्या अनुदानात चार लाख रुपयांची वाढ करत पात्र शेतकऱ्यांना ऑनलाइन अर्ज सादर करण्याचा सूचना केल्या जाणे, पण शासनाचे ऑनलाइन पोर्टल सुरू न झाल्याने पूर्वीच्या पद्धतीने ग्रामपंचायतीकडे अर्ज सादर करून ग्रामसभेत लाभार्थीची निवड करणे आवश्यक असणे, असे असतांना धुळे तालुक्यात सिंचन विहिरींच्या नावाने शेतकऱ्यांच्या आर्थिक लूट करणारे रॅकेट सक्रिय झाले असून त्यांच्याकडून १००० सिंचन विहिरींचा लक्षांक मिळाल्याची अफवा पसरवण्यात आलेली असणे, पंचायत समितीच्या माध्यमातून जिल्हा परिषद सदस्यांना २० आणि पंचायत समिती सदस्यांना २० अर्ज देण्यात आलेले असणे, या छापील अर्जावर जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांकडून शिक्का मारून शेतकऱ्यांना अर्ज विक्री केले जात असून शेतकऱ्यांची फसवणूक केली जात असणे, सिंचन विहिरींसाठी शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनुदानात अनेक वाटेकरी तयार झालेले असून शेतकऱ्यांना अर्ज उपलब्ध करून देण्याच्या बदल्यात ३५ ते ४० टक्के घेतले जात असून शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारीनुसार टक्केवारीत पंचायत समितीतील काही अधिकारी, अभियंत्यांसह, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या काही सदस्यांचा देखील वाटा असल्याची माहिती निदर्शनास येणे, सदर बाबींकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.मंत्री (रोजगार हमी योजना) यांचे निवेदन

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहिरींच्या कामाबाबत सुधारित सूचना शासन निर्णय दि.४/११/२०२२ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सिंचन विहिरीकरिता किमतीची कमाल मर्यादा रु.३.०० लाखावरुन

रु. ४.०० लाख करण्यात आलेली आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहिर मंजूर करताना GSDA ने निश्चित केलेल्या सुरक्षित पाणलोट क्षेत्रामध्ये विहिरीचे स्थळ निश्चित करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. दोन सिंचन विहिरीमधील किमान १५० मीटर अंतराची अट ही Run off Zone तसेच, अनुसूचित जाती व जमाती व दारिद्रय रेषेखालील कुटुंब यांकरिता रद्द करण्यात आली असून खाजगी विहिरीपासून १५० मी. अंतराची अट लागू राहणार नाही, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच, इच्छुक लाभार्थ्याने विहीत नमुन्यातील अर्ज (शासन निर्णयातील प्रपत्र अ- अर्जाचा नमूना व ब- संमती पत्र) ऑनलाईन किंवा ग्रामपंचायतीच्या "अर्ज पेटीत" टाकावे, ऑनलाईन व्यवस्था तयार झाल्यावर लाभार्थ्याने शक्य तोवर ऑनलाईन अर्ज करावा, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, सद्यस्थितीत ऑनलाईन पोर्टल शासनामार्फत सुरु झालेले नसल्यामुळे सिंचन विहिर मागणी अर्जाबाबत कार्यवाही ऑफलाईन पद्धतीने राबविणे आवश्यक आहे व तशी कार्यवाही करण्याबात तालुका व ग्रामपंचायत स्तरावर सूचित करण्यात आलेले आहे. शासन निर्णय दि.४/११/२०२२ अन्वये तालुक्यातील सर्व ०१ ते १३१ ग्रामपंचायतींना विविध योजनेतील वैयक्तिक लाभांच्या योजनासाठी विशेष ग्रामसभा आयोजित करुन ग्रामसभेमार्फतच पात्र लाभार्थ्यांची निवड करणेबाबत लेखी आदेश देण्यात आलेले आहेत.

शासन निर्णयातील दिलेला अर्ज परस्पर तयार करुन शेतकऱ्यांना वाटप केलेबाबत दि.१२/३/२०२३ व दि.१३/३/२०२३ रोजीच्या स्थानिक वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले होते. सदर बातमीबाबत चौकशी करुन स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबत दि.१४/३/२०२३ च्या पत्रान्वये उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धुळे यांना कळविले आहे. अर्ज विक्रीसंदर्भात आर्थिक गैरव्यवहार होत असल्याबाबत तालुक्यातील कोणाचीही लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.

*******

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक ७०३**

**श्री. सुनिल प्रभू, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयातील शिकाऊ डॉक्टरांनी एका रुग्णाच्या नातेवाईकालाच कोणताही अनुभव नसताना रुग्णाच्या पोटातील पाणी काढायला लावल्याचा गंभीर प्रकार दिनांक ०२.०२.२०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, भायखळा येथे राहणाऱ्या आत्माराम जाधव या रुग्णास पोटाचा त्रास जाणवू लागल्याने त्यांना २८ जानेवारी २०२३ रोजी नायर रुग्णालयात दाखल करण्यात येणे, डोळे पिवळसर व पोट फुगलेल्या अवस्थेत असणाऱ्या रुग्णाला तेथील डॉक्टरांनी लिव्हर खराब झाले असून पाणी काढावे लागेल, असे सांगण्यात येणे, सुरुवातीला इंजेक्शनने तात्पुरत्या स्वरुपात पाणी काढण्यात येणे, सदरहू पाणी इंजेक्शनने कसे काढावे हे त्या रुग्णाच्या मुलाला डॉक्टराने दाखवून देणे, त्यानुसार मुलाने इंजेक्शनद्वारे पाणी काढण्याची कार्यवाही करण्यात येणे, यासंदर्भात आरोग्य संघटनेने सदरहू डॉक्टरांवर कारवाई करण्याची मागणी रुग्णालयाच्या अधिष्ठातांकडे करण्यात येऊनही अद्याप सदरहू डॉक्टरांविरुध्द शासन तथा पालिका प्रशासनाने कोणतीच कारवाई न करणे, शिवाय सदरहू आजारग्रस्त रुग्णावर आवश्यकते औषधोपचार सुविधा उपलब्ध करुन देण्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे रुग्णाची किडनी खराब होऊन रुग्णाच्या जीवितास निर्माण झालेला गंभीर धोका, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया "

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

दिनांक २८ जानेवारी, २०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयातील वॉर्ड क्रमांक २३ मध्ये क्रोनिक अल्कोहोलिक लिव्हर डिझिसने (Chronic Alcoholic Liver Diseases) त्रासाने ग्रस्त रुग्ण श्री. आत्माराम जाधव यांना दाखल करण्यात आले होते. सदर रुग्णाचे Ascitic Fluid काढण्याची प्रक्रिया डॉक्टरांनीच पूर्ण केली होती. परंतु सदर दिवशी कामगारांची संख्या कमी असल्यामुळे सदर रुग्णाच्या नातेवाईकांची फक्त पिशवी पकडण्यासाठी मदत घेण्यात आली होती.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदरहू डॉक्टरला रुग्ण व त्याच्या नातेवाईकांशी योग्य ती वर्तणूक करण्याची समज ज्ञापद्वारे देण्यात आली आहे.

***********

रोटा/एच-११५१[७५०-८-२०२३]•

३२८

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय अधिवेशन)

## लक्षवेधी सूचना

श्री. निलेश लंके, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढिलप्रमाणे आहे :-

"माहे नोव्हेंबर २०२२ च्या शेवटच्या आठवडयात वा त्या सुमारास, पुणे शहरातील सर्वात जुने धर्मादाय रुग्णालय म्हणून शासनाकडून अनेक सवलती घेऊन सुरु असलेले रुबी हॉल क्लिनीक हे धर्मादाय नोंदणीकृत असूनही शासनाच्या कोणत्याही नियमांचे पालन या क्लिनीक तर्फे होत नसल्याची गंभीर तक्रार दाखल होणे, रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर लाक्षणीक उपोषण, आंदोलन सुरु करुन केली असल्याची बाब उघडकीस येणे, गेल्या अनेक वर्षापासून या रुग्णालयात बेकायदेशीररित्या किडनी ट्रान्सप्लान्टच्या शस्त्रक्रिया करण्यात येत असून या रुग्णालयाच्या गैरकारभाराबद्दल विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात वारंवार चर्चा होणे, सात ते आठ महिन्यांपूर्वी बेकायदेशीर किडनी ट्रान्सप्लान्ट विरोधात पोलीसांत दाखल झालेल्या तक्रारी, शासन नियमांचे कोणतेही पालन या रुग्णालयाचे व्यवस्थापन करीत नसल्याने सोशल ऑडिट, स्ट्रक्चरल ऑडिट तसेच बेकायदेशीररित्या घडलेल्या व उघडकीस आलेल्या किडनी ट्रान्सप्लान्टच्या असंख्य घटना, यामुळे या रुग्णालयाच्या कारभाराची चौकशी एसआयटी मार्फत तसेच पोलीसांच्या आर्थिक गुन्हा अन्वेषण विभागा मार्फत तातडीने सुरु करण्यात यावी अशी पुणे शहर व जिल्हयातील हजारो रुग्णांची राज्य शासनाकडे होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

### मा. उप मुख्यमंत्री महोदयाचे निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ४१ अअ मधील तरतुदी व त्यानुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ३१३२/२००४ मध्ये दिलेल्या न्यायनिर्णयानुसार निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांवर मोफत व सवलतीच्या दराने वैद्यकीय उपचार मिळण्याकरीता मा. उच्च न्यायालयाने योजना तयार केली आहे. त्यानुसार प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाने त्यांच्या रुग्णालयातील एकूण कार्यान्वीत खाटांपैकी १० टक्के खाटा निर्धन रुग्णांवर मोफत उपचार करण्यासाठी व १० टक्के खाटा दुर्बल घटकातील रुग्णांवर सवलतीच्या दराने उपचार करण्यासाठी राखून ठेवणे या रुग्णालयांना बंधनकारक आहे. तथापि, धर्मादाय रुग्णालयांकडून मा. उच्च न्यायालयाच्या योजनेचे पालन होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास जिल्हास्तरीय कार्यालयाकडून व देखरेख समितीकडून आवश्यक चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करण्यात येते. त्याचप्रमाणे पुणे शहरातील रुबी हॉल क्लिनीक हे सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग अंतर्गत नोंदणीकृत धर्मादाय रुग्णालय असून सदर रुग्णालयास मा. उच्च न्यायालयाच्या योजनेची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार रुबी हॉल क्लिनीक या धर्मादाय रुग्णालयाने जाने २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत त्यांच्याकडील एकूण ७७९ खाटांपैकी निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांवर अनुक्रमे १०६२ व ५६ याप्रमाणे एकूण १११८ रुग्णांवर उपचार केलेले आहेत.

सदर रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर आजाद समाज पार्टी तर्फे रुबी हॉल क्लिनीक विरोधात बेमुदत आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे कडून सर्व संबंधिताना कायदा, शांतता व सुव्यवस्थेचे पालन करण्यासंबंधी दिनांक १०/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सुचना देण्यात आल्या होत्या.

शेटा/५५-675 (750-7-2023)

किडणी ट्रान्सप्लान्टच्या शस्त्रक्रियेसंदर्भात नमूद करण्यात येते की, मानवी अवयव प्रत्यारोपणाकरीता रुग्णालयांना नोंदणी व पुर्ननोंदणी, नोंदणीकृत रुग्णालयांची तपासणी करणे, तसेच यासंदर्भातील कोणत्याही नियमांचा भंग झाल्यास प्राप्त तक्रारींची चौकशी करुन संबंधितांवर मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम, १९९४ नुसार राज्यस्तरावरील समुचित प्राधिकारी यांच्याकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येते.

बेकायदेशीररित्या करण्यात आलेल्या किडणी ट्रान्सप्लान्टच्या शस्त्रक्रियेसंदर्भात प्राप्त माहितीनुसार श्री. जितेंद्र जयसिंह हेगडे, रा. विश्रामबाग, जि. सांगली यांनी दिनांक २९/०३/२०२२ रोजी कोरेगाव पार्क पोलीस ठाणे, पुणे येथे तक्रार दाखल केली असून सदर प्रकरणी रुबी हॉल हॉस्पीटल येथील संबंधित डॉक्टरांवर गुन्हा दाखल करणेबाबत कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे यांनी उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे यांना कळविले होते.

समुचित प्राधिकारी, मानवी अवयव प्रत्यारोपण यांनी सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरीता उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमून चौकशी अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते. तसेच उप संचालक, आरोग्य सेवा, रुबी हॉल क्लिनिक पुणे यांना सदर प्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुसार उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीने सदर प्रकरणी चौकशी करुन प्राथमिक अहवाल सादर केला होता. प्राथमिक चौकशी अहवालाच्या आधारे सदर रुग्णालयाची नोंदणी मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियमाच्या कलम १६ नुसार निलंबित करण्यात आली होती व सदर रुग्णालयाविरुध्द कलम २२ अंतर्गत न्यायालयीन प्रकरण दाखल करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार उपसंचालक आरोग्य सेवा, पुणे यांनी सदर रुग्णालया विरुध्द एफआयआर दाखल केला असून कलम २२ अंतर्गत न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे.

सदर निलंबन आदेशाविरुध्द रुबी हॉल क्लिनिक, पुणे रुगणालयाने मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियमाच्या कलम १७ (२) नुसार मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण यांचेकडे अपिल दाखल केले होते. सदर अपिलावर सुनावणी घेण्यात आली असता मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण यांनी पारित केलेल्या आदेशानुसार चौकशी समितीने १० दिवसात चौकशी पूर्ण करुन चौकशी अहवाल समुचित प्राधिकारी, मानवी अवयव प्रत्यारोपण यांना सादर करुन त्यावर १५ दिवसात निर्णय घेणेबाबत आदेशित केले होते.

उपरोक्त चौकशी अहवालावर निर्णय घेण्यासाठी राज्य सल्लागार समितीची बैठक घेण्यात आली असता सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार सर्वानुमते काही अटींच्या अधिन तसेच याबाबत मा. उच्च न्यायालय येथे दाखल प्रकरणातील निर्णयाच्या अधिन राहून निलंबन मागे घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता व दिनांक १३/०६/२०२२ रोजी रुबी हॉल क्लिनिक या रुग्णालयाची नोंदणी पुनर्स्थापित करण्यात आली होती. यासंदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका (स्टॅम्प) क्र. ३२३३४/२०२२ - ग्रॅन्ट मेडिकल फऊंडेशन रुबी हॉल क्लिनिक विरुध्द महाराष्ट्र शासन या केसच्या सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने विचारणा केल्यानुसार वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व जिल्हा शल्य चिकित्सक पुणे यांनी सादर केलेला चौकशी अहवाल राज्य सल्लागार समितीपुढे ठेवून राज्य सल्लागार समितीने दिलेल्या अभिप्रायाप्रमाणे रुबी हॉल क्लिनिक, पुणे रुग्णालयाच्या समुचित प्राधिकारी व किडणी प्रत्यारोपण टिमला मंजूरी देण्याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल असे कळविण्यात आले होते.

त्यानुसार संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व जिल्हा शल्य चिकित्सक, पुणे यांनी सादर केलेला चौकशी अहवाल राज्य सल्लागार समितीच्या दिनांक १८/०१/२०२३ च्या बैठकीत स्विकारण्यात आला होता व समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयाच्या समुचित प्राधिकारी व किडणी प्रत्यारोपण टिमला मंजुरी देण्यात आलेली आहे.

याबाबत महाराष्ट्र विधानमंडळाचे अर्थसंकल्पिय अधिवेशन २०२३ मध्ये विधानसभा तारांकित प्रश्न क्रं. ६१६७५ उपस्थित करण्यात आला असता सदर प्रश्नाच्या अनुषंगाने मा. मंत्री (सा.आ.व कु.क.) यांनी उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली शासकिय आणि अशासकिय तज्ञांची चौकशी समिती नेमून तीन महिन्यात अहवाल सादर करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. त्यानुसार चौकशी समिती स्थापन करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

तसेच सदर प्रकरणी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन पुणे येथे भारतीय दंड विधान संहिता ४२०, ४६५, ४६८, ४७१, १२० ब व ३४ आणि मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा, १९९४ चे नियम १०, १९ ब, क व २० अन्वये गुन्हा नोंद क्रमांक ४६/२०२२ दाखल करण्यात आला असून याप्रकरणी पंधरा आरोपी निष्पन्न झाले आहेत. यापैकी दोन आरोपींना १३/०५/२०२२ रोजी अटक करण्यात आली होती व या प्रकरणी आरोपी क्रमांक एक व दोन विरुद्ध दिनांक ११/०७/२०२२ रोजी व आरोपी क्रमांक ३,४,६ व ८ यांच्याविरुद्ध दिनांक १०/१०/२०२२ रोजी पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत. यातील एका आरोपीचा अटकपूर्व जामिनाचा अर्ज सुनावणीसाठी प्रलंबित आहे तसेच अन्य आरोपींनी सदरहू गुन्हा नोंद रद्द करण्यासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली असून सदरील याचिका अद्याप सुनावणीस आलेली नाही. सदरहू तपास प्रगती पथावर आहे.

पुणे पोलीसांकडे दाखल झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने रुबी हॉल क्लिनिक, पुणे यांची निरीक्षक (चौकशी), पुणे यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली होती. याबाबत अधिकची चौकशी सुरु असून त्याचा निरिक्षक चौकशी क्र. १२३/२०२२ असा आहे. सदरचे प्रकरण धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांच्याकडे न्यायप्रविष्ठ आहे.

***

सार्वजनिक आरोग्य विभाग लक्षवेधी सूचना क्र. १६७९

महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

मा.श्री.संजय जगताप, मा.श्री. नानाभाऊ पटोले,मा.श्री. बाळासाहेब थोरात, मा.श्री. सुरेश वरपुडकर, मा.श्री. अमिन पटेल, मा.श्री. अस्लम शेख, मा.श्री. संग्राम थोपटे, मा.श्री. विश्वजित कदम, मा.ॲड यशोमती ठाकूर (सोनावणे), मा.श्री. सुनिल केदार, मा.श्री.विकास ठाकरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

---

" वाल्हे ( ता. पुरंदर जि. पुणे ) येथील पुणे-पंढरपूर पालखी मार्गावरील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची दुरावस्था होणे, त्यामुळे येथे सध्याच्या या केंद्रासाठी सुसज्ज इमारत बांधण्याचा शासनाने निर्णय घेऊन साडेतीन कोटी रुपयांचा निधी मंजूर करणे, मात्र शासन निर्णय होऊन व निधी मंजूर होऊन मोठा कालावधी उलटूनही सदर इमारतीचे काम जागेअभावी रखडले असणे, त्यामुळे दर महिन्याला सुमारे २ हजारांवर रुग्ण तपासणी करणाऱ्या या केंद्राला जागा मिळत नसल्याने हा निधी पुन्हा परत जाईल अशी भिती येथील सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होणे, त्यामुळे शासनाने या प्राथमिक आरोग्य केंद्राला तातडीने जागा उपलब्ध करुन देऊन या केंद्राच्या इमारतीचे काम तातडीने सुरु करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, परंतु याबाबत शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन

पुणे जिल्हयात १०१ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ५४२ उपकेंद्रे, १२ आयुर्वेदीक दवाखाने, ११ प्राथमिक आरोग्य पथके, ०८ फ़िरते आरोग्य पथक, ०२ आश्रमशाळा पथक कार्यरत आहेत. पालखी मार्गावरील प्राथमिक आरोग्य केंद्र वाल्हे, ता. पुरंदर, जिल्हा पुणेची इमारत सुस्थितीत असलेल्याबाबत उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, यांनी दिलेल्या अहवालानुसार प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत लोड बेअरिंग स्ट्रक्चर असुन सदरहू बांधकाम १९८३ मध्ये झालेले आहे. तथापि, प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे Structural Audit करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र वाल्हे येथील इमारतीच्या मागील बाजूस रेल्वे लाईन असुन पुढील बाजूस पालखी मार्ग आहे. रेल्वे लाईनचे विस्तारिकरणाचे कामकाज सुरु असुन, पालखी मार्गाचे (पुणे- पंढरपुर) मार्गाचे विस्तारिकरणाचे काम प्रस्तावित आहे. सदयस्थितीत उपलब्ध असलेली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची जागा ३८ गुंठे असुन नवीन मार्गदर्शक सुचनेनुसार प्राथमिक

आरोग्य केंद्राकरिता ३ एकर जागा किंवा गावाच्या मध्यभागी पुरेशी जागा उपलब्ध असणे बंधनकारक आहे. तथापि, ग्रामपंचायतीने नवीन जागा उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर प्राथमिक आरोग्य केंद्राची जागा ३८ गुंठे असुन रेल्वे लाईन व पालखी मार्गाचे विस्तारीकरण झाल्यास सदरहू जागा कमी होत आहे. सदरहु प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध होणेबाबत सन २०२१-२२ मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत पुरवणी मध्ये, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनामध्ये प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, अदयाप निधी उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे सन २०२३-२४ च्या मध्ये पुन्हा जिल्हा वार्षिक योजनेतुन निधी मिळण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे. ग्रामपंचायतीकडुन जागा उपलब्ध न झाल्याने नवीन इमारतीकरीता निधी उपलब्ध करणेस अडचण निर्माण होत आहे. सदर प्राथमिक आरोग्य केंद्र व निवासस्थानाची इमारत ३८ गुंठे जागेमध्ये कार्यरत असुन सदरची इमारत पाडून नवीन इमारत व निवासस्थाने बांधणेकरीता पुरेशी जागा उपलब्ध करुन घेणेची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावरुन सुरु आहे.

सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावरील सर्व प्रकारचे सेवा देण्यात येतात. प्राथमिक आरोग्य केंद्रात दरमहा ८०० ते १००० बाहयरुग्ण तपासणी केली जाते. प्रसुती, विनटाका कुंटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात येतात.

सन जानेवारी २०२२ ते मार्च २०२३ या कालावधीतील प्राथमिक आरोग्य केंद्र वाल्हे येथील कामकाज आंतररुग्ण -१०३९, बाहयरुग्ण- १९३३७, प्रसुती -८० इत्यादी करण्यात आलेल्या आहेत.

*******************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.२०२८**

मा. श्री. शिरीष चौधरी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे: -

**"लातूर जिल्हयातील जळकोट तालुका येथील मौजे धोंडवाडी ते धोंडवाडी पाट्टी, माळहिप्परगा ते पाटोडा (खु) या रस्त्याचे काम सद्या सुरु असुन या रस्त्याचे हॉट मिक्स, साईड पटट्याचे काम किंवा डांबराच्या बांधकामांशी संबंधित रस्त्याची सर्व कामे अतिशय निकृष्ट दर्जाची होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, उक्त निकृष्ट कामाच्या दर्जाची चौकशी करुन चांगल्या प्रतीच्या कामाच्या सुचना देण्यात याव्यात अन्यथा सार्व. बांधकाम विभाग जळकोट कार्यालयासमोर तीव्र बेमुदत आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात देणे, परिणामी स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासन त्वरीत चौकशी करुन दोषापिंतावर कारवाई तसेच चांगले काम होण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया.."**

---

## मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे निवेदन

मौ. धोंडवाडी ते रामा २६८ रस्ता सा. क्र. ०/०० ते १/०० (ग्रा.मा.४७) ता.जळकोट या रस्त्याच्या रु.२०.०० लक्ष रकमेच्या कामास जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत मंजूरी देण्यात आली आहे. सदरचे काम पूर्ण झालेले असून देयक अद्याप अदा करण्यात आलेले नाही.

२. तसेच मौजे पाटोदा खुर्द ते माळहिप्परगा सा. क्र. ०/०० ते ४/२०० (इजिमा-५१) ता.जळकोट या रस्त्याच्यां कामास रु.१००.०० लक्ष रकमेच्या कामास जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत मंजूरी देण्यात आली आहे. सदरचे काम पूर्ण झालेले असून देयक अदा करण्यात आले आहे. मात्र रु.२४,८९,७५५/- इतकी रक्कम राखून ठेवण्यात आली आहे.

३. सदर दोन्ही रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबतची तक्रार जिल्हा परिषदेस प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने राज्य गुणवत्ता निरीक्षक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी

अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर व उप अभियंता, अहमदपूर यांच्या चौकशी समितीने उपरोक्त कामांची पाहणी केली असून दोन्ही कामांमध्ये अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे.

४. त्यामुळे राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचे अहवालातील शिफारशीनुसार पुढील कारवाई करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना देण्यात आल्या आहेत.

******

विधानसभा लक्षवेधी सूचना क्र.१९८९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

डॉ. राहूल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"भारत हा कृषी प्रधान देश असूनही आपल्या देशामध्ये शालेय व माध्यमिक शिक्षणामध्ये मध्ये कृषी विषय शिकवला जात नसणे, महाराष्ट्र राज्यात शालेय व माध्यमिक शिक्षणात कृषि विषय अनिवार्य करण्यात यावा अशी मागणी वारंवार लोकप्रतिनिधी, विविध कृषी संघटनांनी शासनाकडे केलेली असणे, यासंदर्भात अनेक वेळा शासनस्तरावर बैठकाही घेण्यात येणे, परंतू अद्यापही सदर प्रकरणी निर्णयात्मक कार्यवाही व अंमलबजावणी न होणे,

युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशन, २०१७ च्या अहवालानुसार उच्च माध्यमिक शिक्षण स्तरावर सर्वात जास्त म्हणजे एक कोटी पेक्षा जास्त मुले (३६.०६ टक्के) कला शाखेमध्ये शिक्षण घेत असणे, त्यापाठोपाठ १९.०९ टक्के मुले विज्ञान शाखेमध्ये तर कॉमर्समध्ये १६.२८ टक्के मुले शिकत घेत असणे, भारतासारखा कृषीप्रधान देशामध्ये कृषी शाखेमध्ये जाणारी मुले केवळ ०.११ टक्केच असणे, आपल्या जीडीपीमध्ये कृषीपेक्षा व्हेटर्नरी कडून येणारी जीडीपी जास्त असणे, मोठया प्रमाणात मुले आर्थिक अडचणीमुळे इयत्ता १० वी नंतरचे शिक्षण घेवु न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय शिक्षणात कृषि विषयाचे ज्ञान दिल्यास कृषि व कृषि संलग्न व्यवसाय उदा. फुलशेती, मत्स्यशेती, मधुमाक्षिका पालन, पोल्ट्री इ. अधिक कौशल्याने करून त्याद्वारे अर्थार्जन वाढवता येण्यास सोयीचे होणार असणे, या नव्या कृषी क्रांतीने रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार असणे, राज्यात सध्या सुक्ष्म सिंचन, किटकनाशके, खते, बियाणे, पिकपोषण, सेंद्रीय - जैविक उत्पादने शेती यंत्र निर्मिती या क्षेत्रामध्ये विविध कंपन्या व उद्योगाचा मोठया प्रमाणात मनुष्यबळाची गरज असणे, मात्र या संस्थांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध होत नसणे, छोटी अभ्यासक्रम तयार करून मोठ्या प्रमाणात अभ्यासक्रम घेण्याच्या माध्यमातुन शिकवल्यास कृषि उद्योजक वाढण्यास मदत होणार असणे, कर्नाटक, पंजाब, हरियाणा या राज्यात शालेय व माध्यमिक शिक्षणास कृषि विषय अनिवार्य करण्यात आलेला असणे, इतर राज्यांप्रमाणेच आपल्या महाराष्ट्र राज्यातील शालेय व माध्यमिक शिक्षणामध्ये येणाऱ्या शैक्षणीक वर्षापासून कृषि विषय अनिवार्य करण्याच्या अनुषंगाने शासनाने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन

शेतीचे सर्वांगीण महत्व विद्यार्थ्यांच्या लक्षात यावे यासाठी हा विषय सर्व शालेय अभ्यासक्रमात एकात्मिक पद्धतीने समाविष्ट करण्यात आला आहे. शालेय अभ्यासक्रमातील इतर सर्व विषयांच्या सहसंबंधातून शेतीचे महत्त्व, उपयोजन, व्यवसाय संधी, शेतीविषयक जाणीव जागृती अशा अनेक पैलूंकडे विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रित करता येणार आहे. प्रामुख्याने कृतीकेंद्रित आशयाच्या आधारे अध्ययन होऊन विद्यार्थ्यांना त्याचा चांगल्या प्रकारे फायदा होईल. प्रचलित

अभ्यासक्रमानुसार इयत्ता ३ री ते इयत्ता १२ वी च्या विविध विषयांमध्ये एकात्मिक स्वरूपात शेतीविषयक आशयाचा समावेश करण्यात आलेला आहे. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २०१२ मध्ये इयत्ता ६ वी ते ८ वी कार्यानुभव विषयामध्ये ऐच्छिक उपक्रमात उत्पादक क्षेत्रांतर्गत अन्न उपक्षेत्रांतर्गत सुलभ शेती या उपक्रमाचा समावेश आहे.

शिक्षण व्यवसायभिमुख व्हावे या दृष्टीने "राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान" (RMSA) अंतर्गत National Skill Qualification Framework (NSQF) इयत्ता ९ वी व १० वी स्तरावर एकूण १२ विषय सुरु करण्यात आलेले आहेत. यांमध्ये Agricultural - Solanaceous Crop Cultivator (x7) या विषयाचा समावेश आहे. तसेच इयत्ता ११ वी व १२ वी स्तरावर एकूण १२ विषय असून त्यामध्ये Agricultural Micro Irrigation Technician (G8) या विषयाचा समावेश आहे.

इयत्ता ११ वी व १२ वी स्तरावर किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक (MCVC) अभ्यासक्रमात Agricultural Group मध्ये

१. Holticulture

२. Crop Science या विषयांचा समावेश आहे.

तसेच द्विलक्षी (Bi-Focal) अभ्यासक्रमात Agricultural Group मध्ये

१. Animal Science and Dairying (B2)

२. Crop Science (B4)

३. Holticulture (B5) या विषयांचा समावेश आहे.

शेती विषयाचा समावेश शालेय अभ्यासक्रमात कसा करता येईल, यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) व महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे येथील तज्ज्ञांची संयुक्त समिती गठीत करून याविषयी सविस्तर प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. संबंधित विषयासाठी मुख्य समितीला सहाय्य व मार्गदर्शन करण्यासाठी कृषी महाविद्यालयातील १२ प्राध्यापकांची उपसमिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समिती, उपसमितीमार्फत शालेय अभ्यासक्रमात शेती विषयासंदर्भात समाविष्ट करावयाच्या घटक व उपघटकांवर इयत्तावार सखोल चर्चा करून खालीलप्रकारचे दोन मसुदे तयार करण्यात आले आहेत.

१. कृषी विषयाचे शालेय अभ्यासक्रमात एकात्मिक स्वरूपात समाविष्ट करावयाचे घटक.

२. कृषी विषयाचे शालेय अभ्यासक्रमात इयत्ता नववी आणि इयत्ता दहावीसाठी स्वतंत्र विषय म्हणून समावेश करावयाचे घटक.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने शालेय शिक्षणात अभ्यासक्रमामध्ये कृषी विषयाचा समावेश करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

*************************************************************

H/५५५/१a

लक्षवेधी सूचना क्रमांक :- १२९९

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्रीमती सरोज आहिरे, श्री.प्राजक्त तनपुरे, श्री.लहू कानडे वि.स.स. यांनी विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक- १२९९ पुढीलप्रमाणे आहे :-

"नंदूरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातील जुगणी गावाच्या हिरिचापडा येथे राहणाऱ्या श्रीमती. अलकाबाई अमिताभ वळवी या गेल्या ३ वर्षांपासून अंगणवाडी सेविका म्हणून हिरिचापडा येथील तेलखेडी बिट एक येथे कार्यरत असणे, त्यांना गेल्या ३ वर्षांपासून त्यांचे मानधन देण्यात आलेले नसणे, त्यांनी बालविकास अधिकारी श्री. किशोर पगारे यांच्याकडे मानधन देण्याबाबत वारंवार विनंती केली असता, त्यांनी त्याकडे हेतूपूरस्पर केलेले दूर्लक्ष, त्यांनी त्यांची परिस्थिती बिकट असल्यामुळे आपले कार्य सुरुच ठेवलेले असणे, श्री. किशोर पगारे व विस्तार अधिकारी श्री. पंकज बोरसे यांनी श्रीमती. अलकाबाई वळवी यांना त्रास दिल्यामुळे व त्यांचे मानधन न दिल्यामुळे त्यांच्या त्रासाला कंटाळून त्यांनी दि. ७ फेब्रुवारी, २०२३ रोजी केलेली आत्महत्या, या घटनेमुळे तेथील नागरीकांत पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, श्रीमती. अलकाबाई वळवी यांना वेळेत मानधन दिले असते व मानसिक त्रास दिला नसता तर त्यांनी आत्महत्या केली नसती, जोपर्यंत त्यांच्यावर कारवाई होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, असे मयत झालेल्या पत्नीच्या पतीने केलेला असणे, संबंधित अधिकाऱ्याविरुध्द कारवाई करुन मृत्यूमूखी पडलेल्या महिलेच्या कुटूंबियांस आर्थिक मदत देणेबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे निवेदन

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत नंदुरबार जिल्ह्यामधील धडगांव -२ (तोरणमाळ), ता.धडगांव या ग्रामीण प्रकल्पातील जुगनी पाडा, हिरीचापाडा येथील अंगणवाडी केंद्रामध्ये संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०९.०१.२०१६ रोजीच्या आदेशान्वये श्रीमती अलकाबाई वळवी यांची अंगणवाडी सेविका पदावर नियुक्ती केली होती. त्यानंतर त्यांनी याच अंगणवाडी केंद्रामध्ये श्रीमती मालती वळवी यांची दिनांक ०२.०५.२०१६ रोजीच्या आदेशान्वये अंगणवाडी सेविका पदावर नियुक्ती केली होती. तद्नंतर बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी दिनांक ३०.०१.२०१८ रोजीच्या आदेशांन्वये श्रीमती अलकाबाई वळवी व श्रीमती मालती वळवी ह्या सतत गैरहजर राहत असल्याने या दोन्ही अंगणवाडी सेविकांची नियुक्ती रद्द केली.

श्रीमती अलकाबाई वळवी यांनी त्यांना सेवेतून काढून टाकण्यात आल्याने सदर आदेशाविरुद्ध त्यांनी कामगार न्यायालय, धुळे येथे ULP १५/२०१८ प्रकरण दाखल केले होते. त्याचप्रमाणे श्रीमती मालती वळवी यांनी देखील कामगार न्यायालय, धुळे येथे ULP २/२०१९ प्रकरण दाखल केले होते. यापैकी श्रीमती अलकाबाई वळवी यांचे प्रकरणी कामगार न्यायालय, धुळे यांनी दिनांक ०८.०७.२०२१ रोजी श्रीमती अलकाबाई वळवी यांना अंगणवाडी सेविका या पदावर सेवेत पुर्नस्थापित करुन त्यांचे बडतर्फ कालावधीतील मानधन अदा करण्याबाबत निर्देश दिले. त्यानुषंगाने बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी दिनांक ०४.०८.२०२१ रोजीच्या आदेशान्वये श्रीमती अलकाबाई वळवी यांना अंगणवाडी सेविका या पदावर नियुक्ती दिली. त्याप्रमाणे सदर पदावर श्रीमती अलकाबाई वळवी ह्या दिनांक १३.०८.२०२१ रोजी कामावर हजर होऊन कार्यरत होत्या.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मानधन PFMS सम्मान प्रणालीद्वारे अदा करण्यात येते. अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे नियुक्तीकरिता तत्कालीन परिस्थितीत अधिकतम वयोमर्यादा ३० होती. त्यानुसार PFMS सम्मान प्रणालीमध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्याची प्रथमत: नोंद करताना त्याचे वय नमूद करणे आवश्यक असते. श्रीमती अलकाबाई वळवी यांना दिनांक ०४.०८.२०२१ रोजी नियुक्ती दिल्यानंतर त्यांनी PFMS प्रणालीमधून मानधन मिळण्याकरीता त्यांनी एकाच क्रमांकाचे परंतू दोन वेगवेगळया जन्मतारखा असलेले स्वत:चे दोन आधार कार्ड सादर केले. त्याचप्रमाणे त्यांना मानधन अदा करण्याच्या अनुषंगाने सम्मान प्रणालीमध्ये नोंद करताना त्यावेळी त्याचे वय ३० पेक्षा अधिक असल्याने तांत्रिक अडचणीमुळे नोंद न झाल्यामुळे मानधन अदा करणे शक्य झाले नाही.

दरम्यान, श्रीमती अलकाबाई वळवी यांनी दिनांक ०७.०२.२०२३ रोजी मोटार सायकलवरुन उडी मारुन त्यामध्ये त्यांना दुखापत होऊन त्यांचा मृत्यु झाल्याबाबत पोलिस स्टेशन म्हसावद, जि. नंदुरबार येथे FIR नोंद करण्यात आला असून या FIR मध्ये अलकाबाई वळवी यांचे डोके दुखत असल्याने त्यांनी गाडी थांबवा असे त्यांच्या पतीस सांगितले त्यावेळी श्रीमती अलकाबाई या रोडवर पडल्या व त्यांच्या डोक्याला दुखापत झाली असे नमूद करण्यात आले आहे. तसेच अंगणवाडी सेविका पदाचे मानधन मिळत नसल्याने बाल विकास प्रकल्प अधिकारी व अन्य काही व्यक्ती यांचेकडून होणाऱ्या त्रासामुळे गाडीवरुन उडी मारली असे देखील FIR मध्ये नमूद करण्यात आले आहे.

वरीलप्रमाणे प्रकरणाची चौकशी करुन श्रीमती अलकाबाई वळवी यांच्या मानधनाबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

******************************

H/862-19